# आज इथं : उद्या तिथं

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. २९८७

शंकरराव खरात



REFBK-0023899

। नोंद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक प
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैस
वर्गणी भरावी लागेल.

4 SEP 1984

7 SEP 198

( क्र. मा. प. )
५०००-१२-८२

[illegible]

संदर्भ निबंध
२९८७
२३८९९
२१।७।८३

# आज इथं : उद्या तिथं

शंकरराव खरात

REFBK-0023899

आनंद प्रकाशन
औरंगाबाद

आनंद प्रकाशन, जयसिंगपुरा, औरंगाबाद

प्रकाशक
शंकरराव अ. हातोले
बी. कॉम. बी. लीब्. एस्सी.
आनंद प्रकाशन, जयसिंगपुरा, औरंगाबाद

मुद्रक :
नाना डेंगळे
साधना प्रेस,
४३०–३१ शनिवार पेठ,
पुणे – ४११ ०३०

प्रथमावृत्ती
२५ मार्च १९८३

प्रकाशन क्र. १९

© शंकरराव खरात

**किंमत २० रुपये**

मुखपृष्ठ
अनंत सालकर

प्रमुख विक्रेता
बौद्ध व दलित साहित्य विक्रेता
आनंद बुक डेपो, जयसिंगपुरा, औरंगाबाद

आदर्श, दानशूर

**कै. प्रभाकरपंत कोरगावकर**

यांच्या पवित्र स्मृतीस

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८८८
२३८११
निबंध २९।७।८३
शाखा (स्थळ प्रत)

# भटक्या व विमुक्त जमातीच्या प्रश्नाचे स्वरूप

आज इथं तर उद्या तिथं– दुसऱ्या गावी मुक्कामाला, असे जीवन जगणाऱ्या भटक्या व विमुक्त जाती, जमाती आपला जीवन-चरितार्थ मूलतः आपल्या श्रमाच्या घामावरच चालवितात. त्यातच काही जाती-जमाती या आपल्या जातीच्या परंपरेनुसार, वाडवडलापासून एक हक्क हक्कदार म्हणून भिक्षा मागतात. भिक्षा मागणे हा एक प्रकारचा परंपरागत हक्कच अशी त्यांची धारणा असते. ही भिक्षा ते भिकारी म्हणून न मागता, एक परंपरागत हक्कदार म्हणून ते हक्काने भिक्षा मागतात. त्यापोटी ते समाजाची योग्य ती कर्तव्य-कामं लोकरंजन करून परतफेड करतात. अशा काही जाती-जमाती यात आहेत. याच भटक्या-विमुक्त जमातीत अशाही काही जाती-जमाती आहेत की, त्या आपल्या कष्टावरच आपले रोजचे पोटापाण्याचे भागवितात. रोज रोज रोजगाराने दुसऱ्याच्या दारी, शेतात, बांधकामावर श्रम करावयाचे, घाम गाळावयाचा, आणि त्यातून मिळणाऱ्या रोजंदारीवर आपल्या मुलाबाळांच्या पोटापाण्याचा संसार चालवितात. अर्थात हक्कदारीने भिक्षा मागणाऱ्याही जाती गावोगाव पोटासाठी भटकत असतात; आणि कष्ट करून जगणाऱ्या जाती-जमातीही पोटाच्या पाठीमागे आज एका गावाला, तर उद्या दुसऱ्या गावाला मुक्काम करत पाठीवर बिऱ्हाड घेऊन भटकतात. अर्थात आज-काल हक्कदार भिक्षेकऱ्यांनाही आखडत्या हाताने दात्याकडून भिक्षा वाढली जाते; किंवा भिक्षा वाढलीही जात नाही. अशा अवस्थेत भटक्या जमातीतील हक्कदार जमातीतही भिक्षा मागण्याचे काम बंद करून; स्वतःच्या कष्टावरच जगण्याचा प्रसंग आलेला आहे. आणि ते (अपवादात्मक) काही लोक सोडले तर आपल्या जीवन-चरितार्थासाठी आता कष्टच करतात; स्वतः श्रम करून जगण्याची वाट धरतात व आपल्या कुटुंबाचं त्यावर पालनपोषण करतात. म्हणूनच आज-काल भटक्या व विमुक्त जमाती शहराकडे, औद्योगिक केंद्राच्या भागाकडे, ग्रामीण भागातील साखर-कारखान्याच्या परिसराकडे आपला जीवन-चरितार्थ आपल्या श्रमावर भागविण्यासाठी धाव घेताना दिसतात.

या भटक्या जाती-जमातींचे उभे जीवनच उपरे आहे. त्याना स्वतःचे असे गाव नाही. स्वतःची अशी उभे राहाण्यासाठी भूमी नाही. आणि राहाण्यासाठी, निवाऱ्यासाठी स्वतःचे असे घर नाही. माणसाच्या अस्तित्वासाठी ज्याची आवश्यकता असते त्यालाच हे पारखे झालेले. यांचे रानपाखरासारखेच जीवन. रानपक्षाला एक वेळ झाडावर विसावा घ्यावयास मिळतो, तेवढीही विसाव्यासाठी जागा या भटक्या जाती-जमातीना नाही. त्यातच पिढ्यान-पिढ्यांच्या दारिद्र्यामुळे त्यांच्या कुटुंबांना, त्यांच्या मुलाबाळांना अत्यंत हालअपेष्टात रोजचे जीवन जगावे लागते. माणसाच्या मूलभूत गरजा – अन्न, वस्त्र, निवारा यालाच या भटक्या जमाती मुकलेल्या आहेत, पारख्या झालेल्या आहेत. त्यामुळे भलत्याच बिकट परिस्थितीतून, अत्यंत हलाखीच्या अवस्थेतून यांना उगवला दिवस घालवावा लागतो. त्यात या भटक्या व विमुक्त जाती-जमाती रूढीप्रमाणे, परंपरागत-जात-चालीप्रमाणे वागणाऱ्या जात-रूढीच्या·परंपरेच्या फासातून– विळख्यातून त्यांना मुक्त होणे अवघड जाते. म्हणूनच त्यांचा अंधश्रद्धेवर विश्वास असतो. नशिबावर दैवावर हवाला ठेवून 'आलिया भोगासी असावे सादर' या परंपरागत विचार-भावनेला धरून वागतात, जगतात म्हणूनच ते आपली स्वतःची, आपल्या कुटुंबाची व आपल्या समाजाची प्रगती, उन्नती करू शकले नाहीत. अंधश्रद्धा, रूढी, परंपरेची कोंडी फोडून बाहेर आल्यावरच त्यांना नव्या जगाचे, नव्या विश्वाचे खरे दर्शन घडणार आहे; आणि त्यातूनच त्याना स्वत.च्या उद्धाराचा मार्ग सापडणार आहे.

या भटक्या व विमुक्त जाती-जमातीत त्याना जागृत करण्यासाठी, आपल्या प्रगतीचे व उन्नतीचे मार्ग दाखविण्यासाठी, आपल्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी, पूर्वी जाती-जमाती संघटना नव्हती. त्याचप्रमाणे आज सर्वांच्या एकजुटीची संघटना आहे, अशीही एक सामुदायिक स्वरूपाची संघटना नव्हती. त्यातच भटके जीवन जगणाऱ्या जमातीची संघटनाही (त्याकाळी) बांधणे अवघड. स्थायिक समाजाची संघटना बांधणे त्यामानाने सोपे. अशातच भटक्या जमातीत शिक्षणाचा अभाव. म्हणूनच शिक्षणाचे महत्त्व, संघटनेचे महत्त्व, आपल्या हक्कांची जाणीव, आपल्या प्रगतीच्या वाटा याची कल्पना, जाणीव यायाला पाहिजे तशी या समाजाला (पूर्वी) येऊ शकली नाही. समाजसुधारकानीही यांच्या प्रश्नाला हात घातला नाही, सरकारनेही या जमातीचा मूलभूत प्रश्न हातात घेऊन, त्यांची सर्वांगीण प्रगती, विकास करण्यासाठी सर्व बाजूनी सर्व दृष्टींनी म्हणावे तसे प्रयत्न केलेले दिसत नाहीत. इतर सर्व राजकीय पक्षांनी या भटक्या जमातीच्या प्रश्नाला स्पर्शच केला नाही. त्यामुळे त्यांचा प्रश्न आहे त्याच परिस्थितीत पडून राहिला, आणि या भटक्या जमातीच्या जीवनाला स्थैर्य मिळू शकले नाही. आज इथे उद्या तिथे असेच भटक्या स्वरूपाचे ते आजही जीवन जगत आसेत.

भटक्या व विमुक्त जातींची, जमातींची लोकसंख्या निश्चित सांगणे अवघड आहे. दहा वर्षांतून एकदा होणाऱ्या शिरगणतीत, भटकते जीवन जगणाऱ्यांची नोंद-गणती होते का? आणि ती झाली तर 'बरोबर' होते का? असा प्रश्न उभा राहातो. त्यातच भटकते जीवन

भोगणाऱ्याच्या जाती-जमातीत वाढ होत राहाते. काही जातींच्या अशा वाढीस सरकारची संमती मिळते आणि त्यांची नावे सरकाच्या अधिकृत यादीत नोंद केलेली आढळतात. अशाही परिस्थितीत १९६१ च्या शिरगणतीप्रमाणे १३·६४ लक्ष एवढी लोकसंख्या दिसते. आता १९८१ च्या शिरगणतीप्रमाणे भटक्या जमातींची लोकसंख्या सुमारे ४० लाखांच्या पुढे गेली असली पाहिजे.

महाराष्ट्र सरकारच्या '**समाज कल्याण योजना**' या १९७७ साली प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकेत विमुक्त जातीत १३ पोटजाती दाखविल्या आहेत; आणि भटक्या जमातीत एकूण २५ पोटजमाती दर्शविल्या आहेत. ( पान : ५६ व ५७ ) १९७७ नंतर यात काही जाती-जमातींची वाढही झालेली असेल. भटक्या व विमुक्त जाती-जमातींच्या संघटनेच्या पदाधिकाऱ्याच्या मते, शिरगणतीत दर्शविल्यापेक्षा कितीतरी अधिक अशी त्यांची लोकसंख्या आहे.

भटक्या व विमुक्त जाती-जमातीतील जागृत, जाणत्या नेत्यांच्या प्रयत्नाने मुंबई येथे ता. ९ जानेवारी १९७२ रोजी एक भव्य परिषद घेतली होती. त्या परिषदेचे कार्यकारी समिती अध्यक्ष ॲड बी. एस्. गोकराळ होते, स्वागताध्यक्ष– श्री. दौलतराव भोसले होते. आणि चिटणीस म्हणून श्री. बा. सि. रेणके होते. ही परिषद खऱ्या अर्थाने प्रातिनिधिक स्वरूपाची झाली. ( या परिषदेला मीही हजर होतो. )

मुंबईच्या या परिषदेमुळे या भटक्या जमातीत जागृती झाली, व त्याना आपल्या हक्काची जाणीवही झाली. आपल्या हक्काची जाणीव परिषदेत पास झालेल्या ठरावातून दिसते या परिषदेत पास झालेले ठराव थोडक्यात असे:—

".या भटक्या व विमुक्त जाती-जमातींना वर्गीकृत जातीत सामील करावे, हे नसेल तर या जातींची घटनेप्रमाणे तिसरी सूची ( यादी ) करावी.

या जातींचा सर्वांगीण विकास करण्यासाठी व योजना राबवण्यासाठी स्वतंत्र असे महामंडळ स्थापन करावे.

या जातींना घटनेने संरक्षण व हक्क द्यावेत. घटनेत त्याची तरतूद होईपर्यंत त्यांना जनरल जागांवर प्रतिनिधित्व देऊन, आणि शासनाच्या सर्व स्तरांवर सहभागी करून घेऊन त्यांना आतापर्यंत नाकारण्यात आलेले राखीव हक्क द्यावेत.

शैक्षणिक क्षेत्रात या वर्गातील विद्यार्थ्यांकरिता अधिकात अधिक आश्रमशाळा आणि वसतिगृहे सुरू करावीत.

या भटक्या व विमुक्त जातींचे आधुनिक तत्त्वावर वस्तीकरण करण्यात येऊन, त्यांच्या वस्तीकरणाला व्यवसायाची जोड द्यावी.

या जमातींना सरकारी, निमसरकारी आणि खाजगी नोकऱ्यांत आजच्यापेक्षा अधिक टक्केवारीने राखीव नोकऱ्या द्याव्यात. या लोकांच्या औद्योगिक, कंत्राटी, मजूर सोसायट्या यांना जादा मदत आणि सढळ व अल्प व्याजाने कर्जपुरवठा करावा. ”

( किर्लोस्कर : फेब्रुवारी १९७२ )

या परिषदेच्या पूर्वी सोलापूर येथे विमुक्त जातींची अखिल भारतीय पातळीवर एक परिषद कै. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत झाली होती. तसेच १९७१ साली अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात ‘ मढी ’ या देवस्थानाच्या गावी भरणाऱ्या जत्रेत भटक्या व विमुक्त जातींची सभा होऊन, त्यातही त्यांनी आपल्या मागण्या घोषित केल्या होत्या.

याशिवाय वेगवेगळ्या भटक्या जातींची वेगवेगळी अधिवेशने भरून त्यातही त्यांनी स्वतंत्रपणे आपल्या प्रगतीसाठी मागण्या करून ठराव केले होते. त्यात पुणे येथे १९७३ च्या मार्च महिन्यात अखिल महाराष्ट्र मांगगारुडी समाजाचे अधिवेशन झाले होते. १९६९–७० साली पुण्यातच वडार समाजाचे अधिवेशन झाले होते. त्याचप्रमाणे कैकाडी समाजाची अधिवेशने झालीत. त्यात पुण्यात एक १९७२ च्या सुमारास झाले होते ( या झालेल्या अधिवेशनांना मी हजर होतो. त्यात भागही घेतलेला होता ) तसेच जेजूरी, जुन्नर ( जि. पुणे ) येथेही भटक्या जमातींच्या वार्षिक बैठकी भरलेल्या असत.

पुण्यात १९८२ च्या मे महिन्यात ‘ भटक्या-विमुक्त जाती संघटना ’ महाराष्ट्र राज्य, या संघटनेचे अधिवेशन झाले. या अधिवेशनातही महत्त्वाचे ठराव पास झाले होते. ते असे :—

“ पोलिसाकडे गुन्हेगार म्हणून नोंद असलेल्या भटक्या–विमुक्त जातींची यादी रद्द करावी.

भटक्या–विमुक्त जातींना निर्वासित समजून त्यांचे युद्ध पातळीवर पुनर्वसन करावे.

भटक्या–विमुक्त जातींच्या सर्वांगीण उन्नतीसाठी स्वतंत्र मंत्रालय व प्राधिकरणाची स्थापना करावी.

लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागांची टक्केवारी वाढवावी.

हरिजन–गिरिजनांप्रमाणे भटक्या–विमुक्तांना घटनात्मक संरक्षण द्यावे.

मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे. ”

( उत्क्रांती : जून–ऑगस्ट १९८२, पृ. ७ )

याप्रमाणे भटक्या व विमुक्त जमातीच्या महत्वाच्या मागण्या ( सारांशरूपाने ) आहेत. या मागण्यांचे स्वरूप सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, व राजकीयही आहे. या ठरावातील प्रत्येक मागणीत खोल अर्थ आहे. याशिवाय त्यांच्या जीवनाला स्थैर्य येण्यासाठी आणखीन काही महत्त्वाच्या मागण्या आहेत त्या अशा:—

ज्या ज्या गावी भटक्या जमाती स्थायिक होतील, त्या त्या गावच्या गावठाणातील घरासाठी मोफत जागा व घरबांधणीसाठी मदत देण्यात यावी.

जेथे जेथे या भटक्या व विमुक्त जमाती स्थायिक होऊ शकल्या आहेत, तेथील त्यांच्या जागा त्यांना कायमच्या द्याव्यात.

भटक्या व विमुक्त जमातीवर पोलिसांकडून, व अन्य गावकरी लोकांकडून जो छळ, त्रास व अत्याचार होतो; त्यांचा योग्य तो बंदोबस्त करण्यात यावा.

या जमातींना आपला जीवन-चरितार्थ चालविण्यासाठी स्वतंत्र धंदा करण्यासाठी, धंद्याच्या साधनासाठी राष्ट्रीयीकृत बँकांकडून बिनव्याजी कर्जे द्यावीत, आणि त्यातील निम्मी रक्कम ' सबसिडी ' म्हणून देण्यात यावी.

या भटक्या व विमुक्त जमातीतील मुला-मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यात आश्रमशाळा काढण्यात याव्यात; आणि अशा आश्रमशाळेतून त्यांना शिक्षण, जेवण, कपडे व पुस्तके यांची मोफत सोय करण्यात यावी.

या जमातीतील शिक्षित व अशिक्षित तरुणांना नोकऱ्यांतील अटी शिथिल करून, त्यांना सरकारी व बिनसरकारी क्षेत्रांतील नोकऱ्यांत अग्रक्रम देण्यात यावा.

या भटक्या व विमुक्त जमातींना सरकारी पडीक जमिनी शेती करण्यासाठी अग्रक्रमाने देण्यात याव्या; आणि शेतीला उपयुक्त अशी जनावरे, अवजारे, बी-बियाणी हेही पुरवण्याची व्यवस्था करावी.

या व अशाच स्वरूपाच्या आणखीन काही मागण्या या जमातींना त्यांच्या जीवनात-स्थैर्य येण्यासाठी कराव्या लागतील. ज्यामुळे, ज्या कारणांनी या जमातींचे जीवन भटके झाले, उपरे झाले, परावलंबी झाले, ते नष्ट करून; त्याना स्वतंत्र, स्वावलंबी, आत्मोद्धाराचे, स्वयंप्रकाशित असे नवे जीवन जगावयाचे आहे. त्यांच्या या मागण्या मान्य झाल्या तरच त्यांना आत्मोद्धाराचे, स्वयंप्रकाशित असे नवे-जीवन जगण्यास संधी मिळेल. त्यातून त्यांची प्रगती व उन्नती होईल.

हा एक राष्ट्रीय प्रश्न म्हणूनच या भटक्या व विमुक्त जमातीच्या प्रश्नाकडे पाहून, या दृष्टीने समाजाने व शासनाने पुढची पावले टाकली पाहिजेत.

भटक्या व विमुक्त जमातींचे प्रश्न व त्यातून मुक्तीचा मार्ग याचे थोडक्यात असे स्वरूप आहे.

या भटक्या व विमुक्त जमातींच्या जीवनावर माझेच 'तडीपार', 'गावशिव' हे कथासंग्रह असून 'पारधी' ही कादंबरीही आहे. याशिवाय यांच्या जीवनावर मी अनेक कथा व लेखही लिहिलेले आहेत. या जमातीत मी निष्ठेने, श्रद्धेने काम केलेले आहे. त्याच अनुभवांतून. यांच्या जीवनावरील माझ्या कथा व कादंबरी साकारली आहे.

याच मिळालेल्या अनुभवातून मी या पुस्तकातील काही ललित लेख, 'स्त्री व किर्लोस्कर' या मासिकांतून १९७१-७२ या साली लिहिलेले होते. यातील दोन कथा याही वास्तव जीवनावर आधारलेल्या आहेत.

**शंकरराव खरात**

पुणे; फेब्रुवारी १९८३

# अ नु क्र म


| | | |
|---|---|---|
| १ | आम्हाला काम द्या... | ... १ |
| २ | आम्हाला स्थायिक होऊ द्या !... | ... ९ |
| ३ | ' आज इथं तर उद्या तिथं ' | ... १६ |
| ४ | एक संघर्ष | ... २५ |
| ५ | दगड-मातीशी झगडा | ... ३४ |
| ६ | एक वेगळं जग | ... ४० |
| ७ | सुगी तिथं पाखरं | ... ५३ |
| ८ | रात्री प्रकाश, दिवसा अंधार | ... ६१ |
| ९ | फासेपारध्याचं पाल | ... ६९ |
| १० | आता पुढं कुठं... ? | ... ७८ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

# १

## आम्हाला काम द्या....

' चोऱ्यामाऱ्या करणारा समाज ' असा आमच्यावर समाजाने आणि सरकारने शिक्का मारला आहे. त्याची आम्हाला लाज वाटते. हा कलंक धुऊन काढण्याची प्रतिज्ञा आम्ही केली आहे. आमच्या वाडवडिलांनी चोऱ्यामाऱ्या केल्या असतील. याच वाडवडिलांनी आम्हाला जन्म दिला याला आमचा इलाज नाही. पण आम्ही तरुणांनी ठरविले आहे की, हा घाणेरडा आरोप धुऊन काढायचा. त्यासाठी आम्ही आमच्या समाजबांधवांना चोऱ्यामाऱ्या करणे कसे वाईट आहे हे पटवून देऊ लागलो आहोत. ते त्यांना पटू लागले आहे. आम्ही पुण्यापुरते तरी सांगू की, पुणे शहरात असणाऱ्या आमच्या अडतीस कुटुंबांपैकी आता कुणीही चोरीमारी करीत नाही. आमचा चोरीमारीचा परंपरागत धंदा थांबल्याने आज आमच्यापैकी काही कुटुंबांवर उपासमारीचीही पाळी आली आहे. '

महाराष्ट्रीय मांगगारुडी समाजसेवक संघाचे कार्यकर्ते मोठ्या आवेशाने हे निवेदन करीत होते. हे कार्यकर्ते तरुण होते. यात संघाचे अध्यक्ष श्री. टी. टी. कांबळे, त्यांचे इतर सहकारी वसंत कांबळे, इंचूरकर, सुदाम कांबळे, राणू प्रभू कांबळे, खंदारे, सोनावणे वगैरे तेथे उपस्थित होते.

मांगगारुडी जमात भटकी जमात म्हणून ओळखली जाते. या जमातीवर आणखी एक ठपका असतो– ही जमात चोरटी आहे. कुठेही चोरीमारी झाली तरी पोलिसांची धाड पडते ती मांगगारुड्यांच्या वस्तीवर.

' रात्री-अपरात्री सुद्धा आमच्या वस्तीवर धाड पडते. पोलीस आमच्या बायकांना घेऊन जातात. वाट्टेल ते अभद्र बोलतात. पण एक असा प्रसंग घडला की मला या

सगळ्याची शरम वाटू लागली. तेव्हाच मी मनाशी निश्चय केला की आपण या व्यवसाया-पासून आमच्या लोकांना दूर करावयाचे. आमच्या जमातीला चांगल्या समाजाच्या जवळ आणावयाचे.'

मांगगारुडी संघाचे तरुण अध्यक्ष श्री. टी. टी. कांबळे सांगत होते.

शेजारचा आणखी एक मांगगारुडी तरुण म्हणाला, 'पोलीस लोक आमची उगीचच झडती घेतात, केवळ संशयाने चॅप्टर केस भरतात.'

या समाजातले एक तरुण श्री. वसंत रावजी कांबळे म्हणाले, 'पोलीस आमच्यावर केवळ मांगगारुडी म्हणून चॅप्टर केसीस भरून आम्हाला त्रास देतात. आमच्या लोकांविषयी असा संशय सर्वच समाजाला आहे.'

म्हणूनच या समाजाला नवीन आयुष्य देण्याची, या समाजावरचा कलंक धुवून हा समाज स्थिर करण्याची धडपड या समाजातील तरुण पिढीने चालविली आहे.

मांगगारुडी संघाचे अध्यक्ष श्री. टी. टी. कांबळे हे तरुण, तडफदार आणि ध्येयवादी कार्यकर्ते आहेत. पूर्वी ते एका कारखान्यात नोकरी करीत होते. तिथे साध्या वर्करपासून वर्करटीचरपर्यंत ते प्रगती करू शकले. तेथे युनियन बांधण्याचेही काम त्यांनी केले. केवळ आपल्या समाज बांधवांची संघटना बांधण्यासाठी, त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी, वाईट मार्गाला लागलेल्या आपल्या समाजबांधवांना प्रतिष्ठित करण्यासाठी त्यांनी कार्य सुरू केले आहे. त्यांनी नोकरी सोडून संघाचे काम हाती घेतल्यावर महाराष्ट्रात ठिकठिकाणी संघाच्या शाखा उघडल्या. कार्यकर्ते तयार केले. भारतातल्या इतर ठिकाणी मांगगारुडी समाजाची संघटना उभी करायला सुरुवात केली आहे.

ते म्हणतात, 'आता आमच्या जमातीतील तरुणांना या कार्याचे महत्त्व पटू लागले आहे. आमच्या संघाच्या शाखा ठिकठिकाणी उघडत आहेत. कार्यकर्ते तयार होत आहेत.'

पुण्याच्या पोलीस कमिशनरांना या कार्यकर्त्यांनी आपले प्रयत्न सांगितले आहेत. कमिशनरसाहेबांनीही पोलिसांना सहानुभूतीचा दृष्टिकोन घ्यायला सांगितले आहे. हे कार्यकर्ते म्हणतात 'आता निदान पुणे शहरात तरी आमच्या बायका चोऱ्या करीत नाहीत. इतरत्रही आमचे प्रयत्न यशस्वी होतील. हळूहळू आमच्यावरचा उचलेगिरीचा कलंक धुऊन निघेल. उचले उचले म्हणून हिणवलेल्या या जमातीतील अनेक तरुण आता प्रतिष्ठित व्यवसाय करू लागले आहेत. अशा लोकांची संख्या समाजात वाढू लागली की आमच्या समाजालाही प्रतिष्ठा लाभेल.'

१७ जुलै १९७१. त्या दिवशी मांगगारुडी समाजाच्या इतिहासातला पहिला मोर्चा पुण्यासारख्या ऐतिहासिक शहरात निघाला. ऐन दुपार होती. मोर्चातील स्त्रीपुरुष अनवाणी पण अंतःकरणात एक नवी उमेद आणि डोळ्यांत एक नवा प्रकाश घेऊन मोर्चात सामील

झाले होते. मोर्चातील कार्यकर्ता नेता आपल्या कडक, करड्या आवाजात एक एक घोषणा देत होता–

" आम्हाला काम द्या ! भाकरी द्या ! "
" आम्हाला घर द्या ! निवारा द्या ! "
" आम्हाला मानसन्मानानं जगू द्या ! "
" आम्ही चोरीचा, पाकीटमारीचा धंदा सोडला आहे. "

मांगगारुड्यांच्या जीवनातील आपल्या मागण्यांसाठी काढलेला हा पहिलाच मोर्चा होता. त्यांच्या मागण्याही नवीन होत्या. त्या मागण्यांत नवे जीवन दिसत होते. हा मोर्चा त्यांच्या जीवनात नवे युग निर्माण करणारा होता. म्हणूनच त्या रणरणत्या उन्हात मोर्चेवाल्यांच्या चेहऱ्यांवर उत्साह ओसंडत होता.

आदल्या रविवारीच वाडीवर भावकीची बैठक झाली होती. तिथे मोर्चा मिरवणूक काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यांनी नव्या जीवनाची सुरवात करावयाचे ठरविले होते.

इतर भटक्या जमातीप्रमाणे मांगगारुडी जमातीत कुठलाही महत्त्वाचा निर्णय त्यांच्या भावकीच्या बैठकीतच घेतला जातो. त्या बैठकीला भावकीतले पंच, कारभारी मंडळी हजर असतात. अशा बैठकीत जमातीतल्या अनेक प्रश्नांचा, अनेक गुंतागुंतीच्या मुद्यांचा खल होतो. तासन् तास चर्चा अशा बैठकीत चालते. बैठकीतला निर्णय कोर्टाच्या न्यायाधिशाच्या निर्णयासारखा भावकीत मानला जातो. अशा भावकीतल्या पंचांच्या बैठकीत जमातीतल्या लग्नाचे, सोडचिठ्ठीचे, जातींच्या इतर प्रश्नांचे निर्णय लागतात. भावकीच्या निर्णयाला या जमातीत मोठे महत्त्व असते. भावकीत पंचांनी असा घेतलेला निर्णय जमातीवर, जमातीतील व्यक्तीवर बंधनकारक असतो. तसाच हा मोर्चाचा निर्णय.

आपल्या नव्या प्रकारच्या मागण्यांसाठी मांगगारुड्यांनी काढलेल्या त्या मोर्चाचे रुपांतर जाहीर सभेत झाले तेव्हा त्यांचा नेता जे बोलला त्यातून या समाजाची सद्यःस्थिती सहज प्रकट होत होती. तो तरुण कार्यकर्ता आपल्या भाषणात म्हणाला, 'आज आपण मागण्यांचा मोर्चा काढून नव्या जगात आलो आहोत. आजपासून आपण माणसात आलो आहोत. आपण आपल्या कष्टावर जगत असताना, आजूबाजूचा समाज आपल्याकडे संशयित नजरेनं पाहतो. गुन्हेगारांच्या ओळीत बसवतो. हा आपल्यावर मोठा अन्याय आहे. अगदी ब्रिटिशांच्या काळापासून या समाजाने आपल्या कपाळी मारलेला डाग आपण पुसून काढला पाहिजे. वास्तविक एखाद्या व्यक्तीने गुन्हा करावयाचा व त्यासाठी सर्व समाजाला गुन्हेगार, दोषी ठरवावयाचे हा जगाचा उलटा न्याय आम्हाला मान्य नाही. सर्वच समाजात-जमातीत गुन्हेगार असताना आमच्याच कपाळी हा शिक्का का ? या अन्यायाविरुद्ध आम्ही झगडणार आहोत.'

तो कार्यकर्ता शेवटी आपल्या भाषणात म्हणाला, ' मी या सरकारला व या समाजाला जाहीरपणे सांगतो की, आम्ही चोरीचा धंदा सोडलेला आहे. आता आम्हाला पोटासाठी दुसरा कामधंदा द्या.

अशी मागणी करून त्या कार्यकर्त्याने सरकारी अधिकाऱ्याला दिलेले निवेदन वाचून दाखविले. त्यांच्या मागण्या होत्या :

आमचा पिढ्यान् पिढ्यांचा भटकेपणा घालवून सरकारने आम्हाला स्थिर जीवन निर्माण करून द्यावे.

आम्हाला घरे बांधण्यासाठी गावठाणात जमीन द्यावी.
स्थायिक झालेल्या आमच्या लोकांना सरकारने शेतीसाठी पडीक जमिनी द्याव्यात.
सरकारने आम्हाला काम-धंदा मिळवून द्यावा.
आम्हाला सरकारी-बिनसरकारी कारखान्यात, डेपोत नोकऱ्या द्याव्या.
आमच्या मागे असलेला पोलिसांचा त्रास, छळ याचा सरकारने बंदोबस्त करावा.
सरकारने नवीन छोट्याछोट्या धंद्यांना आम्हाला बँकेकडून कर्जे द्यावीत.
आमच्या मुला-मुलींसाठी सरकारने आश्रमशाळा काढून, शिक्षणाची सोय करावी.

मांगगारुडी समाजाच्या आजच्या काही मागण्यांचा त्या निवेदनात उच्चार करण्यात आला होता. त्या समाजाच्या दुःखांचे, अडचणींचे व प्रश्नांचे व त्यावर उपाय सुचविणारे हे निवेदन होते.

मांगगारुडी हे मागासलेल्या वर्गापैकी असून ती एक भटकी जमात म्हणून ओळखली जाते. या जमातीचे वास्तव्य प्रामुख्याने महाराष्ट्रात असून थोड्याफार संख्येने महाराष्ट्रातील बहुतेक जिल्ह्यांत आहे. ही जमात महाराष्ट्रातील इतर जाती-जमातींपैकीच एक मूळ रहिवाशी अशी मानली जाते. अतिप्राचीन काळी जेव्हा महाराष्ट्रभर इतरांच्या स्वाऱ्या झाल्या त्या वेळी या जमातीचे जीवन अस्थिर झाले. आपल्या रक्षणासाठी ही जमात ठिकठिकाणी भटकू लागली, असे या जमातीतील काही जाणते लोक सांगतात.

या मांगगारुडी जमातीतील काही कुटुंबे आज कुठे कुठे स्थायिक झालेली दिसतात. पण अद्याप काही काही कुटुंबे आज इथे तर उद्या तिथे अशा भटक्या अवस्थेतच आपले जीवन जगतात. या जमातीला मुख्य असा काहीच व्यवसाय राहिलेला नाही. त्यामुळे पोटासाठी मजुरीपासून तो इतर मिळेल तो व्यवसाय या जमातीतील स्त्री-पुरुष करतात.

विशेषतः प्राचीन काळी ही जमात इकडून तिकडे भटकत असताना जीवन जगण्यासाठी अनेक व्यवसाय, उद्योगधंदे करण्याचा या जमातीवर प्रसंग येत होता. अशातच या जमातीतील लोक ' हातचलाखीचा ' ( जादूगिरीचा ) व्यवसाय करीत होते. या व्यवसायात ते नाग खेळविणाऱ्या गारुड्याचाही धंदा करत. म्हणून या जमातीला 'मांगगारुडी' असे नाव पडले असल्याचे समजते. तशी माहिती काही जाणत्यांच्याकडून मिळते.

इतर कोणत्याही जातीजमातीत पोटजाती असतात, तसेच या मांगगारुडी जमातीतही पोटजाती आहेत, असे सांगितले जाते. त्यातील काही 'उचले' आहेत, तर काही 'धंदेवाले' आहेत.

धंदे करणारे मांगगारुडी म्हशी व इतर मोठी जनावरे विकण्याचा, विकत देण्या-घेण्याचा धंदा करतात. त्यालाच ते दलाली व्यवसाय किंवा 'हेडी' व्यवसाय म्हणतात. हे धंदे करणारे मांगगारुडी लोक भाकड म्हशी विकत घेतात. अशा सड्या-भाकड म्हशी गाभण होऊन, दिवस भरून विण्याच्या दिवसापर्यंत सांभाळतात आणि नंतर त्या आठवड्याच्या बाजारात विकतात. अशी गाभण, दिवस भरत आलेली म्हैस विकली असता मांगगारुड्यांना चांगली रक्कम मिळते. जनावराच्या दलालीचा व्यवसाय करणाऱ्या या मांगगारुडी कुटुंबांना आठवड्याचा जनावरांचा बाजार भरणाऱ्या गावोगावी भटकत फिरावे लागते. बहुतेक मोटमोठ्या गावी जनावरांच्या आठवडे-बाजाराला असे लोक जातात.

चोरीमारीच्या संशयावरून या जमातीतल्या लोकांवर विशेषतः बायकांच्यावर खटले होतात. असे काही खटले मी स्वतः चालविले आहेत. या खटल्याच्या वेळी आरोपी प्रश्नोत्तरांतून जी माहिती देतो ती पुरेशी बोलकी असते. एका प्रसंगी एका बाईने दिलेली उत्तरे मला चांगली आठवतात.

पोलीस प्रॉसिक्यूटरनं ( सरकारी वकिलाने ) हवालदाराला प्रश्न केला,

'आपण या आरोपी बाईला ओळखता ?'

'होय !' हवालदाराचं उत्तर.

'या बाईला राहण्याचं घर आहे का ?'

हवालदार म्हणाला, 'माझ्या माहितीप्रमाणं हिला स्वतःचं राहण्याचं घर नाही. हे गावोगाव भटकतात !'

'या बाईला चरितार्थाचा काही धंदा आहे का ?'

'नाही ! या बाईला चरितार्थाचा काही धंदा नाही.'

त्यावर सरकारी वकिलानं हवालदाराला विचारलं,

'या बाईचा धंदा तरी काय आहे ?'

तोच हवालदार बोलला, 'गर्दीत स्त्रियांच्या पाटल्या काढणं, लॉकेट पळवणं असा चोरीचा धंदा करतात !'

'याबद्दल तुम्हाला आणखीन काही सांगायचंय ?' असा प्रश्न होताच हवालदार सांगू लागला–

'या बाया दोघीतिघी मिळून चोरीचा धंदा करतात. बस स्टॉप, रेल्वे-स्टेशन, जत्रा, अशा गर्दीच्या ठिकाणी या बाया उभ्या असतात. गर्दीत घाईची वेळ-प्रसंग पाहून चलाखीनं या चोरीचा धंदा करतात. डोळ्याची पापणी लवते न लवते तो त्या गळ्यातील

वस्तू काढतात. इतकी त्यात चलाखी असते. त्यात एकजण बाई दागिना काढील, दुसऱ्या-जवळ 'पास' करील. मग तिसरी तो घेऊन एकदम पसार होईल. अशा रीतीने दागिने काढण्याचा व पसार करण्याचा धंदा या बाया करतात.'

त्यावर सरकारी वकिलांनी हवालदाराला प्रश्न केला,

'या बाईला पूर्वीच्या काही शिक्षा आहेत का?'

'हो आहेत. पाचसहा वेळा तिला शिक्षा झाली आहे. या बाईला पहिले पाचसहा दाखले आहेत!' असे सांगून हवालदारानं त्या बाईच्या पूर्वीच्या पाच-सहा दाखल्याचे कागदपत्र पुढे केले.

'ही बाई तुम्हाला कुठं सापडली?' पुढचा प्रश्न.

'ही बाई स्टेशन, बस-स्टॉपवर इत्यादी ठिकाणी संशयास्पद स्थितीत गुन्हा करण्याच्या इराद्यानं फिरत होती. म्हणून हिला हटकलं आणि पुढं चौकशी करता या बाईला चरितार्थाचे काही साधन नाही असे कळून आले. त्यात हिचे पूर्वीचे दाखलेही आहेत.'

"मग आपलं काय म्हणणं?"

"या बाईला जिल्ह्याच्या बाहेर हद्दपार करावं, म्हणून ही फिर्याद केली आहे."

त्यावर साहेबांनी तिला विचारलं,

'यांना काही विचारायचं आहे का?"

"साहेब! हवालदारानं हे सगळं खोटं सांगितलंय!" ती म्हणाली.

त्यानंतर इतर दोन तीन साक्षीदार झाले. आणि त्यापुढे तिचा जबाब सुरू झाला.

मॅजिस्ट्रेटसाहेबांनी तिला प्रथम तिचं नाव विचारलं. नंतर तिला तिचा पत्ता विचारला. तोच तिनं उत्तर दिलं,

"मी स्टेशनजवळ झोपडपट्टीत राहते!"

"तुमचा धंदा काय?"

"मिळेल ती मोलमजुरी मी करते!"

"तुमच्या घरात कोण कोण आहे!"

"मी, माझा नवरा व मुलं!"

तिनं आपल्या नवऱ्याचं नाव सांगताच साहेबांनी विचारलं,

"तुमचा नवरा कुठाय?"

त्यावर ती गप्प झाली. खाली पाहू लागली. त्यावर सरकारी वकिलानं इंग्रजीत साहेबांना तिच्या नवऱ्याच्या टावटिकाबद्दल सांगितलं. हे कळताच साहेबांनी गंभीर चेहऱ्यानं विचारलं,

"तुम्हाला मुलं किती आहेत?"

"तीन."

"मग आता तुमचा सांभाळ कोण करतं?"

" माझा भाऊ ! आय-बाप ! "

" ते काय करतात ? "

" ते शेती करतात ! "

तोच साहेबांनी तिला पुढचा प्रश्न केला.

" मग तुम्ही अशी शेती का करत नाही ? "

" साहेब ! तुम्ही आम्हाला जमीन मिळवून द्या ! आमीपण शेती करू ! आमाला काय झालं ! नायतर आमाला नोकरी मिळवून द्या ! "

अशी ही प्रश्नोत्तरे झाली. मांगगारुडी समाज कसा संकटांच्या चक्रात सापडलेला असतो याची कल्पना यावरून येऊ शकेल.

आजचा मांगगारुडी समाज जागृत झाला आहे. त्याला मानसन्मानानं जगावं असंच मनोमन वाटतं. आपल्याला इतर समाजानं उपेक्षित मानू नये, आपल्याकडे संशयित दृष्टीने पाहू नये म्हणून ते सुधारणेच्या मार्गाने जाऊ लागले आहेत. आपली मुले शाळेत पाठवीत आहेत. त्यांच्यातील अनेक मुले एस्. एस्. सी. पर्यंत शिकलेली आहेत. सोलापूर जिल्ह्यात तर या जमातीतील काही काही मुले कॉलेजमध्ये शिक्षण घेतात. विशेषत: सोलापूरला या जमातीतील एक मुलगी बी. ए. पास झालेली असून, ती नोकरी करते. पुढे एम्. ए. होण्याची तिची इच्छा आहे. कोल्हापूरला एकजण एम्. कॉम. झाला आहे.

मांगगारुडी समाज हल्ली सरकारी सवलतीचा फायदा घेऊन आपली सुधारणा करत आहे. काही सरकारकडून पडीक जमिनी मिळवून शेतीचा व्यवसाय करतात, तर काही सरकारी, बिन सरकारी खात्यात, डेपोत, कारखान्यात चौथ्या श्रेणीच्या नोकऱ्या करतात. त्यांत काही ड्रायव्हर, तर काही मेकॅनिक, फिटर, मजूर म्हणून काम करतात. लायक तरुण पोलिसातही भरती होऊ लागले आहेत.

हल्ली खेड्यांत स्थायिक झालेली कुटुंबे इतरांच्या शेतात मोल-मजुरीचीही कामे करतात. यांच्या कुटुंबातील स्त्रिया शेतातील भांगलणे-खुरपणे अशीही कामे करतात. तर काही काही रानातून सरपण-जळण आणून गावात विकतात.

मांगगारुड्यांची काही काही कुटुंबे अशी गावागावात स्थायिक झालेली आहेत. तशीच त्यातली अनेक कुटुंबे शहरात, तालुक्याच्या ठिकाणीही कायम स्वरूपात राहतात. काही झोपड्यांत राहतात. काही बऱ्या घरांत राहतात. अशांच्या जीवनात त्यांचा भटकेपणा जाऊन, निदान एका ठिकाणी राहण्यापुरता स्थिरपणा आलेला आहे.

हल्ली मांगगारुड्यांतील स्त्रिया शहराच्या ठिकाणी भाजीपाला विकण्याचाही व्यवसाय करतात. काहींनी सायकल दुकाने, पानपट्टीची दुकानेही चालविली आहेत. अर्थात अशा छोट्या-छोट्या धंद्यासाठी त्यांना भांडवलाची आवश्यकता आहे. ते बँकेकडून मिळवण्याची ते सतत खटपट करतात. तसेच त्यासाठी समाजकल्याण खात्याशी संपर्क ठेवून, आपल्या

मागण्या मिळविण्यासाठी त्यांच्यातील कार्यकर्ते सतत खटपट करीत आहेत. या समाजातील नवीन तरुण कार्यकर्ते या समाजाला नवीन सुधारणेच्या, मानसन्मानाने जगण्याच्या मार्गाने नेत आहेत आणि हा मांगगारुडी समाज त्यांच्या पाठीमागे जात आहे. यासाठी त्यांनी आपल्या समाजाची संघटना उभी केली आहे. त्या संघटनेमार्फत ते आपली सर्वांगीण सुधारणा करण्याचा प्रयत्न करतात, हे विशेष होय.

मांगगारुडी समाजाची आजची स्थिती अशी आहे. स्थायिक झालेले जरा बऱ्या परिस्थितीत असले तरी एकूण सर्व जमात उपेक्षित, अडाणी आणि अस्थिर आहे.

या जमातीच्या जीवनाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न करणाऱ्या या कार्यकर्त्यांची मुख्य तक्रार आहे ती आपली जमात 'भटकी' आणि 'गुन्हेगार' ठरविली गेली आहे याबद्दल. सरकारने हा शिक्का बदलला पाहिजे आणि समाजाने दृष्टिकोण बदलला पाहिजे अशी त्यांची मागणी आहे.

'तुम्ही म्हणता की तुमच्यातल्या माणसांनी आता चोऱ्यामाऱ्या करण्याचा धंदा सोडला आहे ना?' मी या कार्यकर्त्यांना असे म्हणताच तो म्हणाला,

'ते खरं आहे, जगातून चोरीमारी अजिबात नाहीशी झाली आहे काय? आमच्या जातीतल्या माणसांना आता इतक्या दिवसांची सवय. ती एकदम कशी जाईल? पण जर असा कोण चोरी करणारा आम्हाला दिसला तर आम्ही दयामाया नाही दाखवणार. त्याला किंवा त्या बाईला आम्ही सरळ पोलिसाच्या ताब्यात देणार.' या कार्यकर्त्यांनी सांगितले.

आपल्या मागण्यांविषयी बोलताना हे कार्यकर्ते म्हणत होते– आम्हाला धंदा करायचा आहे. पण बारक्याशाही धंद्यासाठी भांडवल लागते, ते कुठून मिळणार? बँकांनी आम्हाला लहानसहान कर्जे द्यावी. पडीक जमिनी द्याव्या. घरासाठी कर्जे द्यावी. आम्हाला स्थिर व्हायचे आहे. आम्हाला आता हे जीवन नको. आम्हाला आमच्या पोराबाळांना शिक्षण द्यायचे आहे. आमचे थोडेफार शिक्षण झाले म्हणून आम्हाला प्रगतीसाठी धडपड करायची बुद्धी झाली आहे. चोऱ्यामाऱ्या करणारा समाज म्हणवून घ्यायला कोणाला आवडेल? आमच्या प्रश्नांकडे व दुःखांकडे सरकारने लक्ष द्यायला हवे, नाहीतर आम्हाला आंदोलन करावे लागेल. आम्ही स्वस्थ बसणार नाही.

अशा एका भटक्या, कलंकित ठरविलेल्या समाजाची ही नवे आयुष्य घडविण्याची धडपड समाजाने सहानभूतीने समजून घ्यायला हवी.

किर्लोस्कर : फेब्रुवारी १९७२

*

२

# आम्हाला स्थायिक होऊ द्या !....

पहाटेची शांत वेळ. मध्येच कोंबड्याची ' बांग ' कानावर पडते. त्याच शांत वातावरणात कुडमुड्याचा मंजुळ आवाज कानावर येतो. आवाजाला मध्येच धार येते. मध्येच चढतो, उतरतो. एका लयीत, मंजुळ सुरात. या कुडमुड्याच्या गोड आवाजाच्या पाठोपाठच धीर-गंभीर आवाजात देव-देवतांच्या नावांचा गजर होतो. पहाटे घरोघर, दारोदार फिरणारा हाच तो कुडमुड्या जोशी.

जोशी ही भटकी जमात आहे. याच जोशी जमातीतील कुडमुड्या जोशी ही एक पोट जमात.

पहाटेच्या वेळी घरोघर फिरून कुडमुड्या जोशी आपली हजेरी लावतो. पहाटे फिरताना त्याच्या डाव्या हातात काठी व कंदील असतो. त्याच काठीला घाटी किंवा घुंगरे लावलेली असतात. त्याच्या उजव्या हातात लहानसे कुडमुडे असते. पहाटेच्या वेळी तो दारोदार जातो तेव्हा तो भिक्षा मागत नाही. उजाडल्यावर सूर्याने तोंड दावल्यावर तो भिक्षा मागत जातो. त्यावेळी त्याला घरोघर तांदूळ, पीठ, धान्य, पैसे अशी भिक्षा मिळते. कुडमुड्या जोशी पूर्वी ग्रामीण भागात खेडोपाडी येत होता. दिसत होता. पण अलीकडे हा कुडमुड्या जोशी गडप झाल्यासारखा दिसतो.

त्यातलाच एक जाणकार त्याचे कारण सांगताना म्हणाला–

' हल्ली भिक्षा मागण्यावर सरकारचे बंधन आले आहे. त्यातच भिक्षा आखडत्या हाताने वाढण्याची किंवा मुळीच न वाढण्याची लोकांची प्रवृत्ती वाढली आहे. त्यामुळे

आम्हाला पोटापाण्यासाठी दुसरा मोलमजुरीचा मार्ग पत्करावा लागला आहे. काय करता? आता काळच पालटला!'

प्रामुख्याने महाराष्ट्रात जोशी या नावाची भटकी जमात प्रसिद्ध आहे. ही जोशी जमात अनेक पोट नावांनी ओळखली जाते. महाराष्ट्र सरकारने प्रसिद्धी केलेल्या भटक्या जमातीच्या यादीत बुडबुडकी जोशी, डमरूवाले जोशी, कुडमुडे जोशी, मैंडगी जोशी, सरोदे जोशी या वेगवेगळ्या पोटजातींची नोंद आहे. पण या जोशी समाजातील कार्यकर्ते व इतर जाणकार असे सांगतात की, 'जोशी समाजात मुख्य अशा चारच पोटजाती आहेत. ढवळा नंदिवाले जोशी, कुडमुड्या जोशी, मानकर जोशी आणि ठोक जोशी (होरा-जोशी).

## ढवळ्या नंदी

सुगीचा हंगाम भरात येतो. खळ्यात धान्याची मळणी चालते. वाऱ्याच्या वेगाबरोबर उफणी पाटीला वेग येतो आणि मोत्यासारख्या धान्याच्या राशीचा ढीग खळ्यात पडतो. याच भर सुगीसराईत ढवळ्या नंदिवाला आपल्या बैलावर बिऱ्हाड लादून गावात येतो. तो गावच्या धर्मशाळेत उतरतो किंवा बाजार पटांगणात झाडाच्या सावलीत मुक्काम ठेवतो. दुसऱ्या दिवशी दिवस उगवून वर आल्यावर आपल्या सजवलेल्या नंदीबैलाला घेऊन गावच्या मारुतीच्या देवळापुढच्या पटांगणात येतो. नंदिवाला ढोलग्याचा आवाज देतो. त्याबरोबर नंदीबैलाच्या गळ्यातील घाट्या-घुंगरांचाही आवाज खळखळतो आणि मग नंदिवाला सगळ्या गावाला हाळी देतो–

'ये आय पांढर! आयपांढरीचे मालक! तुमचं लेकरू तुमच्या दारात आलंय! त्याच्या पोटाला सुपानं चंदी घाला. देव तुमचं भलं करील!'

नंदिबैलाचा खेळ होतो. त्याला नंदिवाला आपल्या छाती-पोटावर खेळवतो. अन् ते मुके जनावरही आपले चारी पाय मालकाच्या पोट-छातीवर ठेवून उभे राहाते तेव्हा सगळे गावकरी आश्चर्याने तोंडात बोटे घालतात. या खेळात नंदिवाला एक एक प्रश्न विचारतो आणि नंदिबैल मान हालवून डोलवून, गळ्यातल्या घाट्या-घुंगरांचा आवाज करत 'होय' किंवा नाही' अशी उत्तरे देतो. शेवटी गावातल्या सुहासिनी स्त्रिया नंदिबैलाची पूजा करतात. सुपात आणलेले दाणे नंदिवाल्याच्या पदरात ओततात. त्यावर पाच दहा पैसेही देतात.

सगळे गाव–शिवार उकळून झाल्यावर नंदिवाल्याचा मुक्काम पुढच्या गावी हालतो. सुगीचे दिवस हेच त्याच्या कमाईचे दिवस! पावसाळ्यात मात्र ते आपल्या वस्तीच्या गावी राहातात!

सुगीसराई संपल्यावर हा ढवळानंदी कधीकधी शहरातही दिसतो.

## भविष्यवाले

मानकर जोशी हेही याच भटक्या जमातीतले. तरी ते बऱ्याच प्रमाणात स्थायिक झालेले आहेत. ते गावचे वतनदार असतात. ते मानसन्मानाने गावी राहतात. गावच्या इतर बलुतेदारांप्रमाणे हा मानकर जोशी मळ्यातील, शेतातील खळ्यावर हक्काने धान्य मागतो. हे जोशी भविष्यही सांगतात. त्यासाठी गावोगावीही फिरतात.

आपण आपल्या शहरातील सडकेने निघतो. त्या वेळी मध्येच एखादे सावलीचे झाड दिसते. त्या झाडाखाली वयाने निम्मा झालेला, दाढीचे केस करडे झालेला, कपाळावर गोपीचंदाचे पट्टे मारलेला, त्यावर अबीर-बुक्का लेवलेला, त्यातच गळ्यात माळ असलेला गृहस्थ आपल्या पांढऱ्या दांडीच्या चष्म्यातून समोरच आशेने बसलेल्या लोकांवर आपली नजर फिरवतो. त्याच्यापुढेच कुंडलीचा पट मांडलेला असतो. समोरच एखादे पंचांग पडलेले असते. काही वेळेला अशा गड्याच्या उजव्या बाजूलाच लहान पिंजरा असतो. त्यात फिक्कट रंगाचा, मुंड्या शेपटाचा पोपट असतो. तो आपल्या झाकलेल्या डोळ्यांची मध्येच उघडझाप करतो त्या धुळकट पिंजऱ्याच्या पुढेच वीस-पंचवीस कार्डांची चवड असते. हा ज्योतिषी म्हणजेच ठोक जोशी किंवा होरा जोशी होय.

हा होरा-जोशीचा ' होरा ' – भविष्य सांगणे हाच मूळ व्यवसाय. खेडोपाडी, गावोगाव, दारोदार भविष्य सांगत हिंडणारे याचपैकी बरेचजण असतात. ते हस्तरेषा पाहतात. पंचांग पाहूनही भविष्य सांगतात. पिंजऱ्यातल्या पोपटाकडून भविष्याचे पाकीट उचलून माणसाच्या नशिबातल्या गोष्टी सांगतात.

अशी या जोशी जमातीच्या सर्व पोटजातींची महाराष्ट्रभर वस्ती आहे. विशेषतः पुणे, सोलापूर, नगर, सातारा, सांगली, कोल्हापूर व मुंबई अशा ठिकाणी यांची वस्ती अधिक प्रमाणात दिसते आणि अलीकडे तालुका, जिल्हा अशा शहरांकडे ते अधिक संख्येने येत आहेत.

## बादशहा खूप झाला

जोशी समाजात अनेक दंतकथा सांगितल्या जातात. त्यांपैकीच एक विठ्ठलराव भोसले यांनी ' जोश्यां 'च्या महंतपणाची कथा सांगितली.

आदिलशहा बादशहाचा काळ.

आदिलशहा बादशहाची पत्नी बेगम गरोदर होती. या आमच्या भटक्या जोशी समाजातील एकजण गावोगाव भविष्य सांगत हिंडत होता. तो हिंडता हिंडता बादशहाच्या राजधानीत– सडकेवर, रस्त्यावर भविष्य सांगत, हाळी देत फिरत होता. तो आवाज देत देत राजवाड्याच्या समोरच्या रस्त्यावरून चालला. त्याचा आवाज ऐकून देवडीवरच्या पहारेकऱ्याने त्याला बोलावून घेतले आणि आत बादशहाच्या दरबारी नेऊन, त्याला

बादशहापुढे एक भविष्यकार ज्योतिषी म्हणून उभा केले. तेव्हा बादशहाने त्याला विचारले,

'काय रे, तू ज्योतिष सांगतोस ?'

'होय, सरकार!'

'मग सांग, माझ्या राणीला मुलगा होईल का मुलगी ?' बादशहाचा हा प्रश्न ऐकून जोशी खाली बसला. त्याने त्याच्या मनात दुर्गादेवीचे चिंतन केले व मग बादशहाला सांगितले, 'सरकार! राणीला मुलगा होणार!' शेवटी राणी प्रसूत झाल्यावर तिला मुलगाच झाला. त्यावर बादशहा जोश्यावर खूश झाला. त्यासाठी त्याने त्या जोशाला नऊ बिघे व चौदा चाहूर जमीन दिली. पुढे त्या बादशहाच्या राज्यात अनेक जोशी गेले.

अशीही एक दंतकथा सांगितली जाते. जोशी समाजातले काही वयस्कर गडी जोशी समाजाच्या कर्तबगारीच्याही काही गोष्टी सांगतात.

जोशी समाजातील काही हुशार, निष्णात गड्यांनी बहिर्जी नाईकाप्रमाणे पटाईत हेरगिरीची कामे केलेली आहेत. विशेषतः भविष्य सांगण्याच्या निमित्ताने मुसलमानी बादशहाच्या मुलखात जोशी समाजातील गडी फिरत होते. त्यावेळी हेरगिरी करून, महत्त्वाच्या गुप्त बातम्या मराठी राजांना व पेशव्यांना आणून देत. या कामगिरीबद्दल त्यांना शाबासकी व बक्षिसेही मिळत.

## भाविक मंडळी

जोशी समाजाचे मूळ दैवत दुर्गादेवी आहे, पण हीच 'दुर्गादेवी' महाराष्ट्रात वेगवेगळ्या नावाने वास्तव्य करून आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. दुर्गादेवीशिवाय राणूआई, खंडोबा, लक्ष्मीआई, भवानीआई, मरीआई, म्हसोबा अशाही देव-दैवतांची पूजा जोशी समाजातील लोक करतात. समाजातील अनेक लोक पंढरपूर, आळंदी, देहूला जातात. राम-कृष्णाचीही पूजा-अर्चा करतात. त्यांच्यात हल्ली बरीच मंडळी माळकरीही आहेत, त्यांतील काहीजण श्रावण महिना पाळतात व देवांची कथा-कीर्तनेही करतात. पुण्यातील जोशी समाजाचे एक पुढारी श्री. विठ्ठलराव भोसले हे श्रावण महिन्यात ग्रंथांचे पठण करतात. रामविजय, पांडव-प्रताप, भक्तिसार, भक्तिविजय, ज्ञानेश्वरी अशा ग्रंथांचे पठण करतात. भक्तजनांना ते ग्रंथांचे निरूपण करूनही सांगतात. सोलापूर, पंढरपूर व शिंगणापूर इत्यादी भागातही जोशी समाजाचे भाविक लोक श्रावणातील सप्ताह पाळतात. त्यांच्यातील तज्ज्ञाला 'पंडित' म्हणतात.

या जोशी जमातीतील लग्नपद्धतीबद्दल सांगताना त्यांच्यातील कर्ता कारभारी म्हणाला—

'मुलीचं स्थळ ठरल्यावर प्रथम आमच्यात साखरपुड्याचा समारंभ-विधी केला जातो. या साखरपुड्याच्या विधीच्या दिवशी आम्ही मुलाकडील पंच मंडळी मुलीच्या दारात जातो. आम्ही बरोबर साखरपुड्याचं लुगडं, खण, नारळ व इतर विधिसाहित्य नेतो.

प्रथम मुलीला हळद-कुंकू लावून बरोबर नेलेल्या लुगड्याचा पदर तिच्या अंगावर घालून, हळद लावून, नंतर आम्ही लग्नाचं पुढील बोलणं करतो. आमच्यात साखरपुड्याच्या दिवशी गोड जेवणाचा बेत होतो. त्याचा सर्व खर्च मात्र नवऱ्यामुलाचा असतो. त्यानंतरचा लग्नाचा खर्च ज्या त्या पार्टीनं आपापला करावयाचा असतो.'

लग्नकार्यासंबंधी इतर माहिती सांगताना ते म्हणाले,

'आता आमच्यातही पूर्वीचे लग्नाचे पाच दिवस गेले. आता आम्ही नव्या काळाला व नव्या युगाला धरूनच एकाच दिवसात लग्न उरकतो. सकाळी हळदी लागतात. सायंकाळी गोरज मुहूर्तावर लग्न लागतात. अर्थात आमच्यात ब्राह्मण लग्न लावतो. त्यासाठी त्याची दक्षणा आम्ही देतो.'

## भटकेपणाचा शाप

भटकेपणाच्या जीवनामुळे जोशी जमातीच्या वाट्याला अडचणीच अधिक येतात. जीवनात स्थैर्य मुळीच नाही. त्यातच राहण्यासाठी कायमचा निवारा नाही. वाकळ-गोधड्या वा तरटाच्या पालात गावोगाव भटकत दिवस काढावयाचे! त्यात ऊन-वारा, थंडी-पाऊस याला तोंड देणे आलेच! नाहीतर गावात धर्मशाळा असेल तिथे मुक्काम.

जोशी जमातीचा वडिलोपार्जित व्यवसायच असा की, तो चालविण्यासाठी गावोगाव हिंडावे लागते. पण त्या हिंडण्याभटकण्यामुळे धंद्यात, व्यवसायात स्थैर्य कधी आले नाहीच. त्यापुढची भरभराट तर बाजूलाच! असा हा जोशी पोटासाठी आपल्या धंद्याच्या पाठीमागे गावोगाव भटकत राहिला म्हणूनच तो आर्थिक, शैक्षणिक व इतर प्रगतीच्या दृष्टीने मागासलेला राहिला.

## विकासाची संधी द्या

मात्र जोशी समाजातील कळत्या व कर्त्या तरुणांना आज त्यांच्या या मागासलेल्या जीवनाची कल्पना आली आहे. म्हणूनच यांचा समाज आज तालुक्याच्या, जिल्ह्याच्या व पुण्या-मुंबईसारख्या ठिकाणी आपल्या जीवनाच्या प्रगतीच्या वाटा धुंडाळत येत आहे.

शहरात व मोठ्या गावात कायमचे राहण्यासाठी यावयाचे म्हणजे वेगळ्या परिस्थितीला तोंड देणे आलेच! त्यात वडिलोपार्जित व्यवसायावर सर्व कुटुंब कसे जगणार? याच प्रश्नातून वाट काढण्यासाठी या समाजातील अनेक तरुण आज चरितार्थासाठी वेगवेगळे व्यवसाय करतात. त्याचं कुणी चतुर्थ श्रेणीच्या सरकारी नोकरीत शिरले, तर कुणी सैन्यात गेले. कुणी फॅक्टरी डेपो, गॅरेजेस व इतर अन्य ठिकाणी मेकॅनिक, फिटर, मजूर, पोलीस अशा स्वरूपात नोकऱ्या करतात.

त्यातच कुणी कुणी म्हशी वगैरे जनावरांचा दलालीचा व्यवसाय करतात. त्यात कुणी रंगारी म्हणून, तर कुणी कपड्यांना रफू करण्याची कामे करतात. पण अशा धंद्यात व नोकरी मिळविण्यात थोड्यांनाच यश आले आणि त्यातले बहुसंख्य तरुण आज बेकार

असून चरितार्थासाठी, नोकरीधंद्यांच्या शोधात भटकत असतात. नोकरी मिळत नाही अशी तक्रार करतात.

नोकरीसाठी वणवण फिरून नोकरी न लागल्याने निराश झालेला एक तरुण मोठ्या वैतागाने म्हणत होता, 'वशिल्याशिवाय कुठेच नोकरी लागत नाही! आता अशा अवस्थेत आम्हाला कुणाचा आधार मिळणार?'

असे निराशेचे उद्‌गार काढणाऱ्या तरुणांना व लोकांना या समाजाचे पुण्यातील एक कार्यकर्ते श्री. विठ्ठलराव भोसले मार्गदर्शन करतात. त्यांच्यासाठी समाजकल्याण ऑफिसात व इतर संबंधित कचेऱ्यांत नेहमीच हेलपाटे मारत असतात.

श्री. भोसले यांनी जोशी समाजातील स्त्रियांना 'नेहरू शिवण सेंटर'च्या मार्फत टेलरिंगचे–शिलाईचे– क्लासेस काढून शिक्षण दिले व त्यांचा कोर्स पुरा झाल्यावर या स्त्रियांना प्रत्येकी एक शिवण-यंत्र समाजकल्याण खात्यामार्फत मिळवून दिले. त्या स्त्रिया हल्ली त्या मशिनवर टेलरिंगची कामे करतात होरा-जोशी स्त्रियाही गोधड्या शिवून देतात.

श्री. विठ्ठलराव भोसले हे मोठे जिद्दीचे कार्यकर्ते आहेत. त्यांच्याशिवाय, महाराष्ट्रातील जोशी समाजात अनेक कार्यकर्ते असून ते आपापल्या भागात सामाजिक कार्यात काम करतात. त्यात मुख्यत्वे, कॉर्पोरेटर नारायण निकम (पुणे) श्री. दशरथ मोरे, बाहेरील जिल्ह्यात, शहरात कार्य करणारे खंडू सरोदे, संतराम भोसले, सोपान महाराज, चौगुले तसेच श्री. दाभोळकर, श्री. काटे, श्री. काळे, श्री. सुर्वे हेही प्रमुख सामाजिक कार्यकर्ते आहेत.

## सवलती आहेत! पण–

शहरात राहावयास आलेले काही भाड्याने खोल्या घेऊन राहतात तर, काही झोपड्यांतही राहतात. त्यांचा राहण्याचा प्रश्न तसा अवघडच आहे. हौसिंग को-ऑपरेटिव्ह सोसायट्या निर्माण करून त्यांचा राहण्याचा प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

'आज इथं तर उद्या तिथं' अशा भटक्या जीवनात जोशी समाजाच्या मुलामुलींचे कसे काय शिक्षण होणार? म्हणून तर शिक्षणात मागासलेपणा आहे.

शहरात, तालुक्याच्या ठिकाणी स्थायिक झालेल्या जोशी कुटुंबांची मुलेमुली हल्ली शाळेत जातात. त्यांतील कित्येक मुलांचे मराठी सातवीपर्यंत शिक्षण झालेले आहे. काही-काही मुले एस्. एस्. सी. परीक्षा पास झालेली आहेत. काही मुले कॉलेजातही जातात. सोलापूरसारख्या ठिकाणी जोशी समाजातील मुले मराठी ट्रेंड असून त्यांनी स्वतःच्या हिमतीवर शहरात एक शाळा चालवली आहे. समाजातील काहीजण प्राथमिक शाळेत शिक्षकही आहेत.

या समाजातील कार्यकर्त्यांनी मुलांच्या शिक्षणाच्या संबंधी एक महत्त्वाची अडचण पुढे मांडली; तिचा खरोखरच सरकार-दरबारी विचार झाला पाहिजे. ती अडचण अशी– 'आमची जोशी भटकी जमात. पोटापाण्याच्या उद्योगाच्या दृष्टीने आम्ही शहर

किंवा तालुक्याच्या वा मोठ्या गावीच स्थायिक होण्याचा प्रयत्न करतो. स्थायिक झाल्यावर आपल्या मुलांना शिक्षण द्यावे म्हणून आम्ही तेथील सरकारी किंवा बिनसरकारी विद्यार्थी-वसतिगृहात ठेवण्यासाठी धडपडतो. अशा बोर्डिंग-वसतिगृहात मुलगा राहिला तर त्याची सर्व दृष्टीने सोय होऊन मुलगा लाईनीला लागेल अशी आमची खात्री असते. पण आमच्या मुलांना अशा शहराच्या वसतिगृहात भटक्या जमातीचे असूनही प्रवेश मिळत नाही. त्याचे कारण असे सांगतात की, सरकारी नियम असा आहे की, ' जेथे मुलांचे पालक, आईबाप राहातात त्याच गावात जर हायस्कूल असेल, तर त्या मुलांनी आपल्या घरी राहूनच हायस्कूलचे शिक्षण घ्यावे. जेथे हायस्कूल नसेल त्याच परगावच्या मुलांना अशा विद्यार्थी-वसतिगृहात प्रवेश मिळतो. ' सरकारच्या या अटीमुळे आमची जोशी जमात व अन्य भटक्या जमातींच्या मुलांना सरकारी मदतीने चालणाऱ्या वसतिगृहात प्रवेश मिळत नाही. त्यामुळे आमच्या मुलांना शिक्षणाच्या दृष्टीने सरकारी मदतीचा, सवलतीसोयींचा काडीइतकाही उपयोग होत नाही. सरकारच्या या नियमात दुरुस्ती केली पाहिजे व आमच्यासारख्या भटक्या लोकांना नियमाचे बंधन ठेवू नये अशी आमची मागणी आहे.

## पुण्यातील उदाहरण

श्री. विठ्ठलराव भोसले त्यांच्या समाजातील एका मुलाला सरकारी वसतिगृहात प्रवेश मिळावा म्हणून खटपट करीत होते. त्यात त्यांना आलेला अनुभव त्यांनी शेवटी दाद मिळावी म्हणून वृत्तपत्रात प्रसिद्धीला दिला होता. तो असा–' मी ता. २८–४–१९६७ रोजी पुण्यातील जोशी जातीच्या मुलाला घेऊन पुणे येथील वसतिगृहात आठवीच्या वर्गात प्रवेश मिळावा म्हणून गेलो असता वसतिगृहाचे मुख्य साहेब यांनी सांगितले की, पुणे येथे राहणाऱ्या मुलांना प्रवेश देता येत नाही. त्याप्रमाणे त्यांनी लेखीही दाखवले. त्या मुलाची आई विधवा असून तिला एकच मुलगा आहे व ती बाई गोधड्या शिवून मुलाचे व आपले पोटापाण्याचे भागवीत असते. मुलाचे शिक्षण सरकारी सवलतीच्या फायद्याने वसतिगृहात ठेवून पुरे करील; पण प्रवेश मिळत नाही, असे समजल्याने तो मुलगा व त्याची आई नाराज झाली. मुलास शिक्षण घेण्याची फार हौस होती. त्या मुलाने म्युनिसिपल शाळेतून सातवीपर्यंतचे शिक्षण कसेबसे पुरे केले. नंतर त्याच्या आईने मुलास सांगितले की, ' बाळ ! आतापर्यंतचं शिक्षण झालं एवढंच पुरं कर ! मला नेहमी गोधड्या शिवायचा धंदा लागत नाही व माझ्या उतारवयामुळं मला पूर्वीसारखं अधिक फिरवतही नाही. म्हणून तुझ्या पोटाचं पोषण होणं कठीण होईल. तू शाळेत जाऊ नकोस ! ' त्यावर तो मुलगा रडू लागला व म्हणाला, ' मग सरकारनं आमच्यासाठी एवढ्या सोयी करून त्याचा मला काय उपयोग ? मी भटक्या जातीचा, त्यात आता शहरात राहिलो– त्यात काय गुन्हा केला ? '

किर्लोस्कर : जून १९७२

# ३

## ‘ आज इथं तर उद्या तिथं ’

सकाळच्या कोवळ्या, हासऱ्या उन्हात हसऱ्या चेहऱ्यानं लमाण स्त्रिया आपापल्या झोपडीच्या बाहेर पडल्या. यांच्या डोईवरील पाटीत, धडप्यात दुपारच्या भाकरी बांधून घेतलेल्या होत्या. त्या आपल्या झोपड्यांच्या वस्तीतून निघालेल्या पाऊलवाटेला लागल्या. हीच पाऊलवाट मोठ्या सडकेला मिळत होती. सकाळच्या प्रसन्न वेळी, लमाण गडी-बाया रोजच्या पोटाच्या कामाला निघाल्या होत्या. त्यांच्याबरोबर त्यांची लहानमोठी मुलंही होती.

स्त्रिया पुढं चालत होत्या. त्यात गौरवर्णी मोती अन् लछमी होती. गव्हाळ रंगाची चंद्री होती. सावळ्या वर्णाची रुपी, हसली व झिंगलीही होती. आणखीन काही स्त्रिया होत्या. त्यांत विवाहित होत्या, विधवाही होत्या. अविवाहित मुलीपण होत्या. मुलीत कमळी चमली, फुली या मुली होत्या. लग्नाच्या वयाला आलेल्या दिसत होत्या. चालताचालता स्त्रियांची बडबड चालली होती. त्यात मध्येच त्या खळखळून हासत होत्या. रूपवान स्त्रियांचं सौंदर्य त्या हास्यात खुलत होतं.

त्या सकाळच्या उन्हात लमाण स्त्रियांची वैशिष्ट्यपूर्ण वेशभूषा वाटेवरच्या माणसांच्या नजरेला आगळ्याच पद्धतीची वाटत होती. त्यातच सकाळचं कोवळं ऊन. त्या सोनेरी उन्हात लमाण स्त्रियांच्या चोळी अन् डोईवरून घेतलेल्या शालेवरील ( पटवा ) लहानमोठी काचेची भिंगं किती चमचमत होती. त्याचे कवडसे उन्हात परावर्तित होत होते. त्यांचे हात तर रंगानं हस्तिदंती दिसणाऱ्या गोट-पाटल्यांनी झाकले होते. कुणाचे हात मनगटा-

पासून दंडापर्यंत झाकले होते. कुणाचे हात मनगटापासून कोपरापर्यंत या हस्तिदंती रंगाच्या पाटल्यांनी झाकलेले दिसत होते. त्यातच हातांत चांदी तांब्या-रुप्याचे गोट-बांगड्या होत्याच अन् पायांतदेखील तांब्या पितळेचे, चांदी-रुप्याचे विशिष्ट डौलदार आकाराचे तोडे, कड्या, पैंजण दिसत होते. दोघींच्या नाकात नथ दिसत होती. गळ्यात सौभाग्य अलंकार लोंबत होता. याशिवाय चांदी-रुप्याच्या मणीमाळांनी गळा भरला होता. तो दागिन्यांचा भार छातीवर रुळत होता.

लमाण स्त्रियांची वेशभूषाच वैशिष्ट्यपूर्ण असते. त्या मोठ्या जाड कापडाचा गडद तांबूस, भगँवा किंवा हिरवा, नारंगी रंगाचा लंगा झगा ( घागरा ) नेसतात. लंगा ( घागरा ) मोठा घोळदार असतो. त्याला अनेक चुण्याचुण्या असतात. त्यामुळंच तो घोळदार, घेरेदार दिसतो. त्या घोळदार, घेरेदार लंग्यानं ( घागऱ्यानं ) लमाणी स्त्रीची चालपण डौलदार दिसते या लंगा-घागराच्या काठाला रंगीबेरंगी दोऱ्याचं विणकाम मोठं नक्षीदार केलेलं असतं. या स्त्रियांकडे होळीच्या सणाला, लग्नसमारंभात परिधान करण्यासाठी खास ठेवणीच्या चांगल्या लंगा-घागरा अन् चोळया शाली ( पटवा ) असतात.

लमाण-स्त्री अंगात गडद रंगाची त्यांच्या खास शैलीची फॅशनची चोळी घालते. चोळीला—छातीवरच्या कपड्याला रुपया-पैशाच्या आकाराचे लहान-मोठे आकर्षक चमचमणाऱ्या भिंग-काचा लावलेल्या असतात. एकदोन भिंग मात्र हातातल्या लहान बांगड्यांच्या आकाराचे पण असतात. उगवत्या सूर्याच्या सामने चालताना ती भिंगे उन्हात भरतीच झगमगतात. चोळीच्या छातीवरच्या कापडावर जसे भिंग असते, तसेच चोळीच्या दंडावरील कापडावरही भिंगे लावलेली असतात. या चोळीनं तिचा उरोज भाग झाकला जातो, पण तिची पाठ मात्र उघडीच असते. चोळी पाठीमागे बंधांनी बांधलेली असते. बंधाला चांगले आकर्षक गोंडेही असतात.

लमाण-स्त्री डोईवर चोळीच्याचप्रमाणं गडद रंगाची शाल ( पटवा ) घेते. डोईवरच्य शाल-पटव्याचं कापडही लंग्याच्या-घागऱ्याच्या कापडागतच गडद रंगाचं पण थोडं पातळा असतं. डोईवर घेतलेली शाल काचेचं लहान-मोठे भिंग बसवूनच विणलेली असते. शालेच्या ( पटव्याच्या ) काठा-काठानं ओळीनं भिंगे विणेत बसविलेली असतात. डोईवरून पुढे अंगा-खांद्यावर अन् पाठीवर येणाऱ्या सर्व पदरावर भिंगे लावलेली असतात आणि तऱ्हेतऱ्हेच्या रंगाचं नक्षीदार विणकामही केलेलं असतं. हीच पटवा— शाल डोईवर घेऊन ही स्त्री आपल्या घराबाहेर पडते. डोईवरच्या या शालीचा घोळ तिच्या कंबरेच्या खालीपर्यंत लोंबतो.

अशी ही लमाण-स्त्रीची खास वैशिष्ट्यपूर्ण वेषभूषा असते, आणि त्यामुळंच तिचा वेगळाच असा डौल दिसतो. लमाण-स्त्रीची ही वेषभूषाच लोकांना वैशिष्ट्यपूर्ण वाटते. म्हणूनच तिच्या वेषाकडं नजरा वळतात.

वाटेला लागलेल्या लमाणी-स्त्रियांतील काही विवाहित होत्या. त्यांच्या कडेवर मुलं पण होती. त्यांच्या हातांतल्या हस्तिदंती रंगाच्या पाटल्या-गोठ ( बलीया ) दंडापर्यंत होत्या. त्यांच्या गळयातून छातीवर लोंबणारा सौभाग्य-अलंकार होता. त्यांच्या कानावरून पुढं लोंबणाऱ्या आगळ्या शैलीच्या वेण्याला चांदी-रुप्याचे झुबे-झूल लोंबत होते. पायचालीच्या गतीनं ते मागंपुढं हालत होते. मागपण बांधलेल्या केसांत दागिने बसविलेले होते.

त्यात विधवाही होत्या. त्यांच्या अंगावर मात्र सौभाग्य-अलंकार नव्हते. कानावरच्या लोंबत्या वेणीला पण झूल, सौभाग्य-अलंकार नव्हते. लहान लहान आठ-दहा वर्षांच्या मुली पण त्यांच्याबरोबर होत्या. त्यात कनळी, चमली फुली होती. त्यांच्या हातांत हस्तिदंती गोठ होते. पण ते गोठ ( बलीया ) कोपराच्या खालीच एकदोन होते. त्यांच्या वेण्याला झुल झुबे नव्हते. त्या अविवाहित होत्या.

मात्र लहान मुली– यांच्या अंगावर मात्र सौभाग्य-अलंकार सोडून इतर स्त्रियां-सारखेच कपडे, अन् चांदी-रुप्याचे दागिने, पायातल्या कड्या-तोडे, गळयातल्या मणी-माळा होत्या. त्या रंगीबेरंगी अन् चमचमणाऱ्या भिंगांच्या कपड्यांत लहान मुली श्रावणातल्या फुललेल्या फुलावर इतस्ततः उडणाऱ्या रंगीत फुलपाखरांसारख्या दिसत होत्या. लहानपणचं तेज, टवटवी त्यांच्या तोंडावर उमललेली होती.

कामावर निघालेल्या स्त्रिया-मुली आपल्या झोपड्या-वस्तीपासून लांब आल्या. मोठ्या सडकेला मिळाल्या. त्यांत घरातलं मुलाबाळांच्या पोटापाण्याचं आवरण्यात वेळ लागल्यानं काहीकाही स्त्रिया मागंमागं होत्या. त्या कामाच्या ओढीनं लगबग चालत होत्या. मध्येच मागं राहिलेल्या स्त्रीची हाक पुढच्या स्त्रीच्या कानावर पडत होती. त्याबरोबर ती मागलीला हात पाऊवून बिगीबिगी येण्याबद्दल सांगत होती.

लमाण-स्त्री सावळी, गौरवर्णाची असते, पण उन्हातान्हातील काबाडकष्टानं तिचा चेहरा रापल्यासारखा दिसतो. तिच्या चेहऱ्यावरची गौर-गव्हाळ कांती करपून गेल्यासारखी दिसते. आपल्या नवऱ्याच्या बरोबरीनं कुटुंबाच्या पोटासाठी श्रम करणारी ही लमाण-स्त्री अंगापिंडाने बांधेसूद आणि काटक असते. मुलंबाळं असलेली विधवा मुलांच्या पोषणासाठी गड्यासारखी कष्ट करते, काम करते. रोजचं कष्ट-काम केल्याशिवाय लमाणाच्या कुटुंबाचा रोजचा चरितार्थ भागूच शकत नाही. म्हणूनच लमाण गडी, त्याचप्रमाणं लमाण-स्त्री ही कष्टकरी, कामकरी स्त्री आहे. लमाण-स्त्री चुकून आपल्या झोपडीवर दिवसा दिसणार नाही. ती आजारीच असेल तर घरी पडून राहील. नाहीतर रोजच्या कामावर नियमानं हजर राहील. अशी ही लमाण-स्त्री कष्टाळू आहे.

पहिला मृगाचा पाऊस पडून गेला होता. रानात गवती कोंब फुलले होते. माळरानं हिरवीगार दिसत होती. त्यात लमाणांच्या वीस-पंचवीस झोपड्या त्या हिरव्यागार माळरानात उठून दिसत होत्या. कामासाठी शहरात आलेले लमाणी लोक शहरापासून लांब

चारपाच मैलांच्या अंतरावर राहतात. एकाच ठिकाणी अशा पंधरा-वीस, पंचवीस-तीस झोपड्यांची एकत्रित वस्ती असते. झोपड्या उभ्या करताना जवळ ओढ्या-नदीचं पाणस्थळ पाहून वसवतात. त्यात शहरापासून, गावापासून झोपड्या लांब वसवण्याचं कारण त्यांना त्यांचं स्वतंत्र जीवन जगता येतं. त्यातच त्यांची लहानमोठी गुरं-ढोरं, शेरडं-करडं असतात. त्यांचीही हिंडण्या-चरण्याची सोय रानातल्या रानात करता येते.

लमाणांचं जीवन भटकं असतं. काम मिळेल तिकडे लमाणांचा तांडा जातो. आज इथं तर उद्या तिथं असं यांचं जीवन असल्यामुळं इतर भटक्या जमातींप्रमाणंच लमाणांच्याही जीवनात स्थिरता, स्थैर्य नसतं.

लमाण-झोपडी प्रसिद्ध असते. ती गवताची, पाला-पाचोळ्यानं शाकारलेली असते किंवा तट्ट्याबांबूच्या झोपड्या असतात. आठ फूट लांब अन् सहा फूट रुंद किंवा यापेक्षा थोड्याशा लहान किंवा मोठ्या आकाराच्या झोपड्या असतात. लमाणाच्या झोपडीचं तोंड-दार अगदीच लहान असतं. झोपडीत आत-बाहेर करताना गडी-बायांना वाकून जावं लागतं, एवढं लहान, गुहेसारखं झोपडीचं तोंड असतं. याच लहानशा झोपडीत लमाणाच्या लेकरा-बाळांच्या कुटुंबाचा संसार असतो. भांड्या-कुंड्यांचा, कपडयालत्त्याचा त्यांचा संसार लहान असतो. त्यात लमाण ही भटकी जमात. गावापासून लांब तीनचार मैलांच्या अंतरावर पालं ठोकणार किंवा झोपड्या उभ्या करणार. त्यामुळं त्यांच्या जीवनात कायम निसर्गाचं सान्निध्य असतं. झाडं-झुडपं, माळरान, ओढे, नदी-नाले– असा निसर्ग त्याच्या झोपड्यांच्या आजू-बाजूला असतो. त्यातच यांना उघड्या रानातलं जीवन– ऊन-पाऊस, वारा-वावटळ यांच्याशी नेहमीच झगडावं लागतं. अशाच उघड्या, मोकळ्या वातावरणात त्यांचं जिणं गेल्यामुळं, शहरापासून दूर व गावापासून दूर, म्हणून तर गावचे लोक त्यांच्याकडं चांगल्या भावनेनं, चांगल्या दृष्टीनं पाहात नाहीत. हेही दूर राहण्याचं महत्त्वाचं कारण दिसतं.

लमाण-स्त्रियांना कपडयांची व दागिन्यांची खूपच हौस असते. या स्त्रिया कामावरून सायंकाळी सूर्य मावळायला आपल्या झोपडीवर आल्या तर त्या आपला पटवा-शाल विणत बसतील, चोळी विणत, त्यात भिंग बसवत बसतील. किंवा आपला नवीन घागरा-लंगा तयार करत, त्यावर नक्षीकाम विणत बसतील. रोजच्या कष्टाच्या कामाच्या सवडीतून, घरच्या स्वैपाक-पाण्याच्या कामातून जेवढा वेळ मिळेल, त्या वेळात, आपल्या अंगावरचे कपडे, घागरा, लंगा, पटवा-शाल, चोळी करण्यात खर्च करतात. त्यांचा त्यांच्या अंगावरचा सर्व कपडा तयार करण्यात वर्ष सहा महिने– वर्ष सहा महिने असा सहज कालावधी जातो. अर्थात लमाणी स्त्रिया आपले कपडे– घागरा-लंगा, पटवा-शाल, चोळी आपण स्वतःच तयार करतात. आणि तेही घरच्या व बाहेरच्या कामातून सवड मिळेल त्याच वेळी विणत-शिवत आपल्या झोपडीपुढं बसतात. रोजच्या संसारातल्या जीवनातील लमाणी-लोकांच्या गरजा कमी

आहेत पण स्त्रियांना मात्र आपल्या अंगावरच्या वस्त्रांची व दागिन्यांची फारच हौस असते. म्हणूनच लमाणांच्या दसऱ्याच्या सणाला, होळीच्या सणाला, रंगपंचमीला आणि लग्न-समारंभाच्या वेळी लमाण-स्त्री ही आपल्या अंगावर ठेवणीचे, चांगले नवे कपडे घालील व अंगावर सोने, चांदी, रुपे, पितळेचे भरपूर दागदागिने घालील– तेव्हाच तिचं समाधान होतं. तिला आनंद वाटतो. लमाण स्त्रीची हौस कपडे, दागिन्यांत मोठी असते हे तिच्या अंगावरील दागिने व कपडयांवरून सहज कळतं.

लमाण-जातीचा मूळ धंदा लवण (मीठ) विकणं होता. त्यामुळं त्याचं नाव 'लमाण' झालं असं म्हणतात. पण लमाणांचा मूळ धंदा व्यापाराचा. दळणवळणाची साधनं व सडका, रस्ते नव्हते त्या काळात लमाणांच्या व्यापाराची भरभराट असे. लमाण आपला व्यापारी माल– कापड, धान्य व इतर जीवनोपयोगी जिनसा आपल्या बैलांवर लादत होते. मग हा बैलांवर लादलेला माल घेऊन हा लमाणांचा तांडा गावोगावी, एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात जात होता. या व्यापारात लमाणांना चांगली मिळकत, फायदा मिळत होता. त्यात कैक श्रीमंत बनत होते. लमाणांच्या वा व्यापारी तांड्यांनी पूर्वीच्या लढाईच्या काळात सैन्यांना धान्य व इतर कापडवस्तूंचा पुरवठा केलेला होता. त्यात हे लमाण कुणाचीही बाजू घेत नव्हते. व्यापारी म्हणून गरजू सैन्यांना धान्य माल देत होते. तसंच दुष्काळी भागातही लमाणांनी धान्य-पुरवठा केला होता.

विशेषतः जंगलाच्या भागात, डोंगराळ भागात हे लमाणांचे व्यापारी तांडेच्या तांडे फिरत होते, त्या त्या वेळी त्यांचे मुक्काम पालात पडत होते. अशा भागात फिरताना लमाणी लोक पुरे हत्यारी बंदोबस्तात राहात होते. त्यानं ते आपल्या तांड्याचं व जीवनवित्ताचं संरक्षण करीत असायचे. अशा दुर्गम भागातून लमाणी तांड्याचा मुक्काम हालताना व दुसऱ्या मुक्कामाला जाताना वनदेवतांचं सांत्वन करण्यासाठी बकरी-कोंबडे कापून वन-देवतेचं सांत्वन करीत. नंतर दुसऱ्या मुक्कामाला पालं उतरत होती.

याप्रमाणं लमाणी जमात ही मूळ व्यापारी लोक होते. परंतु काळाच्या ओघात दळण-वळणाची साधनं निर्माण झाली. सडका-रस्ते झाले. त्यातच यांत्रिक युगामुळं यांत्रिक वाहनं सुरू झाली आणि यामुळंच लमाणी लोकांचा व्यापार बसला. व्यापार बुडाला. ते दरिद्री झाले. त्याबरोबर लमाणी तांडेही संपुष्टात आले. आणि हा व्यापार करणारा लमाण कुठं-कुठं शेती करू लागला. कुणी इतर ठिकाणी व शेतीवर मोल-मजुरी करू लागले. शेतीत जे स्थायिक झाले, तेवढे सोडून बाकीची जमात ही मोलमजुरीचं शेतात वा मिळेल त्या ठिकाणी काम करू लागली. त्यातील लमाण आजकाल प्रत्येक शहरात कामाच्या निमित्तानं आलेले दिसतात. शहरात लहानमोठ्या बिल्डिंगच्या-इमारतीच्या कामावर लमाणी स्त्री-पुरुष मजूर म्हणून काम करतात. काम असेल तोपर्यंत त्यांचा एका ठिकाणी मुक्काम असतो. काम संपलं की दुसरं काम धुंडाळण्यासाठी त्यांची पालं-झोपड्या दुसऱ्या मुक्कामाला जातात.

काहीकाही लमाणांचे तांडे आजही कोकणात जंगली भागात लाकडं जाळून कोळसा तयार करण्यासाठी आठ-आठ महिने जातात आणि पावसाळ्याच्या तोंडाला देशावर आपल्या बैलांचा तांडा घेऊन कुटुंब–मुलांबाळांसह परत येतात.

लमाणी गड्यांचा ड्रेस–पोशाख साधा असतो. ते धोतर नेसतात. अंगात शर्ट आणि डोक्याला पटका लाल गडद रंगाचा असतो.

प्रत्येक भटक्या जमातीप्रमाणं लमाणांतही त्यांचे स्वतंत्र असे लग्नविधी आहेत. लमाणांचं लग्न तीन दिवस चालतं. काही काही लमाणी जमातीत ते आठ दिवस चालत होतं. लग्नात नवरीला द्याज देण्याचा प्रघात आहे. लग्नाचा ठराव झाल्यावर जमातीत गूळ खाऊन तोंड गोड करतात. हा लग्नाचा ठराव झाल्यावर नवरा-मुलगा आपल्या ऐपतीप्रमाणं थाटात नवरीच्या घरी राहायला जातो. लमाणांत लग्नाचा मांडव कुटुंबाच्या ऐपतीप्रमाणं टाकलेला असतो. मांडव साधाच असतो. मांडवात चौक केलेला असतो.

लग्न लागायच्या वेळी नवरीला नव्या कपडयांत आणतात. तिला नवऱ्याला भेटवतात. मग दोघा नवरा-नवरीला चौकात उभे करतात. नवऱ्याच्या अंगावरचं उपरणं व नवरीच्या अंगावरची शाल एका गाठीनं बांधतात. त्या गाठीत एक रुपया बांधतात. नवरा-नवरीला हळद लावलेली असते. लग्न लावायला ब्राह्मण बोलावतात. तो नसेल तर लमाण जमातीतीलच एक पुरोहित असतो. हा पुरोहित नवरा-नवरीला हाताला धरायला लावून चौकात असलेल्या जात्याच्या भोवती सात वेळा फिरवतो. त्याच विधीच्या वेळी लमाणी स्त्रिया गाणी म्हणतात. त्यातलं त्यांच्या भाषेतील गीत प्रत्येक फेरीच्या वेळी म्हणतात.

त्यातलं एक गीत असं–

तुझ्यासाठी-माझ्यासाठी झाले लग्न
फिरू आपण दोघे लग्न-खांबाभोवती मग्न
तिसऱ्यांदा फिरू– झाले लग्न
तुमी माझे झालात लग्नामुळे
पाचव्या फेरीला लग्न झाले
सहाव्या फेरीला लग्न झाले
आपण दोघे सात वेळा फिरलो. मी तुझा आहे.
सातव्या फेरीला तू माझी आहेस.

मग नवरा-नवरी घोंगडयावर बसतात. नंतर नवरी नवऱ्याच्या गळ्याभोवती मंगल-धागा गुंडाळते. त्याला सात गाठी मारते. तसाच नवराही मंगल-धाग्याचा विधी करतो. नंतर त्या धाग्याच्या गाठी सोडाव्या लागतात. नंतर तांदूळ तूप, साखरेत तयार केलेला गोड घास-गोळे नवरी नवऱ्याला खायला देते. नवरा ते खातो. तसेच नवराही नवरीला सात घास देतो. त्या वेळी स्त्रिया गाणी गातात.

नंतर नवरा-नवरी घरात जातात. गाठीत बांधलेला रुपया सोडतात. त्या दिवसाचा मग समारंभ संपतो. दुसऱ्या दिवशी जोडप्याला वेगवेगळी आंघोळ घातली जाते. त्यांना जेवण दिलं जातं. त्या सायंकाळी नवरीची आई व इतर स्त्रिया नवरीला सौभाग्याचा दागिना-झूल दोन्ही वेणीला बांधतात. त्याला 'खूझरी' किंवा 'गुरीकी' म्हणतात. हा दागिना घातल्यावर ती विवाहित आहे हे कळतं व गळ्यात सौभाग्य-अलंकारही घालतात.

दुसऱ्या दिवशी नवरीला नवे कपडे घालतात. नवरी मुलगी नवऱ्याघरी जायला निघते तो खरा विरहाचा- वियोगाचा क्षण असतो. त्या क्षणी जवळपास असलेल्या माणसांचं मन हेलावतं व त्यांच्या डोळ्यांच्या कडाही ओल्या होतात. त्या क्षणाला नवरीला एक गीत म्हणायला सांगतात. वियोगाचा क्षण जवळ आल्यानं नवरीच्या डोळ्यांत अश्रू जमतात. आता आपण आपल्या आई-बाप, भाऊ-बहिणींना सोडून जाणार हा विरहवियोग सहन न होऊन तिच्या डोळ्याला अश्रूंची धार लागते. मग ती स्वतःचे हात जोडून डोक्यावर धरते. वियोगाचं गीत म्हणते–

'ये माझ्या पिता, तू एवढं धन खर्चून,
मला वाढविलीस एवढी
यात तुझी आशा नव्हती काही !
ये माझ्या माते, तुला सोडून जाण्याची वेळ
आली आहे आता.
माझी अशी लांब पाठवणी करण्यासाठीच
तू माझे असे पालनपोषण केलेस !
ये आई ! तुला सोडून मी कशी राहू ?
अन् मी माझ्या बहिण-भाऊपासून कशी दूर जाऊ !'

नवरी जेव्हा अश्रुपूर्ण नयनांनी हे गीत गाते तेव्हा इतर स्त्रियांची अंतःकरणं हेलावतात व त्याही आपल्या डोळ्यांचे अश्रू पुसतात. शेवटी नवरी नवऱ्याच्या घरी जाते.

काही लमाणी जमातीत विधवा-विवाह होतो. घटस्फोटित स्त्रीला दुसरा नवरा करता येतो; पण जातपंचायत पहिल्या नवऱ्याचा लग्न-खर्च दुसऱ्या नवऱ्यापासून भरून घेतात त्यावेळी जात-पंचायतीला जेवण दिले जाते. असा रीतिरिवाज दिसतो.

म्हैसूर भागातील लमाणी हे वैष्णव पंथी आहेत. ते कृष्णाची पूजा करतात. याशिवाय लमाणी जमातीची देव-दैवतं आहेत ती अशी- बाळाजी, हनुमान, मरीअम्मा, तुळजापूरची देवी इत्यादी.

**लमाणांचे सण**

दसरा, होळी, रंगपंचमी हे सण मोठ्या उत्साहानं ते साजरे करतात. त्यांतल्या त्यात लमाणांत होळीचा सण विशेष पाळला जातो. होळीच्या सणात ते तीनचार दिवस काम करणार नाहीत.

होळीच्या सणाला लमाण गावाजवळ असतील तर गावापासून, शहराजवळ असतील तर शहरातून होळीच्या सणाला पैसे जमा करतात. स्त्रिया होळीच्या भोवती फेर धरून गीतं गातात. गीतांबरोबर नृत्य करतात. तिसऱ्या दिवशी नवे कपडे घालून गीतं गातात, फेर धरून नृत्य करतात. होळीचे हे तीन दिवस त्यांच्या आनंदाचे असतात.

लमाणी पुरुष होळीच्या सणात नाचतात. टिपऱ्या-हालगीचा खेळही मोठ्या हौसेनं खेळतात.

सोलापूर शहराजवळ दोन मैलांवर नेहरूनगर नावाची मोठी वस्ती आहे. त्या वस्तीत काही सोडले तर बहुसंख्य लमाणांची घरं आहेत. नेहरूनगर ही आहे हौसिंग सोसायटी. त्यांची घरं आहेत सिमेंटकॉंक्रीटची. छान. सर्व सोयींनी युक्त. या नेहरूनगरमधील लमाण मुला-मुलींची चांगली शिक्षणं चालू आहेत. काही मुलं कॉलेजमध्ये शिकतात. दोन-तीन मुलांनी डिग्र्याही घेतल्यात. काही मुलीदेखील प्राथमिक शाळेत शिक्षिका आहेत.

या नेहरूनगरात ज्या लमाणी घरात पति-पत्नी शिक्षक आहेत, तिथं बऱ्याच सुधारणा दिसतात. शिक्षिका झालेली लमाणी स्त्री आपला परंपरागत पोषाख केलेली दिसत नाही. ती आधुनिक स्त्रीप्रमाणं गोल पातळ, चोळी परिधान करते. पण त्याच घरात मात्र तिची वयस्कर सासू आपला परंपरागत लमाणी पोषाख करते. असं काही वेगळंच दृश्य दिसतं !

नेहरूनगरात एक हायस्कूल आहे. एक प्राथमिक शाळा आहे. लहान मुला-मुलींच्यासाठी एक आश्रमशाळाही आहे. या शाळा आश्रमात, गृहात लमाण-समाजाची बरीच मुलं-मुली शिक्षण घेतात. पण येथील शाळेत स्थायिक लमाणांची मुलं-मुलीच शिकतात. त्यामुळं गावोगाव शहरात कामासाठी भटकत फिरणाऱ्या लमाणांची मुलं-मुली अडाणीच आहेत. त्यांच्या भटक्या जीवनामुळं त्यांच्या मुला-मुलींना शिक्षण मिळत नाही ही लमाणांच्या लहान मुला मुलींची मोठी शोकांतिका आहे.

अहमदनगर जिल्ह्यात नगर-पाथर्डी रोडवर चांदबिबीचा महाल म्हणून समजल्या जाणाऱ्या– असलेल्या ठिकाणाजवळ डोंगरांच्या पायथ्याला लमाणांची हौसिंग सोसायटी आहे. त्यांचीही तिथं चांगली घरं आहेत. त्यांचीही मुलं शाळेत जातात.

काही लमाण कुटुंब स्वतःची शेती करून आपल्या शेतात स्थायिक झालेले दिसतात. काही लमाण कुटुंबांना सरकारनं पडिक जमिनी दिल्या आहेत. अशा जमिनीत ती कुटुंबं

स्थायिक झालेली आहेत. काहीकाही लमाण कुटुंबांनी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायट्या स्थापन करून चांगली घरं बांधलेली आहेत.

पण लमाण जमातीतील मोठी संख्या आजही भटक्या अवस्थेत, काम मिळेल तिकडं फिरताना दिसते. अशा कुटुंबातील मुला-मुलींसाठी आश्रमशाळा, वसतिगृहे काढली तर त्यांच्यात शिक्षणाचा व आधुनिक विचारांचा प्रसार होऊ शकेल.

लमाणी गडी-बाया मावळत्या सूर्याबरोबर आपल्या झोपडीवर आल्या. डोईवरच्या पाट्या-सरपणाच्या काटक्या खाली टाकताच स्त्रियांना केवढा आराम वाटला. रूपा, लछमी, मोती, हसली, चंद्री या स्त्रियांना हायसं वाटलं. त्याचं कारण बरोबर होतं.

दुसरा दिवस रविवार. तो सुट्टीचा होता. या कष्टकरी लमाणी लोकांना रविवारी कामाची सुट्टी असते. स्त्रियांना तर रविवार सणासारखा वाटतो. रविवारी त्या गरम पाण्यानं न्हाणं, धुणं करतात. अगदी मनसोक्त. त्यांना किती मोकळंमोकळं वाटतं. सणासारखंच. त्यातच आठवड्याच्या कामाचे पैसे त्यांच्या हातात असतात. मग काय रविवारी त्यांच्या खाण्याचा, जेवणाचा एकदम मनपसंत बेत होतो. मुलं आपापल्या झोपड्यांपुढं खेळत असतात आणि स्त्रियाही मोकळेपणानं आपली वेणीफणी करतात. एकदम आठवड्याच्या गप्पागोष्टी करत बसतात. हाच त्यांच्या जिवाला विरंगुळा !

स्त्री : जुलै १९७१

※

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९८७
वा. क्र. २३८९९
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# ४

## एक संघर्ष

गोपाळ खंडू ऽ ऽ!

नंबर शंभर!!

असा डगलेवाल्या शिपायानं पुकारा केला. एक तरतरीत विशीतला मुलगा कोकराच्या चपळाईनं पुढं धावला. आत साहेबाच्या ऑफिसात गेला.

मुलाखत घेणाऱ्या मुख्य साहेबानं गोपाळकडे नजर टाकली.

गोपाळ खंडू लवलवत्या, फोकेगत कोवळ्या वयाचा सडपातळ, आखूड नाकाचा, त्याच्या सावळ्या रंगात त्याचे तेजस्वी डोळे उठून दिसत होते. त्याच्या चेहऱ्यावर चिंताग्रस्त भाव उमटला होता. त्याची नजर आरपारचा शोध घेत होती. कुठं तरी लांब लांबची...

साहेबानं गोपाळकड खालीवर नजर टाकली. तो अनवाणी होता. त्यानं घातलेला सफेत स्वच्छ पायजमा गुडघ्यावर टिगाळलेला होता. अंगातला नेहरू शर्ट भुजेवर गेला होता. त्याला सुईच्या दोऱ्यानं मारलेल्या जाड टिपा उठून दिसत होत्या. शर्ट त्याच्या सडपातळ बांध्याच्या मानानं ढगळ-सैलच दिसत होता. त्याच्या हातात कागदपत्र होते.

गोपाळनं आपल्या कपाळावर आलेले घामाचे थेंब उजव्या हातानं पुसले. तो हुशारीच्या पोजमध्ये खडा उभा राहिला.

साहेबाचा पहिला प्रश्न-

'तुझं नाव?'

‘ गोपाळ खंडू ! ’

‘ तुझं शिक्षण ? ’

‘ मी एस. एस. सी. पास झालोय ! ’

त्यानं असं उत्तर देऊन हातातलं सर्टिफिकेट पुढे टेबलावर ठेवलं. तोच साहेबाचा पुढचा प्रश्न–

‘ तू भटक्या जमातींचा ? ’

‘ हो ? मी नंदिवाल्या जमातीचा ! ’

असं उत्तर देताच त्याच्या चेहऱ्यावर गंभीर भाव उमटतात. तो अधिकच ताठ उभा राहातो. त्याचे चिंतागती डोळे कुठं तरी लांबचा क्षितिजापलीकडचा वेध घेतात. ‘ नंदिवाला ’ हे नाव ऐकताच साहेबाच्या नजरेत अनेक प्रश्न उभे राहातात.

त्यांतला एक प्रश्न,

‘ बाळ ! तू कुठ राहतोस ? ’

‘ पालात ! माळरानात ! ’

‘ तुला घर-दार नाही ? ’

‘ नाही ! आम्ही पालातच कायम राहातो ! ’

‘ असं काय ! ’ साहेबाचा चेहरा गंभीर होतो. त्यातच साहेब दुसरा प्रश्न विचारतात

‘ तुझं गाव कोणतं ? ’

‘ मला गाव नाही ! ’ असं म्हणून तो पुढं सांगतो, ‘ साहेब ! आमची भटकी जमात ! आमाला कायमचं असं गाव नाही ! ’

साहेबाचा चेहरा अधिकच गंभीर होतो.

‘ अरे तुम्हाला जमीनजुमला असं काय आहे ? ’

‘ नाही साहेब ! मालकीची अशी आमाला थोडीशी टिचभरही जमीन नाही ! उडत्या पक्षासारखच आमचं सगळं ! ’

साहेबाने चिंताग्रस्त चेहऱ्याने कोंडलेला दीर्घ श्वास सोडला. ते पाठीमागं खुर्चीत रेलले व त्यांनी पुढचा प्रश्न केला–

‘ अरे बाबा, अशा परिस्थितीत तू शिक्षण कुठं घेतलेस ? ’

‘ सातार्‍याच्या शाहू बोर्डिंगात ! ’

‘ अरे पण तुझे आईबाप गावोगाव भटकतच होते ना ? ’

‘ हो ! पण मी बोर्डिंगात राहात होतो. उन्हाळ्याच्या सुटीत मी गावोगाव भटकत माझ्या आईबापाच्या पालाचा शोध घेत होतो. वर्षातून आठ-पंधरा दिवस त्यांच्याकडे रहात होतो. मग त्या गावातून पाल पुढच्या गावी जात होते. मी पाठीमागं बोर्डिंगात येत होतो.’

शेवटी साहेबानं गोपाळला सहज प्रश्न केला–

‘ तू शाळामास्तरची नोकरी करशील ? ’

या प्रश्नानं गोपाळचा चेहरा टवटवला. आगळ्याचा तेजानं फुलला; त्यानं हसऱ्या चेहऱ्यानं उत्तर दिलं,

‘ हो ! आनन्दानं करीन ! ’

त्याला इतका हर्ष झाला, की त्याच्या डोळ्यांत आनंदाश्रू भरले. त्याच्या चेहऱ्यावर समाधान ओसंडत होते. आनंदाश्रू पुसतच तो म्हणाला,

‘ साहेब मला फार आनंद झाला ! ’

— आणि त्याच्या दृष्टीसमोर त्याचे आई-बाप, त्याची भावकी व त्यांची माळरानावरील पालं उभी राहिली. त्याचं मन थरारलं, त्याच्या काळजात धडधड झाली. त्याचा आनंदानं फुललेला चेहरा एकदम उतरला. काळा ठिक्कर पडला. त्यानं आपली मान खाली घातली. त्याच्या अंतरीच्या वेदना त्याच्या नेत्रात उमटल्या, उभ्या राहिल्या. त्याचे डोळे दुःखाश्रूंनी भरले. अश्रू डोळ्यांतून ओघळू लागले. साहेब त्याच्याकडे पहात होते. गोपाळमध्ये क्षणात झालेला बदल, चढ-उतार हे न्याहाळत होते. या क्षणात झालेल्या बदलाचा साहेबांना काहीच बोध होईना. त्याच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत असताना साहेबही गप्पच होते. मग अश्रू पुसताना त्यांनी गोपाळला विचारलं,

‘ काय रे, क्षणात तुझ्यात हा बदल ? तुला कसलं दुःख झाले ? ’

डोळे पुसतच त्यानं उत्तर दिलं,

‘ मला नोकरी मिळाल्याचा फार आनंद झाला. एक तर आमची भटकी जमात. आज इथं तर उद्या तिथं अशी आमची पालं पोटापाण्यापायी भटकतात. अशात आमची मुलं शिकत नाहीत. त्यातच मी शिकलो. आता जमातीत शाळा मास्तर होणार ! मला अतिशय आनंद झाला. नंदिवाल्याचा पोर शाळामास्तर होतो.

‘ हा एक आमच्यात चमत्कार आहे ! मी शिकून शाळा मास्तर होणार. हेच मी माझ्या जमातीला दाखविले. याचाच मला आनंद झाला ! ’

तो साहेब विचारतात,

‘ हो. म्हणूनच तुला नोकरीबद्दल विचारलं. ’

‘ पण मला दुःख झालं ते– ’

‘ ते कशाचं ? हे मला पाहिजे. ’

तोच तो दाटलेल्या कंठाने म्हणतो,

‘ साहेब, आता शाळा मास्तर झाल्यावर माझे आई-बाप मला तुटतील. त्यांची माझी ताटातूट होईल ! ’

‘ म्हणजे ? तू हे बोलतोय काय ? ’ साहेब आश्चर्याने म्हणाले

‘ हो ! ते मला सोडून आपल्या भावकीबरोबरच पाल घेऊन जाणार ! ’

‘ अरे, पण तुला आता नोकरी मिळाली. तुझ्या बरोबर तुझ्या आई-वडिलांना आता स्थायिक व्हायला काय हरकत आहे ? ’

‘ ते खरं ! पण त्यांना भावकीबरोबर राहायचं आहे. माझ्याबरोबर नाही, त्यांना भावकीची रूढी पाळावयाची आहे. ’

‘ आणि तुला ? ’

‘ साहेब मला भावकीच्या रूढीची बेडी तोडायची आहे. म्हणूनच मी शिक्षण घेतलं ! ’

‘ तुझा हा ध्येयवाद चांगला आहे ’ असं म्हणून त्यांनी गोपाळला परत विचारलं,

‘ अरे पण तू नोकरी करणार ना ? ’

‘ हो साहेब. मी नोकरी करणार ! ’

तोच साहेबांनी ‘ बेल ’ वाजविली व दुसरा उमेदवार आत गेला. गोपाळ बाहेर आला तरी त्याचा चेहरा चिंताग्रस्त होता.

असेच तीन महिने गेले.

गोपाळला शाळा मास्तर म्हणून नोकरीवर एका खेडेगावी रुजू होण्याचा हुकुम आला. तो हुकुम पाहून त्याचा आनंद गगनात मावेना. बोर्डिंगच्या पत्त्यावर आलेला हुकुम घेऊन गोपाळ तसाच आपल्या आई-वडिलांना भेटावयास निघाला.

सूर्य बुडताना तो त्यांच्या मुक्कामाच्या गावी आला. पालं उतरलेल्या माळरानावर गेला. पण तेथून पालं कधीच उठून गेलेली होती. पण ती कधी तेथून हालली ? तेथून कोणत्या गावी गेली याचा त्याला काहीच पत्ता लागेना. तो तेथेच आपल्या बापाच्या पालाच्या जागी आला. तेथे विसावा घेतला आणि तेथून परत त्या गावास निघाला.

त्या गावात त्यानं पोलीस पाटलांची भेट घेतली. त्याला पालाच्या ठावठिकाणाबद्दल काही कळलं नाही. तेथून तो जवळपासच्या वाड्या-वस्तीवर गेला. तेथे चौकशी केली. पण तेथेही त्याला नंदिवाल्याच्या पाटलांचा पत्ता मिळाला नाही. शेवटी गावातल्या कोतवालाला तो भेटला व त्यानं त्याच्याकडे पालाची चौकशी केली.

‘ कोतवालबाबा ! नंदिवाल्याची पालं या गावातून कधी हालली ?’

‘ कारं बाबा ! तुला का त्याची चौकशी ? ’

‘ मला त्यांच्या पालावर जायचं आहे. ’

'अरं ती भटकी जात त्यांचा पत्ता कसा सांगावा ? गावोगाव ती जाणार !'

'हो पण मला त्यांना भेटायचं आहे. मी त्यांचा मुलगा आहे !'

मी मुलगा आहे म्हणताच कोतवालाला आश्चर्य वाटलं. 'तू नंदिवाल्याचा मुलगा ?'

'हो ! मला माझ्या आई-बापांना भेटायचं आहे !'

'पण बाळा, आता तू या आंधारात कुठं जाणार ? आता इथंच चावडीत रातभर काढ अन उद्या सकाळी जा, पुढच्या गावात चौकशीला !'

बाहेर अंधार गडद झाला होता. आता पुढं तो गोपाळ कुठं जाणार ? त्या अंधारात त्याला मार्ग कसा सापडणार ? हाही त्याच्यापुढं प्रश्न होता. शेवटी गोपाळनं रात्र तेथेच गाव-चावडीत कशीतरी काढली. दुसऱ्या दिवशी तांबडं फुटायच्या आत तो त्या गावातून बाहेर पडला. दिसेल त्या वाटेनं, फुटेल त्या मार्गानं.

सूर्य डोक्यावर येईपर्यंत त्यानं दोन खेडयांत तपास केला, पण त्याला नंदिवाल्याची पालं सापडली नाहीत. पुन्हा तो पुढच्या मार्गाला लागला.

सूर्य मावळायला चालला होता.

तो एका गावाच्या जवळ लवणात आला होता. तो लवणाची चढण चढून वर माळ-रानात आला आणि त्याला समोरच पालं दिसली.

माळरानात समोर पालं पाहून त्याला आनंद झाला. त्याला धीर आला. पालाच्या मावळतीला देवाच्या पताका फडफडत होत्या. त्या पाहून गोपाळाची खात्री झाली, ही पालं नंदिवाल्यांचीच. मग तो झपाझपा पाऊल टाकत जोरात निघाला.

दिवस बुडायला चालला होता. कोवळी किरणं माळरानावर पडली होती. त्यात नंदिवाल्यांची पालं उठून दिसत होती.

गोपाळ पालांच्या समोर आला,

एकूण पाच नंदिवाल्यांची पालं उभी होती. पालं पोत्या-पटकारांची होती, त्यात काही वाकळ्या-गोधड्याचीही होती. दोन कमरभर भरीव बांबूच्या आधारावर ती पालं उभी होती.

पालांच्या पुढं पटांगणात गडी बिडया ओढत बसले होते. कुणी तंबाकू चघळत होते. उघडीबंब लहान पोरं खेळत होती, पळत होती. नंदिवाल्याची कुत्री त्याच्या पाठोपाठ उधळत होती. पालापुढच्या बोरी-बाभळीच्या झाडा-झुडुपाला नंदिवाल्याचे बैल-गाई बांधल्या होत्या. आपल्यापुढच्या सरमडाच्या काडया फोडत होती. शेळ्या निवांत बसून रवंथ करत होत्या.

पालाच्या तोंडाला तीन दगडावरच्या चुली पेटल्या होत्या. बाया चुलीपुढं बसून स्वयंपाकाला लागल्या होत्या. लहान मुलं जवळ बसून तव्यात पडलेल्या भाकरीकडं पाहात होती.

तेवढ्यात गोपाळाला समोर पाहून त्याचा बाप उठला. त्याच्यापुढं गेला. बाकी गडी उठले. त्याला पाहून त्याच्या आईला केवढा आनंद झाला ! ती भाकरी टाकता टाकता तशी पिठाळ हातानं उठली व गोपाळाच्या आडवी आली.

गोपाळ आला. आपल्या पालापुढं बसला. त्याच्या भोवती नंदिवाल्यांचा घोळका जमला. त्या घोळक्यात गोपाळ आनंदानं बापाला सांगतो,

'बापा, मला नोकरी लागली. मी मास्तर झालो!'

'खरं म्हणतोस?'

'हा! हा नव्ह का माझ्याजवळ हुकुम आहे!' असं बोलून तो आपल्या खिशातल्या खात्याच्या हुकुमाचं पाकीट दाखवतो. त्यातला एक नंदिवाला उगीचच वाचायला न येताही ते पाकीट हातात घेऊन पहातो. त्याच्या वडिलांचा चेहरा भलताच खुलला होता. त्याच्या आईच्या चेहऱ्यावर हर्ष ओसंडत होता. त्या माउलीनं तेवढ्यात लागलीच उठून दोन लाल मिरच्या घेतल्या. आपल्या गोपाळावरून ओवाळून त्यांची दृष्ट काढली. त्या मिरच्या पेटत्या चुलीत टाकल्या. त्या ताड ताड उडल्या.

आपल्या लेकाची दृष्ट काढल्यावर तिला बरं वाटलं.

गोपाळाच्या पालापुढं बसलेली भावकीचे गडी उठले. आपापल्या पालापुढं गेले आणि जेवायला बसले. गोपाळ आणि त्याचा बाप व भावंडही जेवायला बसली.

जेवण करता करता गोपाळाच्या बापाचा चेहरा उतरू लागला. त्याच्या चेहऱ्यावरील आनंदाचं भरतं एकदम कमी झालं. त्यांचा चेहरा अंधुक झाला. बापलेकाचं जेवण संपलं. ते पुन्हा पालाच्या पुढं टाकलेल्या गवती चटईवर बसले. मागोमाग बाकी नंदिवाले गडीही तिथे येऊन घोळक्यानं बसले. कुणी विडी पेटविली, कुणी तंबाखूचा बार भरला, तोच गोपाळ बापाला विचारतो.

'बापा! तू गप्प का?'

'तू मास्तर झालास अन गप्प बसण्यासारखं झालं!'

'म्हणजे! काय म्हणता?'

'बाळा, तुला नोकरी लागली, पण आपली आता तायातूट होणार!'

'ती कशी काय?' गोपाळचा प्रश्न.

'आरं, आमी भावकीबराबर जाणार गावोगाव अन् तू आम्हाला तुटणार!'

'पण तुमी माझ्याबरोबरच राहा अन् कामधंदा करा!'

तोच त्याचा बाप त्याला बोलला,

'आरं आपला वाडवडलांचा धंदा झोडून कसं चाललं?' तोच गोपाळ मोठा आवाज काढून म्हणाला,

'वाडवडलांच्या या धंद्यानं या जातीला भटकं बनवलं. आता तरी चालू घडीनं वागा.'

तोच त्याचा बाप म्हणतो, 'चालू घडीनं वागायचं म्हंजी उपाशी मरायचं म्हण की!'

'उपाशी का म्हणून? असा हा भटकीपणा सोडून एकाच गावात ऱ्हा! पोटाला चांगला कामधंदा करा. अन् हे भीक मागायचं सोडा!'

तोच त्याचा बाप गोपाळाच्या या बोलावर बिथरला,

'कोणरे म्हंतू आमी भीक मागतू?"

'तर काय, दारोदार नंदी घेऊन का फिरता? ह्याला काय म्हणायचं?' त्यावर त्याच्या बापातला खरा नंदिवाला जागा झाला.

'आरं बाबा! नंदी देवाला घेऊन घरघर जातो. भगतगण नंदीची पूजा करून आमच्या पदरात काही वाढतात. या नंदीची अन् आमची कशी ताटातूट व्हयलर?'

बापाच्या या बोलावर बाकी नंदीवाले गडी माना डोलवतात. तोच त्याचा बाप पटकन पुन्हा बोलला,

'आरं या नंदीदेवाबराबर आमची पण पूजा व्हती! अशा देवाला तू सोड म्हंतूस काय? तुला कुनी असली साळा शिकवली?' आपला बापच असं बोलायला लागल्यावर गोपाळा गप्प झाला. त्याच्याकडं बघून त्याच्या बापानं जरा आवाज चढवला,

'लेका! पिढ्यानपिढ्या ज्या देवानं आमच्यावर सावली धरली, अशा माळरानावर पण आमची लेकरं-बाळं सुकी ठेवली, त्या देवाला बनवासात सोडून आमच्या पालावर का देवाचा खराटा फिरवतुस?'

आता मात्र गोपाळा वडिलांच्या हा परंपरागत बोल ऐकून गप्पच झाला. आता बापाच्या या वेड्या-विचाराला कसं उत्तर द्यावं? म्हणून जरा गप्प बसला. तोच त्याच्या बापानं त्याला उघड बोल केला,

'ये गोपाळ्या, तुला उघडं-बोल करतू. तू काय तुला आलेल्या नोकरीच्या नादाला लागू नको. तू आपला आमच्या बराबर चल!'

आपल्या बापाचा हा विचार ऐकून गोपाळाला धक्काच बसला आणि हे आता आपल्याला मिळालेल्या नोकरीवरच गदा आणणार, या विचारानं संतप्त होऊन बापावर तो भडकला,

'तुम्हाला काय वेडबिड तर लागलं नाही ? मला मिळालेल्या चांगल्या नोकरीच्या आड तुम्ही येता ! मी तुम्हाला स्पष्ट सांगतो–मी नोकरी करणार ! मला तुमची, तुमच्या वाडवडलांची वाट मोडायची आहे... ध्यानात ठेवा !'

तोच त्याचा बाप तेवढाच खडा बोल करतो,

'तुजा तसाच हेका हाय, तर तुजी-आमची ताटातूट व्हनार !' असं बोलून त्यानं गोपाळाला सरळ सवाल केला,

'बोल, तू आमच्या बराबर राहाणार का न्हाय ?' बापाच्या या सवालाला गोपाळानंही रोखठोक उत्तर दिलं,

'मी मास्तराची नोकरी करणार ! मी ठाम सांगतो !'

'तुजं तसं हाय, तर तुजी-आमची ताटातूट झालीच म्हून समज !' असा त्याचा बाप निर्वाणीच्या आवाजात बोलला.

आपल्या बापाच्या निर्धाराच्या बोलानं गोपाळानं आपलं तोंड बंद केलं. तो गप्प झाला. आपली आता आई-बापापासून, आपल्या लहान भावंडापासून ताटातूट होणार...या विचारानं तो अस्वस्थ झाला– आणि त्याचे डोळे पाण्यानं भरले. त्याला आता काहीच बोलवेना. त्याच्या डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले. त्याची आई त्याच्या पाठीमागंच उभी राहून आपले डोळे पुसत होती. त्याची भावंडं कधीच झोपी गेली होती.

त्या माळरानावर चोहोबाजूनं अंधार दाटला होता. वर फक्त चांदण्या लुकलुकत होत्या. गोपाळा तिथंच बसल्या जागी पुढं काहीच न बोलता आडवा झाला. त्या अंधारात विचार करत करत त्यानं डोळं झाकले...

दिवस उजाडला. सूर्याची कोवळी किरणं पालावर पडली. गोपाळा अंगावर कोवळं ऊन घेऊन उठला. आपली मंद पावलं टाकत टाकत पालापुढं आला. तो आपल्या आईच्या पाया पडला. ती माऊली अश्रू गाळत होती. गोपाळाही आपले अश्रू पुसत होता. तो तसाच पुढं आला व बापाच्या पाया पडला आणि मोठ्या निर्धाराने तो आपलं पाल सोडून, सूर्याच्या समोर आपल्या वाटेला लागला... त्या सकाळच्या कोवळ्या उन्हात तो पुढं पाऊल टाकताना उजळून निघाला होता...

गोपाळा पुढं चालत होता. मागं तोंड करून आपल्या पालाकडंही पहात होता. डोळ्याचे अश्रू पुसत होता. त्यांची पालं माळाच्या आड झाली, अन् तो अंगात नवा जोर आल्यागत पुढच्या वाटेनं झपाझपा पावलं टाकू लागला. तो आपल्या नोकरीच्या दिशेनं निघाला.

दुसऱ्या दिवशी गोपाळा आपल्या नोकरीच्या गावी आला. गावात आला तसा तो सरळ गाव-चावडीवर गेला. त्यावेळी दिवस बुडत चालला होता. चावडीवर दोन गडी होते. गोपाळानं आल्या आल्या त्या गड्यांना पुसलं,

‘ हेच डोंगरगाव का ? ’

‘ व्हय ! डोंगरगावच बाबा हे ! ’ असं एका गड्यानं उत्तर दिलं.

खरं तर डोंगरगाव डोंगरांच्या कुशीत वसलेलं होतं. गावाला ना धड सडक, का ना धड गाडीवाट. फक्त पाऊलवाटेनं गाव इतर गावांना जोडलेलं होतं. अशा आडवळणी गावात गोपाळाला शाळामास्तरच्या नोकरीवर रुजू होण्याचा हुकुम मिळाला होता. मग एका गड्यानं गोपाळाला प्रश्न केला,

‘ तू कोण बाबा ? ’

‘ मी शाळामास्तर ! माझी नव्यानंच या गावी नेमणूक झालीय ! ’

‘ तुजी बायका-मुलं ? ’

‘ माजं अजून लग्न झालं नाही ! ’

त्यावर एका गड्यानं सवईचा प्रश्न त्याला विचारला,

‘ पण तू कोण ? ’

त्या प्रश्नाचा रोख ओळखून गोपाळा पटकन बोलला,

‘ मी नंदिवाल्याचा आहे ! ’ असं त्याचं उत्तर ऐकताच ते जरा चपापलेच. नंदिवाल्याचा पोर शाळामास्तर कसा ? असा प्रश्न त्यांच्या चेहऱ्यावर उमटला. त्यांचा काही गोपाळाच्या बोलावर विश्वास बसेना. ते दोघंही त्याच्या चेहऱ्याकडं टकाटका संशयास्पद दृष्टीनं बघू लागले. एकमेकाच्या कानाजवळ बोलू लागले. तोवर कडूसं पडलं. ते दोघंही गडी त्याला एकाएकी बघून जरा बावरलेच. नंदीवाला म्हटल्यावर त्यांच्या शंका बळावल्या. ‘ हा गडी बिन-नंदीचा नंदिवाला कसा ? अन् नंदिवाला शाळामास्तर कसा ? ते दोघंही पुन्हा एकमेकाच्या कानी लागले. ते घाबरल्यागत झाले. आणि त्यातला एक गडी बोबडी वळल्यागत गोपाळाला बोलला,

‘ ये गड्या तू हितंच चावडीवर थांब. आमाला तुजा शक येतूय. आमी आताच पाटलाला घेऊन चावडीवर येतो. मग काय तो तुजा खऱ्या पत्ता लागल ! ’ असं बोलून ते दोघंही घाबऱ्याघाबऱ्या समोरच्या गल्लीतून अंधारात पसार झाले...

दै. शिवनेर : दीपावली १९७३

※

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ..........
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

५

## दगड-मातीशी झगडा

तांबडं फुटलं होतं. अंधार सरकत होता. वडार-कामकऱ्यांच्या झोपड्या अंधारातून बाहेर पडत होत्या. हाणमा वडाराची बायको तिम्मवाबाई कधीच जागी झाली होती. तिच्या झोपडीत घासलेटची चिमणी पेटली होती. त्याचा फिक्कट–अंधुक उजेड झोपडीत पडला होता.

वडार-मंडळींच्या इतरही झोपड्या कधीच जाग्या झाल्या होत्या. त्यात सेशेव्वाबाई, सोनाबाई, भंगारीबाई यांच्यापण झोपड्यांत पहाटेच चिमणीचा उजेड पडला होता. कामाच्या ओढीनं पोटापाण्याचं आवरण्यासाठी त्या तांबडं फुटायच्या आतच जाग्या झाल्या होत्या.

तिम्मव्वाबाईचा नवरा बाहेरून झाड्यानं आला. टिनपाटचं डबडं झोपडीच्या पत्र्यावर ठेवलं. तो मग तंबाकूची कडक 'मिसरी' लावत झोपडीपुढं थुंकत बसला.

तिम्मवानं चूल कधीच पेटवली होती. कामाला जाण्याची घाई तिच्यापुढं होती. ती पटापटा ज्वारीच्या भाकरी थापत होती. तव्यात टाकत होती. चुलीत खाली निबार काटक्यांचा ढणढणीत जाळ लागला होता. तव्यात भाकरी शेकत होती. तव्यात शेकलेली भाकरी खालच्या लाल धगधगत्या इंगळावर शेकत होती. भाकरीचा पापड टम फुगत होता. भाकरी मागं भाकरी टोपल्यात पडत होत्या. भाकरीनं टोपलं भरत होतं.

मध्येच भाकरी टाकताटाकता तिम्मव्वाबाई आपल्या बाजूलाच कांबळी-वाकळत झोपलेल्या मुलांना पुनःपुन्हा हाका मारून जागं करत होती. तिच्या त्या बोलाचा आवाज जोरजोरात उठत होता.

भाकरी टाकण्याचं संपल्यावर तिम्मवानं खसाखसा कांदा कापला चुलीवर तो जस्ताच्या भगुल्यात टाकला. कांदा चरचरू लागला. त्यात तेल टाकलं मग त्यात चार-पाच बोंबलाचे तुकडे टाकले. भगुल्यातल्या तळल्या बोंबलाचा खमंग वास सगळ्या झोपडीत दाटला. त्यात लालभडक चटणी टाकली, वर पाणी ओतलं. खाली चुलीत ढणाढणा जाळ लावला आणि भगुल्यातल्या बोंबलाचं कोरड्यास रटरटू लागलं. त्याचा खमंग वास दरवळला.

त्यानंतर तिम्मवाबाई बाहेर आली. तिनं दाताला खसाखसा 'दातवन' लावलं. समोरच्या घागरीतलं पाणी तांब्यात घेतलं. चूळ भरली. तोंड धुतलं. पुन्हा पाणी घेऊन तिनं हातपाय धुतलं. पुढं आलेल्या केसांवरून हात फिरवला. केस नीट बसवले. पदरानं तोंड पुसलं.

तोवर सूर्यानं तोंड दावलं. कोवळी किरणं त्या कष्टकरी झोपड्यांच्यावर पडली. तिम्मवा परत झोपडीत येऊन आपल्या मुलांना हालवून उठवू लागली.

वडार-समाजातील 'स्त्री' कामाच्या ओढीनं नेहमीच पहाटे, आपला दिवसभराचा स्वैपाक-पाणी उरकण्यासाठी उठते. त्यांच्या झोपड्या पहाटेच जाग्या झालेल्या असतात. स्त्रियांची सकाळची कामं आवरण्याची फारच घाई चाललेली असते. पोटापाण्याच्या कामधंद्याच्या ओढीत वडार-स्त्रियांना सकाळचा निवांतपणा, आराम असा सहसा मिळत नाही. पोटापाण्याचं आवरण्यातच त्यांची पहाट-सकाळ कधीच निघून जाते आणि आपल्या झोपडीवर सकाळच्या सूर्याची कोवळी उनं कधी पडलीत हेही त्यात कळत नाही.

सकाळी कोवळी उनं पडलेली पाहून त्यांची मग आवरा-आवरीची एकदम घाई चालते. तिम्मावाबाईच्या झोपडीपुढं सकाळचं कोवळं ऊन पडलं. ती स्वैपाक पाणी आटपून झोपडीच्या बाहेर आली.

त्या कोवळ्या उनात तिम्मवाचा काळा सावळा रंग उठून दिसत होता.

ती वयानं निम्मी झाली होती. तिचे हातपाय धष्टपुष्ट दिसत होते. तिचा चेहरा उन्हा-तान्हानं रापलेला दिसत होता. तिचा बांधा रोजच्या घाम काढणाऱ्या श्रमानं-कष्टानं बांधेसूद बनला होता. धडधाकट काटक दिसत होता तिम्मवाबाईच्या अंगावर तांबड्या रंगाचं सोलापूरी लुगडं होतं. तिच्या हातातील पांढरे गोठ उठून दिसत होते.

खरं तर वडार-समाजातील मूळची स्त्री अंगात चोळी घालत नसे. कुंकू लावत नसे. पायात जोडवी घालत नसे अन् हातात बांगड्या घालत नसे. डोरलंही नसे.

या वडार समाजातील मूळ स्त्रिया असं राहातात याचं कारण त्यांच्यात अनेक लोकसमज आहेत. त्यात वनवासात दिवस कंठणाऱ्या 'सीतामाई'चे वंशज असल्याचाही एक दंतकथेगत लोकसमज ऐकिवात येतो.

त्यात दुसरा असाही या स्त्रियांत समज आहे की, दागिन्यांच्या आग्रहापायी, आपल्या नवऱ्याबरोबर वियोगाचा, ताटातुटीचा दुःखद प्रसंग आपल्यावर येऊ नये म्हणूनही बांगड्या

व अन्य अलंकार यांचा वडार-समाजातील स्त्रियांनी त्याग केला होता. असाही एक लोक-समज आहे. अर्थात हे लोकसमजच आहेत. त्याला इतिहासाचा किंवा अन्य कोटलाच पुरावा मिळत नाही. पण वडार समाजातील वयस्कर, म्हाताऱ्या स्त्रिया या जुन्या रूढीप्रमाणं वागतात हे आजही दिसतं.

परंतु वडार समाजात शिक्षणाचा प्रसार जसा जसा वाढत आहे आणि नवीन युगा-प्रमाणं जशाजशा नव्यानव्या सुधारणा घडत आहेत, येत आहेत, त्या त्या नव्या सुधारणा वडार समाजातही पसरत आहेत. या नवीन सुधारणांचा परिणाम या समाजातील स्त्री-पुरुषांवरही होत आहे आणि म्हणूनच या समाजातील स्त्रियांचीही नवीन सुधारणेच्या मार्गानं आपोआपच पावलं पडत आहेत.

सोलापूर येथील वडार-समाजातील तरुणांनी १९३९ साली आपल्या समाजातील स्त्रियांनी चोळी घालावी अशी चळवळ केली होती. कुठल्याही मूलगामी सुधारणा करावयाच्या चळवळीस जसा विरोध होतो, त्रास होतो तसाच या चळवळीसही वडार-तरुणांना विरोध झाला. त्रास झाला. पण नवीन काळाचा ओघ आणि या वडार-समाजातील स्त्रियांत शिक्षणाचा प्रसार यामुळं या सुधारणा होणे सुकर झाले. विशेषत: १९३९ साली, पुणे येथील वडार-समाजातील श्री. माने गुरुजी ( आजचे शिक्षण खात्यातील ए. डी. आय्. ) यांनी वडार-समाजातील मुलींना शिक्षण द्यावं अशीच चळवळीची भूमिका घेतली होती. एकदा का या समाजातील मुलींचं कमी-अधिक शिक्षण झालं, त्यांच्यावर शिक्षणाचे संस्कार झाले, तर या मुली निश्चित सुधारणेच्या मार्गानं आपोआपच चालतील, अशी त्यांची भूमिका होती आणि मुलींत शिक्षणाचा प्रसार केल्यानं श्री. माने गुरुजींच्या या भूमिकेस आपो-आपच यश आलं.

वडार-समाजातील मुलगी, तरुण स्त्री ही अंगात चोळी घालते, हातात बांगड्या लेते, कुंकू लावते. हौसेनं इतर अलंकारही लेते.

आज या समाजात फक्त वयस्कर, म्हाताऱ्या स्त्रियाच जुन्या रूढीनं वागतात. पण सुशिक्षित अशिक्षित मुली व तरुण स्त्रिया बहुतेक अंगात चोळ्या घालतात असं दृश्य दिसतं.

तिम्मवाबाई ही वयानं निम्मीच्या पुढे झाली आहे. तिनं मात्र रूढीची चाकोरी सोडलेली दिसत नव्हती.

तिम्मवाबाईला चार मुलं होती. थोरला मुलगा बारा-तेरा वर्षांचा होता. शेवटची लहान मुलगी पाच वर्षांची होती. वयानं एवढी मोठी मुलं पण कामाच्या ओढाताणीत, कष्टाच्या जीवनात ती अंगापिंडानं बारीक दिसत होती.

ऊन पडलं. तिम्मवानं सगळ्यांना झोपडीत न्याहारीच्या भाकरी पितळीत वाढल्या. दुसऱ्या ताटात बोंबलाचं कोरड्यास वाढलं. तिचा नवरा न्याहारीला बसला. मुलगा बसला. बाकी मुलं न्याहारीला बसली. तीही न्याहारी करायला बसली.

त्यांची न्याहारी म्हणजे सकाळचं जेवणच म्हणा! त्यानंतर दुपारीच कामाची सुट्टी झाल्यावर एक-दोन वाजता ( कामाच्या ठिकाणी ) जेवण.

सगळ्यांनी भराभरा न्याहाऱ्या आटोपल्या. पोटभर पाणी प्याले आणि कामाला निघण्याची, झोपडीबाहेर पडण्याची सगळेच तयारी करू लागले.

तोवर तिम्मवाबाईनं फडक्यात भाकरीची चवड बांधली. त्या भाकरीवर बोंबलाची चटणी बांधून घेतली. दुसऱ्या एका डब्यात उरलेलं कोरड्यास घेतलं. एक तांब्या घेतला. हे सगळं लोखंडी पाटीत ठेवलं. त्यावर धोतराचा धडपा झाकला. ती लोखंडी पाटी झोपडीच्या बाहेर आणून ठेवली.

मग तिनं बाकी भांडी-कुंडी लाकडी पेटीत टाकली. पेटीला कुलूप लावलं. किल्ल्या कंबरेला खोवलेल्या कापडी पिशवीत टाकल्या व ती बाहेर आली. झोपडीचं दार बंद केलं आणि ते सर्व घर-दार आपल्या कामावर निघालं.

तिम्मवाबाईचं कुटुंब शहरवस्तीत पत्र्याच्या झोपडीत राहात होतं. तिथं वडार-समाजाच्या बऱ्याच झोपड्या होत्या. वडार जमात ही कष्टकरी-कामकरी जमात आहे. पोटा-पाण्याच्या कामानिमित्तानं त्यांची वस्ती फिरती राहते. विशेषतः लहान-मोठ्या धरणाच्या, तलावाच्या ठिकाणी त्यांच्या झोपड्या उभ्या राहिलेल्या दिसतात. तसंच मोठ-मोठ्या बिल्डिंगच्या कामाच्या जागीही त्यांच्या झोपड्या उभ्या राहतात. जोपर्यंत कामं चालतात तोपर्यंत ते तिथं राहतात. अशी मोठी कामं संपली की त्यांच्या झोपड्यावस्त्या तेथून उटतात आणि दुसरीकडे काम मिळेल तिकडं यांची बिऱ्हाडं जातात.

आता काही काही शहरांत व गावांत वडार-समाजाची वस्ती स्थायिक-कायमची घर-दारं करून राहिलेली आहेत. पण काही काही गावांत अशा स्थायिक झालेल्या वडार-समाजाची परिस्थिती चरितार्थासाठी कामधंदा न मिळाल्यानं गंभीर झालेलीही दिसते. आणि त्यामुळंच अशा परिस्थितीत स्थायिक झालेले पण कामासाठी पुन्हा काम मिळेल तिकडं कुटुंबं घेऊन जातात व पुन्हा त्यांच्यावर भटकं जीवन जगण्याचा प्रसंग येतो. फारतर पावसाळ्यात आपल्या गावी येतात. पावसाळा संपल्यावर पुन्हा बाहेर पडतात. परंतु स्थायिक झालेल्या ज्या कुटुंबांची चांगली शेती आहे ती कुटुंबं मात्र आपलं गाव-घर-दार सोडत नाहीत. ते शेतीच्या व्यव-सायावरच राहतात. अशी काही कुटुंबं सांगली-कोल्हापूरकडे आढळात येतात.

त्यातच आजकाल शहरात नवनवीन बिल्डिंगची कामं सततच निघतात, उभी राहतात. शहरांच्या या वाढत्या विस्तारामुळं वडार-समाजालाही सतत कामधंदा मिळतो. म्हणूनच शहराच्या ठिकाणी वडार-समाजाची वस्ती अधिक प्रमाणात वाढत आहे. पुणे शहरात चतुःशृंगीजवळच्या खोऱ्यात आणि येरवडाजवळच्या भागात या समाजाची फारच मोठी वस्ती स्थायिक झालेली आहे.

चतुःशृंगीजवळ वडार समाजातील मंडळींनी आपल्या को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायट्या स्थापन करून आपापली पक्की, चांगली घरं बांधली आहेत. येरवड्यालाही त्यांची एक सोसायटी आहे.

शहरात कायमस्वरूपी निश्चित काम मिळतं म्हणून या वडार समाजातील काही काही लोकांनी आपापली पक्की घरं हौसिंग सोसायटीत बांधली. त्यामुळं निदान त्यांचं तरी भटकं जीवन आज संपुष्टात आलेलं आहे.

पण तिम्मवाबाईचं कुटुंब मात्र आजही पत्र्याच्या झोपडीतच राहतं. तिची झोपडी अद्याप सुटलेली नाही.

ऊन झालं. सकाळचे आठ वाजले. तिम्मवा, तिचा नवरा, मुलं कामाच्या वाटेनं झपाझपा चालत होते. तिम्मवाच्या डोक्यावर भाकरी–कोरड्याशाची पाटी होती. पाठीमागं त्यांच्याबरोबर पळणाऱ्या मुलीला तिनं कडेवर घेतली व ती झपाझपा पावलं टाकू लागली. तिच्या नवऱ्याच्या खांद्यावर खांदावयाचा टिकाव होता. थोरल्या मुलाच्या खांद्यावर खोरं होतं.

त्यांचं रोजचं गुराढोरासारखं काम. दिवसभर. सायंकाळपर्यंत श्रम करून, काम आटपून ते पुन्हा दिवेलागणीला घरी येणार. मग झोपडीत आल्यावर तिम्मवाबाईला पुन्हा चूल पेटवावी लागे. सगळा स्वैपाक करायचा. जेवणं उरकायची. मग पोटात भाकरी गेल्यावरच धरणीवर अंग टाकायचं. धरणीवर अंग टाकल्याटाकल्या तिचा पटकन डोळा लागणार.

असाच हा वडार-समाजातील स्त्रियांचा रोजचा जीवनक्रम असतो. वडार स्त्रीला सुट्टीचा-- रविवारचा दिवस म्हणजे सणासारखा वाटतो. त्या दिवशी ती निवांतपणे न्हाईल, आपलं धुणं-पाणी करील. आठवड्याच्या कामाचे पैसे हातात पडल्यानं ती त्या दिवशी आठवड्याचा बाजार करील आणि त्या दिवशी मटन-रश्याचा छान बेतही करील. तो तिचा खरा विश्रांतीचा दिवस.

वडार–समाजातील स्त्री ही धडधाकट, काटक असून ती खरी काबाडकष्ट करणारी, कष्टकरी असते. ती आपल्या संसारात नवऱ्याच्या बरोबरीनं श्रमाची, कष्टांची कामं करते आणि आपल्या मुलाबाळांच्या संसाराला मोठा हातभार लावते.

आठवड्याचा कामाचा पगार आला तर ती आपल्या नवऱ्याच्या हातात सगळे पैसे देते. त्यातून तो आठवड्याच्या बाजाराचे पैसे तिच्या हातात ठेवतो. बाकी सगळे पैसे नवऱ्याच्या जवळच राहतात. असंच चित्र बहुतेक दिसतं. अर्थात घरातल्या महागाईच्या, ओढाओढीच्या संसारात हातात पैसा तरी कुठला शिल्लक राहणार! कष्ट करावयाचे अन पोट भरावयाचे असाच त्यांचा जीवनक्रम !

वडार-समाजात हल्ली मुलां-मुलींत शिक्षणाचा प्रसार वाढत आहे. काही मुलींनी कॉलेजात शिक्षण घेतलं आहे. त्यापैकी पुणे येथील श्री. माने गुरुजी (ए. डी. आय.) यांची एक मुलगी बी. कॉम.पर्यंत शिकलेली आहे. दुसरी एस. एस. सी पर्यंत शिकलेली आहे. मराठी प्राथमिक शाळेत मराठी ४ थी ५ वी पर्यंत शिक्षण घेऊन अनेक मुलींना घरच्या परिस्थितीमुळं शिक्षण सोडावं लागलं आहे.

या समाजातील काही मुली ऑफिसात क्लार्क म्हणून नोकरी करतात, तर सांगली-सातारा जिल्ह्यांत काही काही शाळेत शिक्षिका म्हणूनही नोकरी करतात. अर्थात अशा नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे पतीही नोकरी करीत असतात. काही काही क्लार्क, शिक्षक व इंजिनीयरही आहेत.

पुण्यात वडार समाजातील मुला-मुलींना शिक्षण देण्यासाठी श्री. माने गुरुजी यांनी १९४६ साली एक खासगी शाळा काढली होती. हीच शाळा पुढं म्युनिसिपालिटीनं ताब्यात घेतली. याच शाळेतून या समाजातील बऱ्याच मुलींना शिक्षण मिळालं. पण अद्यापही हायस्कूल व कॉलेजच्या शिक्षणाचा प्रसार या समाजातील मुलींत दिसून येत नाही. सुशिक्षित नोकरी करीत असलेल्या वडार समाजातील कुटुंबात मात्र आपल्या मुला-मुलींना अधिक शिकवण्याकडे कल आहे. त्यांच्यात अधिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी मुलींच्या स्वतंत्र वसतिगृहाच्या सोयीची आवश्यकता आहे. त्यासाठी समाज कार्यकर्ते व सरकारनं इकडं लक्ष देणं आवश्यक आहे.

वडार-समाजातील स्त्री ही अत्यंत कष्ट व श्रम करणारी स्त्री आहे. तिच्या कष्टाच्या मानानं तिला सुखाचे व समाधानाचे दिवस आलेले दिसत नाहीत. अर्थात याला मूळ कारण या समाजाची मोठी गरिबी हेच आहे. म्हणून तिम्मवाबाई व तिच्याचसारख्या असंख्य स्त्रियांना रोजच गुराढोरांसारखी काबाडकष्टाची कामं पोट भरण्यासाठी करावी लागतात.

या वडार-समाजातील 'स्त्री'च्या वाट्याला आलेलं हे कष्टाचं जीवन एकूण सर्व समाजात आर्थिक-समता स्थापन झाल्याशिवाय जाणार नाही, असं दिसतं.

—स्त्री : मे १९७१

*

६

# एक वेगळं जग

आगगाडीला वेग आला होता.

स्टेशनामागं स्टेशनं झपाट्यानं मागं पडत होती. माणसांचे थवेच्या-थवे नजरेसमोरून झटपट जात होते. आगगाडीच्या वेगाबरोबर झाडामागं झाडं वेगानं मागं मागं धावत होती. रानाला वेग आला होता. झाडांना वेग आला होता. झुडपांना वेग आला होता. रेल्वेच्या खांबांना वेग आला होता. गाडी उधळत भर वेगात होती. तिच्या आवाजाला गती आली होती.

आगगाडीच्या गतीच्या आवाजात मधुर आवाजाचे तरंग दुसऱ्या डब्यात लांब कुठंतरी उठले. तो मधुर आवाज त्या डब्यात घुसला. त्या गोड आवाजाला एकतारी अन् चिपळ्यांची साथ होती. त्या मधुर आवाजानं डब्यातल्या लोकांचे कान टवकारले. नजरा बाजूला वळल्या. माझीही नजर त्या आवाजाच्या दिशेनं धावली. एकतारीच्या संगतीत अन् चिपळ्यांच्या तालावर गुंगणारा, भरारणारा आवाज जवळ आला. सर्वांच्या नजरा समोर झाल्या. तो समोरून अभंग गात येत होता. त्याच्या आवाजाची गोड लकेर डब्यात घुमत होती. अभंग तालसुरात गात घुमला होता.

'जे का रंजले गांजले
त्यासी म्हणे जो आपुले...

आणि हा अभंग आळवत तो जवळ आला.

त्याचा अभंग संपला होता. आता तो डब्यातल्या देव-साधूकडे धावा करत होता... त्याची व्यथा अन् कथा त्याच्या मुखातून धुराड्यागत बका बका बाहेर फेकत होता...

" ...माझ्या मायबापांनो ! माझ्या माता-पित्यांनो...

मी आज आपल्यासमोर आंधळा म्हणून आलो आहे.

आंधळा म्हणून तुमच्यासमोर येण्याचा माझ्यावर हा प्रसंग आला आहे.

तुम्हाला दिसतो तसा मी चांगला धडधाकट आहे, पण आंधळा आहे. त्यामुळं माझ्या आयुष्याच्या वाटेत माझ्यापुढं सगळा अंधार आहे. या अंधारातून मला पुढची वाट सापडेना म्हणूनच मी आपल्यापुढं आलो—

—अशी स्वतःच्या जीवनाची कथा सांगायला सुरवात करून तो पुढं सांगू लागला,

" माझ्या मायबापांनो ! "

मी चांगल्या सरकारी ऑफिसात शिपाई होतो. मला चांगला पगार मिळत होता. माझं चांगलं चाललं होतं. पण दुर्दैवाचा फेरा आला, अन् त्यात मी घावलो. त्यातच माझे हे डोळे गेले अन् माझ्यापुढं सगळा अंधार उभा राहिला... त्याच अंधारातून मी ही वाट काढत आहे. "

असं बोलून तो आंधळा पुढं बोलला,

" माझ्या मायबापांनो !

ही माझ्याबरोबर माझी आई आहे. मला लहान-लहान सात-आठ, सात-आठ वर्षांची दोन मुलंही आहेत. पण त्यांचं जगणं घरट्यावाचून पक्षी जगतो तसं आहे. माझ्या डोळ्यांपुढं अंधार दाटला. त्या माझ्या बाळ-बच्च्यांच्या पुढंही आता संकटाचा डोंगर उभा आहे. मी आंधळा झालो. ती माझी लेकरं आता अनाथ झाली. त्यांना या जगात कोण वाली ? आता मीच माझ्या आईला व मुलांना पाहातो. या अंधारातून रोजच वाट काढत चालतो. आला दिवस पुढं ढकलतो.

माझ्या आईच्या हातापायात जीव होता, तोवर तिनं मला सांभाळलं. माझ्या लहान मुलाला घास-तुकडा चारून कसंतरी जगवलं. पण तीच माझी सावली कमी होत आली-आता सावलीचं झाडच वठू लागलं, तर त्याची सावली कशी पडणार ?

—त्यामुळं मलाच या आगीत उभा राहणं भाग होतं. मी एकतारीवर अभंग गायला शिकलो. गाणी गायला शिकलो. मला माझ्या आवाजानं साथ दिली. त्यात एकताऱ्या अन् चिपळ्यांनी आधार दिला.

मी आता पुढची वाट चालू लागलो आहे. आता तर माझ्या आईचे हातपाय थकले आहेत. तिच्या हाता-पायातला जीव कमी झाला. या माझ्या आईला मरेपर्यंत पोटाला भाकरी घालणं माझं कर्तव्य आहे. ती परमेश्वराच्या दारी गेल्यावर मला पुढच्या सगळ्या वाटा

६

# एक वेगळं जग

आगगाडीला वेग आला होता.

स्टेशनामागं स्टेशनं झपाट्यानं मागं पडत होती. माणसांचे थवेच्या-थवे नजरेसमोरून झटपट जात होते. आगगाडीच्या वेगाबरोबर झाडामागं झाडं वेगानं मागं मागं धावत होती. रानाला वेग आला होता. झाडांना वेग आला होता. झुडपांना वेग आला होता. रेल्वेच्या खांबांना वेग आला होता. गाडी उधळत भर वेगात होती. तिच्या आवाजाला गती आली होती.

आगगाडीच्या गतीच्या आवाजात मधुर आवाजाचे तरंग दुसऱ्या डब्यात लांब कुठंतरी उठले. तो मधुर आवाज त्या डब्यात घुसला. त्या गोड आवाजाला एकतारी अन् चिपळ्यांची साथ होती. त्या मधुर आवाजानं डब्यातल्या लोकांचे कान टवकारले. नजरा बाजूला वळल्या. माझीही नजर त्या आवाजाच्या दिशेनं धावली. एकतारीच्या संगतीत अन् चिपळ्यांच्या तालावर गुंगणारा, भरारणारा आवाज जवळ आला. सर्वांच्या नजरा समोर झाल्या. तो समोरून अभंग गात येत होता. त्याच्या आवाजाची गोड लकेर डब्यात घुमत होती. अभंग तालासुरात गात घुमला होता.

' जे का रंजले गांजले
त्यांशी म्हणे जो आपुले...

आणि हा अभंग आळवत तो जवळ आला.

त्याचा अभंग संपला होता. आता तो डब्यातल्या देव-साधूकडे धावा करत होता… त्याची व्यथा अन् कथा त्याच्या मुखातून धुराड्यागत बका बका बाहेर फेकत होता…

" …माझ्या मायबापांनो ! माझ्या माता-पित्यांनो…

मी आज आपल्यासमोर आंधळा म्हणून आलो आहे.

आंधळा म्हणून तुमच्यासमोर येण्याचा माझ्यावर हा प्रसंग आला आहे.

तुम्हाला दिसतो तसा मी चांगला धडधाकट आहे, पण आंधळा आहे. त्यामुळं माझ्या आयुष्याच्या वाटेत माझ्यापुढं सगळा अंधार आहे. या अंधारातून मला पुढची वाट सापडेना म्हणूनच मी आपल्यापुढं आलो—

—अशी स्वतःच्या जीवनाची कथा सांगायला सुरवात करून तो पुढं सांगू लागला,

" माझ्या मायबापांनो ! "

मी चांगल्या सरकारी ऑफिसात शिपाई होतो. मला चांगला पगार मिळत होता. माझं चांगलं चाललं होतं. पण दुर्दैवाचा फेरा आला, अन् त्यात मी घावलो. त्यातच माझे हे डोळे गेले अन् माझ्यापुढं सगळा अंधार उभा राहिला… त्याच अंधारातून मी ही वाट काढत आहे. "

असं बोलून तो आंधळा पुढं बोलला,

" माझ्या मायबापांनो !

ही माझ्याबरोबर माझी आई आहे. मला लहान-लहान सात-आठ, सात-आठ वर्षांची दोन मुलंही आहेत. पण त्यांचं जगणं घरट्यावाचून पक्षी जगतो तसं आहे. माझ्या डोळ्यांपुढं अंधार दाटला. त्या माझ्या बाळ-बच्च्यांच्या पुढंही आता संकटाचा डोंगर उभा आहे. मी आंधळा झालो. ती माझी लेकरं आता अनाथ झाली. त्यांना या जगात कोण वाली ? आता मीच माझ्या आईला व मुलांना पाहातो. या अंधारातून रोजच वाट काढत चालतो. आला दिवस पुढं ढकलतो.

माझ्या आईच्या हातापायात जीव होता, तोवर तिनं मला सांभाळलं. माझ्या लहान मुलाला घास-टुकडा चारून कसंतरी जगवलं. पण तीच माझी सावली कमी होत आली-आता सावलीचं झाडच वठू लागलं, तर त्याची सावली कशी पडणार ?

—त्यामुळं मलाच या आगीत उभा राहणं भाग होतं. मी एकतारीवर अभंग गायला शिकलो. गाणी गायाला शिकलो. मला माझ्या आवाजानं साथ दिली. त्यात एकताऱ्या अन् चिपळ्यांनी आधार दिला.

मी आता पुढची वाट चालू लागलो आहे. आता तर माझ्या आईचे हातपाय ढकले आहेत. तिच्या हाता-पायातला जीव कमी झाला. या माझ्या आईला मरेपर्यंत पोटाला भाकरी घालणं माझं कर्तव्य आहे. ती परमेश्वराच्या दारी गेल्यावर मला पुढच्या सगळ्या वाटा

मोकळ्या आहेत. त्यातल्या दिसेल त्या मार्गानं मी पुढं जाईन. या आंधारातूनच मी माझ्या मुलांनाही प्रकाश दाखवीन!

——म्हणूनच तुम्ही माय-बापांनो!

मी तुमच्यासमोर हा माझा हात पसरत आहे. तुम्ही माझ्या मुलांच्या, माझ्या आईच्या पोटाला पाच पैसे द्या! कुणी दहा पैसे द्या! देव तुमचं कल्याण करील! माझा आंधळ्याचा हा आशीर्वाद आहे..."

——अशी शेवटची विनवणी करून त्या आंधळ्यानं पुढच्या अभंगाला सुरवात केली. आपल्या गोड आवाजानं सगळं वातावरण भरून टाकलं. आणि तो संत अभंग आळवू लागला,

" चोखा डोंगा परी भाव नोव्हे डोंगा ।
काय भुललासी वरलिया सोंगा ? ।।

——आणि तो हा चोखोबाचा अभंग आपल्या मधुर आवाजात गाऊ लागला. त्याच्या पाठोपाठ त्याची म्हातारी आई होती. तिच्या हातात एक कथलाची लहानशी ताटली होती. ती आपल्या वाळक्या सुरकुतलेल्या हातानं डब्यातल्या एका एका पॅसेंजरपुढं केविलवाणा चेहरा करून धरत होती. त्यात पाच, दहा, असे पैसे पडत होते. त्याचा आवाज होत होता.

—आंधळा गडी तसा तरुण. तीस-पस्तीशीतला दिसत होता. तो रंगानं सावळा होता; पण तो काळजीनं करपून गेल्यागत दिसत होता. तो तरुण गडी, पण त्याच्या अंगात तारुण्याचं रक्त दिसत नव्हतं. त्याचे हात-पाय वाळल्यागत दिसत होते. त्याच्या चेहऱ्याची हाडं वर आली होती. डोळ्यांच्या खोबण्या खोल गेलेल्या होत्या. त्यात त्याच्या डोळ्यांची पांढरट-तांबूस बुबुळं हालचाल करीत होती; पण ती अंधारात बुडल्यागत होती. बुबुळांची हालचाल हेच काय ते डोळ्यांचे सजीवपण; बाकी त्या बुबुळांना दृष्टी नव्हती. त्याच्यापुढं सगळा अंधार होता. त्याचा अंग-पिंड तसा सुकलेला, उतरलेला दिसत होता.

त्या आंधळ्या गड्यानं एक लांब खाकी पॅंट घातलेली होती. त्या पॅंटला गुडघ्यावर, ढुंगणावर, ठिगळं मारलेली होती. ती ठिगळं जागोजाग मारलेली होती. ती ठिगळं अशीच कसल्या-बसल्या पांढऱ्या कापडाची होती. त्याच्या अंगात शर्ट होता. शर्टाला बटणं नव्हती. बटणांची भोकं चिंध्यानं बांधलेली होती. त्यामुळं त्याची छाती झाकलेली होती. त्याच्या गळ्यात पंढरीच्या विटोबाची माळ दिसत होती. ती शर्टावर स्पष्ट दिसत होती. त्याची दाढी वाढलेली होती. ती काळीभोर उठून दिसत होती. त्यातच त्याच्या कपाळावर गोपी-चंदनाचा पट्टा होता. त्यावर आबीरबुक्का लावलेला होता.

त्याच्या गळ्यातली माळ अन् कपाळावरच्या गोपीचंदन-आबीरबुक्क्यामुळं तो पंढरीचा वारकरी बनलेला दिसत होता. त्यातच त्याच्या मुखातून सुरेल आवाजात संतांचे अभंग बाहेर पडत होते.

त्या आंधळ्याच्या डोक्यावर कान मुडपलेली सफेत टोपी होती. त्याच्या गळ्यात वीणा होता. त्याच्या उजव्या हाताचं पहिलं बोट वीण्याच्या तारेवर होतं. डाव्या हातात चिपळ्या होत्या आणि तो अशा वेशातच गोड आवाजात संतांची वाणी एकतारीवर डब्यातल्या लोकांना ऐकवत होता. लोकही शांतपणे ऐकत होते. त्याच्या पाठीमागं असलेल्या त्याच्या आईच्या हातातील ताटलीत पाच-दहा पैसे टाकण्यासाठी कुणी कुणी हात पुढं करीत होते. ताटलीत नाणं पडताच त्याचा आवाज होत होता. त्याबरोबर ती मायलेकरं दात्यांना आशीर्वाद देत होती. एक एक मंद पाऊल टाकत, अभंग आळवत तो आंधळा पुढं चालला होता...

त्या आंधळ्या पाठोपाठ त्याची म्हातारी आई होती. ती थकलेली दिसत होती. तिचा देह चिपाडागत वाळलेला दिसत होता. तिचा सावळा वाग काळपट पडलेला होता. तिच्या चेहऱ्यावर सुरकुत्यांचं जाळं उठलं होतं. तिचे केस करड्या रंगाचे झाले होते. तिच्या हातातले कथलाचे गोट ढिले झाल्यानं मागेपुढे सरत होते. तिचे डोळे खोल गेले होते. ती बोंबलागत वाळलेली म्हातारी, पण तिच्या डोळ्यांत एकप्रकारचे करारीपणाचे तेज चमकत होते.

तिच्या अंगावर चिंध्याच होत्या. फाटक्या लुगड्याला जागजागी शिवून ठिगळं देऊन तगवलं होतं. त्यात तिनं आपली अब्रू कशीतरी झाकली होती. तिच्या अंगात तसाच फाटका, डगळ, मोठा, मळकट ब्लाऊज दिसत होता. आंधळ्याच्या खांद्याला जशी एक मोठी पिशवी अडकवलेली होती तशीच मोटी पिशवी या म्हातारीच्या खांद्यालाही अडकवलेली दिसत होती. त्याच पिशव्यांत त्यांच्या चालत्या जीवनाचा संसार असावा असं काय काय अजून डोकावत होतं. ती म्हातारी आपल्या आंधळ्या लेकाच्या पाठोपाठ भिंतीसारखी आधार देत होती. ही माय-लेकरं एकमेकांना आधार देत पुढं चालली होती.

—आगगाडीला वेग आला होता.

पण आंधळ्याच्या पावलाची गती मंद होती. त्याच्या पाठोपाठ त्याच्या आईचीही गती अधिकच मंद होती.

—त्यात ती पुन्हा पुन्हा मागं पाहात होती. मंद मंद पावलं टाकत पुढं चालली होती. आणि क्षणाक्षणाला मागं नजरही टाकत होती. तिची नजर अस्थिर दिसत होती. तिच्या नजरेत चिंता उठून दिसत होती.

तिची एक नजर पुढं होती.

तिची एक नजर पाठीमागं होती.

ती हातातली ताटली एका एका पॅसेंजरच्या पुढं पुढं करीत होती.

त्यात पाच पैसे, दहा पैसे पडत होते. ते पाहून तिचा चेहरा उजळत होता. पण पुन्हा लगेच ती काळजीनं मागं नजर टाकीत होती.

—त्याच वेळी आंधळ्याच्या मधुर आवाजातला अभंग सगळ्या डब्यात घुमत होता...

तेवढ्यात चालता चालता आंधळ्याच्या म्हाताऱ्या आईला मी हाटकलं; ती उभी राहिली. माझ्या मनात एक प्रश्न उभा होता. तो तिला विचारावा का न विचारावा ? विचारला तर तिला काय वाटेल ? अर्थात माझ्यापुढं प्रश्न सरळच होता. तो म्हणजे, तो आंधळा बोलला, त्याच्या दोन मुलांची आई कुठाय ? आणि त्याची ती दोन मुलं तरी कुठं आहेत ? अर्थात याचं उत्तर सरळ होतं. त्याची बायको आणि मुलं त्याच्या घरी असतील. ते जिथे वस्तीला असतील त्याच ठिकाणी ती अन् त्याची मुलं असतील. हे उत्तर माझ्यापुढं असतानाही मी त्या म्हातारीला विचारलंच,

'म्हातारे ! तुझे नातू कुठं आहेत ?'

तोच ती म्हातारी बावऱ्याबावऱ्या नजरेनं पाठीमागं पाहात म्हणाली,

'पाठीमागच्या डब्यातच असतील !'

'म्हणजे तुमच्या पाठोपाठच !'

'हो ! ते आमच्या पाठोपाठच भीक मागत आहेत ! ते मागच्या डब्यात असतील बघा !'

म्हातारीच्या या उत्तरानं माझ्यापुढं सरळ प्रश्न आला व त्या म्हातारीला मी सरळच विचारलं,

'पण म्हातारे, त्या मुलांची आई तुझी सून कुठाय ?'

मला वाटलं म्हातारी सरळ उत्तर देणार, 'माझी सून घरी आहे ! ती आमच्या झोपडीतला संसार सांभाळते !' पण माझ्या या प्रश्नानं म्हातारीला एकदम ब्रेक लागल्यागत झालं. तिची जीभ अडखळली. तिच्या तोंडातून काहीच शब्द उमटेना. तिचा चेहरा पडल्यासारखा दिसला. तिची नजर खाली झाली व ती खाली मान घालूनच मला बोलली,

'बाबा ! आता माझ्या सुनेची काय तऱ्हा सांगू ?'

तिच्या या उत्तरावरून मला वाटलं, यात काहीतरी घोटाळा आहे. म्हणून मी चटकन विचारलं,

'कसली तऱ्हा म्हणता ?'

तोच ती अनेक उन्हाळे-पावसाळे खाल्लेली म्हातारी मला म्हणते,

'आवो, आजची जगरहाटी उलटी झाली ! कली उलटी फिरली !'

तिच्या उत्तरात खोल अर्थ होता खरा. पण मी तिला मुद्दाम विचारलंच,

'म्हणजे ? काय झालं म्हणता ?'

तोच ती थोडी रागाच्या सुरात बोलली,

'रांड! दुसऱ्याचा हात धरून गेली!'

मी आश्चर्यानं विचारलं,

'खरं म्हणता!'

त्यावर ती म्हणाली,

'आता तिला आंधळा नवरा कसा चालंल?'

त्यावर मी लागलीच बोललो,

'पण मुलं होती दोन!'

'होय! होती! पण बाहेरचं चांगलं चांगलं खायला सोकलेल्या आवाला आपल्या मुलांची कुठं कदर हाय?'

'म्हणजे ती मुलं टाकून पळाली म्हणता?'

'हो बाबा! तिच्या अंगात ताजं रक्त होतं ना! तिचा पाय काय जाग्यावर ठरत नव्हता!'

'असं म्हणता काय?'

'तर काय! म्हणून तर ही रांड पोटची मुलं जागीच टाकून, आंधळ्या नवऱ्याला जाग्यावरच झोपवून, पसार झाली!'

'वाईट झालं मग.'

'काय करता! काळ मागं लागायचा म्हटल्यावर चोहू बाजूनं लागतो! त्याला तोंड दिलंच पाहिजे!'

—म्हातारी मात्र मोठ्या निर्धारानं बोलत होती, त्यात मी सहज विचारलं,

'किती दिवस झाले, सून पळून गेली?'

'झाली की आता दोन-तीन वर्षं!' असं सांगून म्हातारी पुढं बोल्ली,

'त्यावेळेपासून मी सगळ्या संसाराचा बोजा अंगावर घेतला. लहान मुलांना घास-घास घालून त्यांना आता वाढवत आणली. आता बघा माझेच हातपाय ठकले. देवच त्यांचं भलं करो!'

असं खोल आवाजात बोलून ती पुढं सरकली. मंद मंद पावलं टाकत, पुन्हा पाठीमागं पहात, ती म्हातारी पुढं चालू लागली. तेवढ्यात आंधळा गोड सुरात अभंग आळवू लागला...

> चोखा डोंगा, परी रस नव्हे डोंगा।
> काय भुललासी वरलीया सोंगा?॥

आंधळा पुढच्या डब्यात गेला. पाठोपाठ त्याची म्हातारीही गेली. आंधळ्याच्या आवाजानं आगगाडीचा डबा भरून गेला. त्याच आवाजात मीही गुंग होतो...

आगगाडीला वेग आला होता.

स्टेशनामागं स्टेशनं ती मागं टाकत होती. मोठमोठ्या स्टेशनात गाडी उभी राहात होती. माणसांची गर्दी बाहेर पडत होती, तेवढाच बाहेरचा लोंढा आत डब्यात शिरत होता. लोक दाटीवाटीनं घुसत होते. स्टेशनातून गाडी पुढं हालत होती. तिला वेग येत होता. गाडीच आपल्या ताला-सुरात चालली होती. वेगात भर वेगात.

तेवढ्यात डब्यात मुलांचा फिल्मी गाण्याचा कर्कश आवाज शिरला. एक आवाज पुढं, दुसरा पाठीमागं. त्यात दगडी फरशीच्या चिपळ्यांची साथ. त्यांच्या कंठातून आवाज चढत होता. उतरत होता.

— तो मुलांचा आवाज पुढं पुढंच आला. मी पाठीमागं मान करून पाहिलं. ती दोन मुलं. एक सात-आठ वर्षाचं दिसत होतं. त्याच्या पुढं चालणारं पाच-सहा वर्षांचं दिसत होतं. एक सिनेमाचं गाणं संपलं. त्यांनी दुसरं सुरू केलं. गाणं गात गात ती पुढं आली. मी त्यांच्याकडे एकटक पाहात होतो.

गाणं गाताना त्या दोघाही मुलांच्या नरडीच्या शिरा तटतटत होत्या. त्यांच्या घशाला कोरड पडत होती. तरीही ती टासून आवाजात गाणं गात होती. लहान मुलगा पुढं होता. त्याचा पैशासाठी पसरलेला हात पुढं होता. एकएका पॅसेंजरच्या पुढं ते हात पसरत होते.

—ते लहान मूल काळंबेरं दिसत होतं. त्याचा चेहरा, उभा पिंड, पाण्यावाचून सुकलेल्या कोवळ्या रोपट्यागत दिसत होता. चेहरा घामट मळकट होता. तोंडाला पाणी लावलेलं दिसत नव्हतं. त्याच्या डोक्याचे केस वाढलेले होते. गाणं गाता गाता ते मूल मध्येच खराखरा डोकं खाजवत होतं आणि आपल्या कोवळ्या नरड्यातून किनरा आवाज गाण्याच्या तालात बाहेर फेकत होतं. मध्येच पैशासाठी आपला कोवळा हात पुढं पसरत होतं.

– त्या लहान मुलाचे डोळे कसे तेजस्वी होते. काळेभोर. पण हाता पायांच्या काटक्या झालेल्या दिसत होत्या. कडक उन्हाच्या रट्ट्यात कोवळं गवत करपावं तसं ते दृश्य दिसत होतं. पण ते ऊन-वारा-पाऊस खाऊन टिकून होतं. खुरट्या रूपात का असेना पण वाढत होतं.

त्यांच्या अंगात तांबूस शर्ट होता. त्याला कधी पाणी मिळालं होतं याचा पत्ता नव्हता. पुढच्या पदराला किटण चढल्यागत दिसत होतं. शर्टाच्या खिशात काय-बाय ठेवल्यानं खिसा फुगला होता. ते आपलं देहभान विसरून फिल्मी गाणं गात होतं. केविल-वाणा चेहरा करून आपला हात पसरत होतं.

त्याच्या पाठोपाठ त्याचा कळता भाऊ होता. गाणं गाताना त्याच्या नरडीच्या शिरा तटाटत होत्या. त्याच्या हातात दगडी चिपळ्या होत्या. आपल्या आवाजाला त्या चिपळ्यांची साथ देत होता.

—त्या मोठ्या मुलाचा रंग सावळा होता. तोही आपल्या लहान भावासारखाच रानातल्या सुकलेल्या कोवळ्या ताटागत दिसत होता. दोघाही भावांच्या चेहऱ्यांवर लहानपणाचं तेज, लहान-मुलाचं बाळसं, दिसत नव्हतं. त्यांचे चेहरे निस्तेज, फिक्कट दिसत होते. त्यातच त्यांच्या अंगाला कधी आठ आठ दिवस पाणी मिळतं की नाही, याचा पत्ता नव्हता. त्यामुळं तर त्याचं अंग, चेहरा कळाहीन झालेला दिसत होता. त्यात डोक्यावर वाढलेला केसांचा मोठा टोप, त्यामुळं तर त्याचा सगळा अवतार काहीतरीच दिसत होता.

त्यात मोठ्या मुलानं पांढरट पण धुळकट-मळकट चड्डी घातली होती. अंगातही निळसर रंगाचा बुशशर्ट होता. तो घामट-मळकट झालेला दिसत होता. लहान भावाप्रमाणेच त्याच्याही डोळ्यांत वेगळी चमक दिसत होती. आगगाडीच्या डब्यात गाणं गाताना त्याच्या चेहऱ्यावर कसलाच कावरे-बावरेपणा नव्हता. डोळ्यांत बुजरेपणा नव्हता की भीती दिसत नव्हती. त्यांची नजर एकस्थिर होती. त्यातच ते अगदी निर्धास्तपणे ठोकून गाणं गात होते, एका एका पॅसेंजरच्या पुढं जाऊन पैशासाठी हात पसरत होते. त्यांना कुणी पैसे देत होते. कुणी नजरेनंच 'पुढ हो!' असं दापीत होते.

त्या जोडीचं गाणं संपलं.

डब्यात एकदम शांतता पसरली.

आगगाडीला वेग होता. त्या वेगात आवाज होता. त्याला ताल होता त्या शांत डब्यात लहान मुलगा आपल्या निर्ढावलेल्या आवाजात एका एका पॅसेंजरला विनवीत होता,

'मला भूक लागलीय!

मला खायाला पैसे द्या!'

त्याच्या पाठोपाठ त्याचा मोठा भाऊ चालत होता. तोही केविलवाणं तोंड करून पुढं हात पसरत होता,

'गरिबाच्या पोटाला पैसे द्या!

काय खायला द्या! आम्हाला भूक लागलीय!'

त्यांच्या त्या मागणीत काय खोटं नव्हतं. त्यांच्या पोटांतली भूक त्यांच्या डोळ्यांत तरारून उभी राहिलेली दिसत होती. त्यांची तोंडं भुकेनं सुकून गेलेली होती. काल रात्री, आणि सकाळी त्यांनी काय पोटांत भरलं होतं की नाही याचा पत्ता नव्हता! त्यांच्याजवळ एक पिशवी होती. ती एकदम जुनाट, तुटके बंद गाठी बांधून तयार केलेली दिसत होती. ती तेलकट, धुळकट अशी घाणेरडी होती. तीही मोकळीच दिसत होती. ती पिशवी त्या मुलांच्या पोटाचा आधार दिसत होती. ती मोकळी पिशवी आता कधी भरणार? हाही प्रश्नच होता.

मोकळी पिशवी! उपाशी पोट! भुकेलेला चेहरा. पोटातली भुकेली आग त्यांच्या डोळ्यांत उतरली होती. त्यांचे डोळे अन्नासाठी, खाण्यासाठी, काहीतरी आसुसलेले दिसत

होते. कुणी चिवडा खात होते त्याच्याकडे त्यांच्या हावऱ्या नजरा जात होत्या. कुणा पॅसेंजरचं लहान मूल बिस्कीट तोंडात धरून खात होतं ते पाहून भिकारी लहान मूल लाळेचा घुटका गिळत होतं. त्या मुलाच्या हातातल्या बिस्किटाकडं टकाटका पाहात होतं. त्याच्यापुढं हात पसरत होतं. त्यात चहा-पिणाऱ्या पॅसेंजरकडं पाहात थोरलं पोरगं पैशासाठी हात पसरत होतं. पण त्याला दाद मिळत होती पाच पैशांची. दहा पैशांची, ती नाणी पाहून त्यांचा चेहरा टवटवत होता. ती मुलं आपली पावलं पुढं ओढत होती. आपल्या कर्कश आवाजात सिनेमाची गाणी गात होती. त्याला दगडी चिपळ्यांची साथ देत होती. एका एका पॅसेंजरपुढं हात पसरत होती.

आगगाडीला वेग होता.

तिचा सूऽऽऽ खड् खट् खड् खट् असा तालबद्ध आवाज निघत होता. त्याच आवाजात त्या मुलांच्या गाण्याचा आवाज मिसळत होता. मुलांचं फिल्मी गाणं संपलं. डब्यात शांतता झाली. लहान मूल पॅसेंजरांच्या पुढं हात पसरत होतं. मोठ्या मुलानं माझ्यापुढं हात पसरला. मी त्याच्या हातावर दहा पैसे ठेवले. त्याचा चेहरा उजळला. तो पुढं सरकणार तोच मी त्याला विचारलं,

'कायरे, तुझे आईबाप कुठं आहेत?'

'आम्हाला आईबाप नाहीत!' असं त्या मुलानं चक्क उत्तर दिलं. ते ऐकून मी एकदम चाट पडलो. त्यानं मला पहिल्याच उत्तरात गप्प बसवलं. पण त्याच्या उत्तरानं माझ्यापुढं अनेक प्रश्न उभे केले.

'तुम्ही राहाता कुठं?' असा मी त्या मुलाला पुढचा प्रश्न केला. तेव्हा त्यानं सरळ उत्तर दिलं, 'असंच कुठंतरी स्टेशनात राहातो! स्टेशनाच्या बाहेर पण राहातो! जागा मिळंल तिथं! निवारा असंल तिथं!'

त्यांच्या या उत्तरानं माझ्यापुढं एक सवाल आला,

'अरं पण तुम्ही खाता काय? कुठं खाता?'

'आम्ही हॉटेलात खातो! काय मिळंल ते! भजी-पाव-मिसळ!'

'आणि त्याला पैसे?'

'असंच भीक मागून मिळतात, तेच!'

त्यावर मी त्याला सरळ प्रश्न केला,

'तुम्हाला पैसे मिळाले नाहीत तर?'

'आम्ही उपाशी राहातो. तसंच झोपतो!'

त्या मुलांच्या या उत्तरानं मला स्पष्ट काही, बोध होईना. त्यामुळं माझ्यापुढं काही प्रश्न उभे राहिलेच. एवढी लहान मुलं उपाशी कशी काय राहातात? त्यांना खरंच कुणाचा

आधार नाही का ? ती उगीच कुठंतरी कशी काय राहतात ? कुठं झोपतात ? त्यांना कुणाचा आसरा-निवारा नाही का ? पण त्यांची उत्तरं जर खरी असतील, तर त्यांचं जीवन भयंकर स्वरूपाचं आहे. हा मानवावर एक मोठा कलंक आहे. देशापुढं एक मोठा प्रश्न आहे. याचं उत्तर हे शोधलंच पाहिजे. नाहीतर लोकांच्या अशा जीवनातून देशापुढं, लोकांपुढं मोठे प्रश्न उभे राहतील.

पण मला त्या मुलाचं उत्तर खरं वाटेना. तो खोटं बोलत असावा, असं मला वाटू लागलं त्याचं कारण त्याच्या अगोदरच एक आंधळा व त्याची आई भीक मागत पुढं गेली. त्या आंधळ्यानं, त्याच्या म्हातारीनं सांगितलं की, 'आमची लहान मुलं आहेत. एक पाच-सहा वर्षांचं, दुसरं सात-आठ वर्षांचं. त्यांनी सांगितलेली त्यांच्या मुलांची वयं या मुलांना पाहिल्यावरोबर जुळत होती. तीही त्यांच्या मागोमागच भीक मागत येत होती. डब्यातच होती. त्यासाठी ती म्हातारी पुन्हा पुनः पाठीमागं पाहात होती. त्यामुळं माझी खात्री झाली की, त्यांची हीच मुलं असली पाहिजेत. अशी खरी परिस्थिती असताना ही मुलं अशी धादांत लबाड का बोलली ? कुणी त्यांना परिस्थितीनं असं बोलायला, असं वागायला शिकवलं ? भिकाऱ्यांच्या आणि चोरांच्या धंद्याचा अंत लागत नाही.

तोवर आगगाडी खंडाळा घाटात आली होती. खिडकीतून वर पाहिलं तर उंच उंच प्रचंड डोंगर आणि खालच्या बाजूला खोल खोल प्रचंड दरी. दोन्हीत अंतर मोठं होतं. खाली दरी, वर डोंगर अशा घाटातून, डोंगराच्या अंधाऱ्या बोगद्यातून आगगाडी निघाली होती. मधलं अंतर तोडत होती. तिला वेग होता.

माझ्यापुढं भिकाऱ्यांच्या मुलांनी प्रश्न उभा केला होता. आंधळ्याचा एक प्रश्न. मुलांचा दुसरा प्रश्न. पोटासाठी माणूस खोटं बोलतं. लबाड बोलतं. तशीच मुलं बोलत नव्हती ना ? त्यांचा आंधळा बाप पुढंच चालला असताना, त्यांची आजी पुढंच चालली असताना, त्यांनी खोटं का बोलावं ? त्या मुलांच्या खोटं बोलण्याच्या प्रवृत्तीमुळं मला त्यांची चीडच आली होती. भिकाऱ्याच्या धंद्यातलं हे एक 'टेकनिक'—एक मार्ग—तर नसेल ना ? त्याशिवाय दात्याला दया कशी येणार ! तो भीक कशी वाढणार ? ती मुलं माझ्या समोरून पुढं गेली होती. ती आपल्या आवाजात गाणी गात चालली होती. त्याला दगडी चिपळ्यांची साथ होती. त्यांनी माझ्यापुढं प्रश्न निर्माण केला होता.

आगगाडी घाटातून निघाली होती. घाटाबाहेरचं स्टेशन मागं पडलं होतं. मी जागेवरून उठलो. पुढच्या स्टेशनात गाडी थांबणार होती. चहा-कॉफी घ्यावी म्हणून मी जागेवरून लौकरच उठलो. दरवाजाकडं आलो. तेथे वाटेतच एक पत्त्यांचा डाव चालला होता. तो डाव ती भिकाऱ्यांची मुलंच खेळत होती. तो चाललेला डाव पाहून मी मात्र सर्दच झालो. त्यांचा रंगलेला डाव काही पॅसेंजर्स उभा राहून पाहात होते. डाव संपताच एक, दोन, तीन, अशा पैशाची नाणी पुढं पडली. मग माझी खात्री झाली की, हा

नुसताच पत्त्यांचा खेळ नसून, पैशाचा डाव चालला होता. तो पाहून मी त्यांना आवाज चढवून बोललो,

'काय रे जुगार खेळताय का ?'

तोच त्यातला एक कळता पोरगा कसा म्हणतो,

'छे ! छे ! आमी मजेत खेळतो ! आम्हाला पण पत्त्या खेळावा वाटतो !'

'तो खेळा ! पण जुगार कसा काय ?...'

तोच दुसरा पोरगा म्हणतो,

'आमच्या पोटाला काय नाही तवा आमी भीक मागतो, मग आमी जुगार कसा काय खेळणार ?'

'मी पहातो म्हणून बोलतो !'

"छे वो ! ही आमची मजा है !"

तोवर मला बाजूच्या कोपऱ्यात एक सात-आठ वर्षांचा मुलगा बसलेला दिसला. तो भीक मागणाराच. काही वेळापूर्वीच मी त्याला दहा पैसे दिले होते. तो तर बहाद्दर चक्क सिगारेट ओढत होता. नाका-तोंडातून धूर सोडत होता. त्याला पाहून माझं डोकंच चढलं. मी थोडा आवाज चढवून त्याला सवाल केला,

"काय रे भीक मागतोस अन् सिगारेट ओढतोस ?"

माझ्या या प्रश्नाचा त्याच्यावर काहीच परिणाम झाला नाही. त्यानं शांतपणे जोरात सिगारेटचा झुरका मारला, धूर गिळला, तो धूर नाका-तोंडावाटे बाहेर आल्यावर शांतपणे मला कसा उत्तर देतो,

"आमी भीक मागतो हे खरं ! पण माझ्या पोटातच रात्रीपासून काही नाही !"

"मग सिगारेट ओढून तुझं काय पोट भरणार थोडंच ?"

'पण मी माझा पोटाचा थंड कोटा गरम करतोय ! माझी तलप भागवून मी भूक मारतोय !'

त्याचं बोलणं मला न पटल्यानं मी ताडकन् त्याला बोललो,

'चल हट् ! लबाड काय बोलतोस ?'

'लबाड नाय ! मी खरं सांगतोय ! खरं ! दोन टायमाला जेवायला मिळाल्यावर कोण भीक मागंल ! तुमीच सांगा !'

त्या पोऱ्याचा उलटा सवाल एका अर्थानं बरोबर होता.

पुढचं स्टेशन आता लौकरच येणार होतं.

आगगाडी वेगातच होती.

तेवढ्यात त्याच वाटेत आंधळा आला. त्याच्या पाठोपाठ त्याची म्हातारी आईही आली. त्यांना पहाताच मी त्या म्हातारीला सवाल केला,

'काय म्हातारे! हा शिगारेट ओढणारा तुझाच नातू ना?'

त्याला पाहून ती चटकन् बोलली,

'हा माझा नातू नव्हं! माझा कोण नव्हं!'

'पण तूच काही वेळापूर्वी बोललीस ना! मला दोन नातू आहेत म्हणून!'

'हो आहेत की! पण हा नव्हं! यातला कोण नव्हं!'

मी तिला सरळ विचारलं,

'मग कुठं आहेत ते!'

तोच ती म्हातारी पाठीमागं तोंड करून, आपल्या हाताच्या बोटानं दाखवत पाठीमागच्या मुलाकडं पाहात बोलली,

'ही बघा माझ्या नातवांची जोडी!'

आणि खरंच तिच्या पाठोपाठ तिच्या नातवांची एक जोडी होती. त्याच वय-उमरीची; पण रंगानं सावळ्या वाणाची. आंधळ्याच्या तोंडावळ्याची. मग माझी खात्री झाली की, सिगारेट ओढणारी ही मुलं दुसरीच होती.

नंतर माझ्यापुढं विचार पडला की, सिगारेट ओढणाऱ्या मुलानं त्यांची जी कथा सांगितली ती खरीच असेल का? या अनाथ मुलांना आता कुणाचा आधार? खाली धरणी अन् वर आभाळ!

माझ्यापुढं मोठा प्रश्न उभा राहिला.

वर उंच डोंगर आणि खाली खोल खोल दरी...

त्या मुलांना समोर पाहून माझ्या डोक्यात विचारचक्र सुरू झालं होतं...

तेवढ्यात उभ्या-उभ्याच कुणीतरी ओरडलं,

'आरं! टी. सी. आला! मामा आला!!'

या आवाजाच्या इशाऱ्याबरोबर वाटेतला पत्त्याचा डाव मोडला. सिगारेटचं थोटुक त्या पोरानं बाहेर फेकलं. आणि ती सगळी भीक मागणाऱ्या मुलांची कंपनी पटापटा दरवाज्यातून डब्याच्या बाहेर गेली...

चालत्या-वेगवान गाडीच्या डब्याला उडत्या पाकोळ्या चिकटून बसाव्यात तशी ती बाहेर चिटकली होती. कुणी दोन डब्यांच्या मध्ये शिरली. कदाचित मधल्या बंपर्सच्या आश्रयाला. पोलीस-टी. सी. च्या तावडीतून वाचण्यासाठी सगळा हा आटापीटा होता!...

— त्यात आंधळ्याची मुलं होती. त्यांना बाहेर पडताना त्यांच्या आजीनं-म्हातारीनं-आवाज दिला,

‘ जिवाला जपून ! पुढच्या स्टेशनवर थांबा ! ’

गाडीचा वेग मंद होत होता.

पुढं स्टेशन आलं होतं.

सगळे आवाज बंद झाले होते...

माझ्या डोक्यात या जिवांच्या प्रश्नानं वादळ उठवलं होतं...

—समाज शिक्षणमाला २०२

❋

७

## सुगी तिथं पाखरं

सुगीचे दिवस आले होते. आणि मंगळवारी सायंकाळी दिवस मावळायच्या वेळेला मरीआईच्या पटांगणात कैकाड्यांची पालं, विसाव्याला पक्षी येतात, तशी उतरली.

देवळापुढं धूर निघाला. तीन दगडांच्या चुलीत जाळ पेटला. चुलीच्याभोवती बाया-मुलं गोळा झाली. मुलं खेळू-पळू लागली. गडी पालाच्या आजूबाजूला बिड्या फुंकत, पान-तंबाखू चघळत बसले. सुगी गाठून गावाला वेळेवर कैकाडी आले म्हणून पालाच्या भोवती एक-एक अशी गावकऱ्यांची वर्दळ वाढू लागली. कैकाडी गड्याच्याबरोबर पान-तंबाखूला बसले.

गावच्या उगवतीला मरीआईचं देऊळ आहे. देवळापुढंच चिंचेचं झाड आहे. चिंचेच्या झाडाची गारे-गार सावली सगळ्या पटांगणात पडत आहे आणि त्याच सावलीच्या आश्रयाला कैकाड्याचं पाल उतरलं आहे.

दुसरा दिवस उजाडला होता. सूर्य लांबवर आला होता. झाडाखालीच झाडाच्या बुडख्याच्या आडोशाला कैकाड्याच्या गोदाबाईनं चूल पेटवली होती. चूल तशी तीन धोंड्यांचीच होती. चुलीत निबर काटवयांचा ढणाढणा जाळ लागला होता. चुलीवरचा तवा तापला होता. गोदाबाई लोखंडी तगारीत पीठ मळत होती. हातावर भाकरी थापत होती. एकएक भाकरी तव्यात टाकत होती. तव्यात भाकरी शेकत होती. ती पुन्हा खाली चुलीतल्या लाल लाल इंगळावर ठेवत होती. इंगळावर भाकरी भाजून टम् फुगत होती. त्या भाकरीवर बाजूलाच उभा राहिलेल्या तिच्या लहान नातू-नातीचा डोळा होता. पापडानं टम् फुगलेली भाकरी गोदाबाईनं टोपल्यात टाकली.

'आय, मला भाकरी! आय, मला भाकरी!' असा मुलांनी हट्ट धरताच गोदा-बाईनं त्यांना भाकरी मोडून त्यातली कोर-कोर त्यांच्या हातात दिली. ऊनऊन भाकरी ते कोरडीच खाऊ लागले. चावू लागले. मग काय, ती मुलं मोठ्या खुशीत, आनंदानं कोकरा-गत उड्या मारीत भाकरी खाऊ लागली.

कैकाड्यांचं कुत्रं मुलांच्या हातातली भाकरी पाहून त्यांच्यापुढं गोंडा घोळत होतं. ती पोरं एखादा तुकडा कुत्र्याला टाकत होती. भाकरीच्या तुकड्यासाठी ते कुत्रं त्यांच्या पाठीमागं–मागं लागलं.

त्यांचीच शेरडं-करडं बाजूला चिंचेचा पाला उचलत होती. त्यांच्यापुढं चिंचेचे ढाळे पडले होते. दुसऱ्या बाजूला मुळोला गाय बांधली होती. तिच्यापुढं वासरू होतं. गाईच्या पुढं वाळकी चिपाडं पडली होती. ती पालाजवळच्या वैरणीच्या पेंडीकडे ओढ घेत होती. वासरू गाईच्या पुढंपुढं करत होतं. बाजूलाच कोंबड्या हिंडत होत्या. कण-दाणा टिपत होत्या.

गोदाबाईनं पटापटा भाकरी टाकल्या. भाकरीनं टोपलं भरलं. जवळच्या ल्हान पाट्यावर खसाखसा लाल मिरची वाटली. त्यात लसूण-मीठ टाकले. पुन्हा जोराचे घसरे दिले. त्या लाल मिरचीच्या चटणीचा गोळाचा गोळा करून भाकरीवर ठेवला. त्यावर दुसरी भाकरी झाकली. पुन्हा चुलीवर तव्यात ठेवलेल्या पाण्याला चांगली उकळी आली. त्यात झुणक्याचं पीठ टाकलं. लाल चटणी टाकली. तव्यात तवाभर झुणका तयार केला. तवा खाली उतरला. त्यावर पितळी झाकली. सगळा स्वैपाक गोदाबाईनं आटोपला. मग चुलीतल्या विस्तवावर पाण्याचे सपकारे मारून चूल विझवली. थंड केली.

गोदाबाईनं उभी राहून इकडंतिकडं नजर टाकली. आपले पशुपक्षी नजरेपुढंच आहेत हे पाहून ती आपल्या नातवांना आवाज देऊन बोलली,

'ये पोरांनो! दारातल्या जनावरांवर तुमी नीट नजर ठेवा! मी आता पाण्याची घागर ओढ्यानं घेऊन येती!'

त्यावर मुलांनी नुसत्याच माना डोलावल्या. गोदाबाई पाण्याची घागर घेऊन ओढ्याच्या बाटेनं पाणवठ्यावर गेली.

गोदाबाई कैकाडी तशी वयस्कर बाई. तिच्या डोईचे केस काळे-करडे होते. ती तशी पन्नाशीच्या पुढंच होती. पण गोदाबाईचा देह खणक दिसत होता. ती अंगानं सडपातळ होती. एवढ्या वयाची ती बाई पण कामासाठी निरगुडीच्या फोकागत लवलव हालत होती. तिचे हात-पाय काटक होते. निबर होते. तिचा वर्ण काळा-सावळा होता. पण उन्हा-तान्हातील कावाडकष्टानं काळा पडला होता. तिच्या अंगावर जाडंभरडंच पण जीर्ण झालेलं हिरव्या रंगाचं लुगडं होतं. त्या लुगड्याला दुसऱ्या तांबड्या लुगड्याचा दंड घातला होता.

ते तगवून अंगावर नेसली होती. तिच्या अंगात सैलसर विटक्या रंगाची चोळी होती. चोळीचे हात कोपरापर्यंत होते.

गोदाबाईच्या डोक्याचे केस वाळले होते. त्याचं बुरकुलं झालं होतं. रोजच्या पोटा-पाण्याच्या उद्योगात तिनं कधी केसाला तेल लावलं होतं, हे कळत नव्हतं. पोटाच्या उद्योग-धंद्यात हे असंच होतं. अंगाला वेळेवर नीट पाणीपण मिळत नव्हतं.

गोदाबाईचं कपाळ मोकळं होतं. कपाळाला कुंकू नव्हतं. ती विधवा होती. तिचा नवरा तरुणपणात असाच झटकापटकी देवीच्या दुखण्यात गेला होता. तरुणपणात लहान मुला-बाळांच्या संसाराचा बोजा तिच्यावर पडला होता. त्याही करारी बाईनं मोठ्या निर्धारानं आपल्या कष्टावर आपली दोन मुलं मोठी केली. ती कळती झाली. गडी झाले. त्यांची लग्नं केली आणि मुलांना मुलं-बाळं झाली. त्यांचा संसार वाढला होता. तीच गोदाबाईची नात-नातू देवळापुढच्या पटांगणात खेळत होती. आनंदानं उड्या मारत होती.

गोदाबाईनं झटपट चालत पाण्याची घागर डोईवर आणली. खाली ठेवली, तेव्हा सूर्य बराच वर आलेला दिसत होता. ऊन चांगलंच निबार झालं होतं. ती निवांतपणे सावलीला बसली. आजूबाजूला शांतपणे नजर टाकली. मुलं खेळत होती. कोंबड्या हिंडत होत्या. कुत्रं बाजूला बसलं होतं. शेरडं-करडं बाजूला कुंपणात तोंड घालून चरत होती.

गाय वैरणीकडे ओढ घेत होती. मग गोदाबाई उठली. तिनं गाईचं पेंडं फोडलं. गाय मोकळी झाली. ती ओढ्याबाजूनं निघाली. तिच्या पाठोपाठ राखणीला तिनं दोन मोठी मुलं पाठवली.

गोदाबाईचं कुटुंब हे गावकैकाड्याचं होतं. गावकैकाडी हे पोटापाण्यासाठी टोपल्या, पाट्या, दुरड्या, कणगी, कणगुली करतात. रानावनात जाऊन फोका आणायचा, त्याच्या-पासून हे साहित्य तयार करायचं व ते खपवण्यासाठी योग्य ठिकाण शोधायचं आणि मुक्काम करायचा हा यांचा जीवनक्रम असतो.

कैकाडी जमात ही मुख्यतः भटकी जमात आहे. याचं कारण असं की, ज्या कच्च्या मालापासून म्हणजे निरगुडी, निळुंबी, करंज, टणटणी या झाडांच्या फोकापासून हे लोक कणगी, कणगुली किंवा पाट्या-दुरड्या बनवतात, त्या फोकांच्या शोधात त्यांना हिंडावं लागतं. बुरुड जमातीतील लोकही याच प्रकारचं विणकाम करतात, परंतु त्यांचं विणकाम हे बांबूपासून बनवलं जातं. बांबू हमखास ठराविक ठिकाणी विकत मिळतो. त्यामुळं बुरुड जमात भटकी नसून स्थायिक असते.

कैकाडी लोकांना जसं कच्च्या मालासाठी हिंडावं लागतं त्याहून अधिक त्यांना सुगी-पाठोपाठ हिंडावं लागतं. जिथं सुगीचा हंगाम जोरात तिथं यांची पालं विसावतात. एखाद्या भागात दुष्काळ पडला तर तिथं न थांबता हे लोक समृद्ध भागाकडे धावतात एवढंच नव्हे तर एका गावातही अधिक कैकाडी एकत्र राहात नाहीत. कारण परस्परांशी स्पर्धा होऊन

धड कुणाचंच पोट भरत नाही. त्यामुळं एखाद्या भागात सर्वांत आधी आलेला कैकाडी श्रेष्ठ किंवा सीनियर मानला जातो आणि नवा कैकाडी त्याच्या उत्पन्नावर पाय येईलसं वाटलं तर ते गाव सोडून पुढच्या मुक्कामाला पाल टाकतो.

काही पक्षी जसे ऋतू बदलला की तो देश सोडून अधिक अनुकूल ऋतूच्या देशाकडे कूच करतात, तसंच कैकाड्यांचं आहे. हे लोक सुगीसाठी धावतात.

सुगीच्या हंगामात शेतकऱ्यांना नवं धान्य साठवण्यासाठी कणगी किंवा कणगुली, पाट्या लागतात. कधी शेतकऱ्यांच्या मागणीनुसार तर कधी आधीच आपल्या अंदाजानुसार कैकाडी कणग्या विणतात. ३०–४० मणांपर्यंतचं साठवणही एकेका कणगीमध्ये होऊ शकतं. याहून कमी साठवण करणारी ती कणगुली होय. कैकाडी स्त्रिया, घरात भाकऱ्या ठेवायला वापरतात ती टोपली. दुरडीही करतात. नवं धान्य तयार झालं की शेतकरी लोक मोठ्या कणग्यातून हे धान्य भरतात आणि त्यावर झाकण घालून बाहेरचा संपूर्ण पृष्ठभाग शेणानं सारवून लिंपून टाकतात. यामुळं या कणग्यांचा छोट्या-छोट्या कोठारासारखा उपयोग होतो. यात धान्यही सुरक्षित राहतं.

सुगीच्या दिवसांत, जिथं कणगी, टोपली, पाट्या दुरडीला मागणी आहे असं दिसतं तिथं कैकाडी पालं टाकतात. त्या गावची गरज भागली की पुढच्या मुक्कामाला जातात. या विणकामाच्या बदल्यात कधी धान्य तर कधी रोख पैसे अशी किंमत कैकाड्यांना मिळते. सामान्यतः ज्याचं साठवण व्हायचं तेच धान्य दिलं जातं पण कधीकधी वायद्यानुसार दुसरंही धान्य दिलं-घेतलं जातं.

कैकाड्यांच्या पोटापाण्याच्या उद्योगाचं स्वरूपच असं असल्यामुळं वर्षाकाठी आठ महिने तरी ही जमात आपल्या कुटुंबासह सुगीमागं धावत असते. पावसाळ्यात मात्र हे लोक एका जागी राहतात. बहुधा यांचं प्रत्येकाचं एका गावात छोटं-मोठं कायमचं घर असतं. हे यांचं गावाकडचं घर; पण हे घर असो वा नसो, वर्षातली आठ महिन्यांची भ्रमंती यांच्या कपाळी लिहिलेलीच असते. जनावरांसकट आपला छोटामोटा संसार बरोबर घेऊन ते हिंडत असतात.

दुपार झाली होती. गोदाबाईचे डोळे समोरच्या पांदीच्या वाटेकडे लागले होते. तेवढ्यात तिचे दोन मुलगे आणि दोन सुना यांनी आपल्या डोक्यावर फोकांचे मोठमोठे भारे, फोका बांधलेले बिंडे यांची ओझी आणली. त्या ओझ्यांच्या भारानं अंगानं सडपातळ असलेल्या सुना कराकर लवत होत्या. त्या काटक चिवट बायांनी देवळापुढं आल्याआल्या सावलीला फोकांचे भारे टाकले. कंबरेला खोवलेले धारदार विळे काढून पालात टाकले. मग कंबरेला खोवलेला पदर काढून घामानी डबडबलेलं तोंड उभ्याउभ्याच पुसलं. मग जरा निवांतपणे त्या दोघीही सावलीला खाली बसल्या.

त्या दोघा गड्यांनी फोकांचे भारे खाली टाकले. भाऱ्यात अडकवलेले विळे त्यांनी काढले व ते लहान मुलांच्या हातांत दिले. तेही आपला घाम पुसतच झाडाखाली निवांत बसले. गोदाबाईच्या दोन्ही सुना मग उठल्या. एकीनं दोन तांबे भरून दोघा गड्यांना दिले. मग दोघीही दुसऱ्या भांड्यानं घागरीतलं पाणी घेऊन घटाघटा प्याल्या. मग निवांत झाल्या.

या गडी बायांनी आणून टाकलेल्या भाऱ्यात-बिंड्यात करंजाच्या फोका होत्या. टणटणी लिंबुंबीच्या झुडपाचे फोकारे होते. थोड्या-थोड्या निरगुडीच्या पग होत्या. या झाडा-झुडपाच्या फोका मधोमध चिरून त्याच्या पाट्या-टोपल्या विणायला चांगल्या लवचिक-चिवट असतात. अशा या फोकांचा तयार माल रोजच्या वापरात वापरायला टिकाऊ असतो.

गोदाबाईच्या लेकांनी थोडा वेळ विसावा घेतल्यावर ते दोघं खांद्यावर धोतरं टाकून, बरोबर पाण्याची घागर घेऊन ओढ्याला आंघोळीला गेले. तिच्या दोन्ही सुनांनी तिथंच थांबून पाण्याचा तांब्या घेऊन चुळा भरल्या व जेवणाची वेळ होईतो वाट पाहात विश्रांती घेत बसल्या.

गाव-कैकाडी समाजात कैकाडी स्त्रिया नवऱ्याच्या बरोबरीनं उदरनिर्वाहाची कामं करतात. कैकाडी स्त्रिया आपल्या नवऱ्याबरोबर झाडा-झुडपाच्या फोका-फोकारे विळ्यानं-कोयत्यानं कापायला रानात, जंगलात, डोंगरात जातात. कापलेल्या फोकांचे बिंडे-भारे बांधून ओझीच्या ओझी गडीमाणसांच्या बरोबरीनं आणतात. त्या त्यात घामाघूम होतात; म्हणूनच कैकाडी स्त्री ही कष्टकरी आणि शरीरानं काटक, खणखणीत, सुदृढ असते. या रोजच्या कष्टानं तिचा बांधा बांधेसूद बनतो. त्या निरोगी बनतात.

गोदाबाईचे ल्याक आंघोळ करून आले. त्याच्याचबरोबर ओढ्यानं त्यांची मुलं आली. आंघोळ करून आल्यावर त्यांनी भाकरी-तुकडा खाल्ला. मग त्यांनी निवांतपणे झाडाच्या गार सावलीला अंग टाकलं.

मग गोदाबाई व तिच्या दोघी सुनांनी भाकरी-झुणका-चटणी खाल्ली. त्यांची जेवणं आटोपली. मग त्याही आपापल्या लहान मुलांना मांडीवर घेऊन सावलीला विसावा घेत बसल्या.

सूर्य डोक्यावरून खाली उतरला. झाडांच्या सावल्या लांबल्या. गोदाबाई व तिच्या सुना उठल्या. हातात विळे-कोयते घेतले आणि आणलेल्या फोकांच्या भाऱ्यातला एक-एक फोक कोयत्या-विळ्यानं नीट सवळू लागल्या. त्याचे फनगडे-फाटे काढून, मधोमध फोका चिरू लागल्या. चिरलेल्या-कापलेल्या फोकांचे ढीगच्या ढीग पडू लागले.

मग गडी टोपल्या-पाट्या विणायला बसले. फोका चिरायाचं काम झाल्यावर गोदाबाई अन् तिच्या सुनाही पाट्या-कणगुली विणायच्या कामाला बसल्या. त्या कष्टकरी बायांचे हात टोपल्या विणताना यंत्राप्रमाणं चालत होते. एकामागं एक विणलेला-वळलेला तयार माल बाजूला पडत होता.

दिवस मावळायला गेला. तांबुस-सोनेरी किरणं झाडावर पडली. देवळापुढच्या पटांगणात पडलेल्या तांबुस किरणांत विणत बसलेल्या स्त्रिया उठून दिसत होत्या.

दिवस मावळला. विणून तयार केलेल्या मालाचा ढीग पडला. तो पाहून गोदाबाईच्या चेहऱ्यावर मोठं समाधान उमटलं. त्यांच्या उदरनिर्वाहाचा तोच खरा आधार होता.

कैकाडी स्त्रीही नवऱ्याच्या बरोबरीनं काम करते. विशेषतः सुगीच्या दिवसांत पहाटे उठून, बरोबर विळा घेऊन ही स्त्री आपल्या नवऱ्याबरोबर फोकासाठी जंगलात जाते. कधीकधी कितीतरी डोंगर तुडवत या फोकासाठी जावं लागतं, डोंगरावर ना पाण्याची सोय ना खाण्याची सोय! उन्हं डोक्यावर आली तरी फोकाचे भारे करीत बसावं लागतं. पुन्हा फोकाही फार लहान चालत नाहीत. साधारण वाव दीड वाव लांबीचा फोक असेल तरच तो फायदेशीर ठरतो. इतका लांब फोक असेल तर तो कमी असून पुरवठ्याला येतो.

फोका तोडण्याचं कामही सोपं नसतं. टणटणी, लिळुंबी ही झाडं शोधायची, त्यांचा पाला कोयत्यानं साफ करायचा आणि मधला दांडोरा तेवढा घ्यायचा– यासाठी पायाखाली काटेसराटे तुडवावे लागतात, तर हातभर काट्यांची नक्षी गोंदवून घ्यावी लागते. कामाच्या भरात खरचटलेले, सोललेले हात लक्षात येत नाहीत. पण घरी येऊन हातपाय धुताना ही ‘ वेलबुट्टी ’ चांगली चरचरून झोंबते. उन्हापाण्याची पर्वा न करता, सूर्य उतरेपर्यंत कधीकधी हे काम करावं लागतं. पुन्हा घरी येऊन घडीभराचा विसावा घेऊन फोक-फोकारे सवळायचं आणि फाटेफनगाडे काढण्याचं काम असतंच. या फोका योग्य त्या जाडीच्या चिरून घेतल्यानंतर प्रत्यक्ष विणकामाला सुरुवात होते. जेवढी कणगी मोठी तेवढी फोकांची जाडी जास्त घ्यावी लागते यामुळं मजबुती वाढते कमी लांबीच्या आणि कमी जाडीच्या फोकापासून दुरड्या, टोपल्या, विणल्या जातात आणि त्याहून लहान तुकड्यांपासून भातुकलीच्या खेळासाठी छोट्या आकाराच्या सुपं-टोपल्या खेळण्यासारख्या बनवल्या जातात.

ऐन सुगीच्या भरात तर दिवसभर हिंडून फोका आणायचा आणि रात्री कंदील, दिवा पेटवून त्याच्या उजेडात दहा-अकरा वाजेपर्यंतही विणकाम चालू ठेवावं लागतं. कणगी विणायचं काम दोनदोन माणसंही करू शकतात. या विणकामात पुरुषांपेक्षा स्त्रियांचं काम अधिक कलाकुसरीचं असतं. फोका गोळा करणं, चिरणं आणि विणकाम करणं या सगळ्यात त्या पुरुषांच्या बरोबरीनं काम करतात. कधीकधी तर रात्री जागून काम केल्यानंतरही पहाटे ३–४ वाजताच उठून बाहेर पडावं लागतं. कारण गिऱ्हाईक गाठायचं असतं. शेतकरी काढणी-मोडणीला शेतावर जाण्यापूर्वी, त्याला घरातच भेटून, माल खपवायचा असतो. यामुळं या हंगामात अक्षरशः रात्रंदिवस हे लोक कष्ट करतात. यातच स्वयंपाकपाण्याची जबाबदारी, ( तो कितीही जुजबी किंवा हातावरचा का असेना ) आणि मुलांचं संगोपन ही कामं बायकांचीच. त्यातच कधी बाळंतपण, आजारपण. त्यांना विश्रांतीला सवड नसायचीच ! सुगीच्या हंगामात मिळेल तीच वर्षभराची कमाई असते. त्यासाठी या हंगामात

दिवसरात्रीचा जास्तीत जास्त वेळ जास्तीत जास्त कष्टामध्ये त्यांना घालवावाच लागतो. या कष्टातच त्यांच्या स्वावलंबनाचं सामर्थ्य असतं.

गोदाबाईचं उदाहरणच पाहा ना. तिचा नवरा तरुणपणी खर्ची पडला, पण ती डगमगली नाही. तिचा धीर खचला नाही. नवरा गेल्याचा शोक तिनं आवरला. आपल्या दोन लहान मुलांकडे पहात तिनं कंबर कसली. पाट्याटोपल्या विणण्याचा धंदा स्वतंत्रपणे सुरू केला. मात्र धंद्याच्या मिळकतीवर तिनं आपली मुलं लहानाची मोठी केली. ते गडी झाल्यावर त्यांची लग्नं केली. त्यांचा संसार उभा केला. आज ती आपल्या नातवंडांत सुखानं दिवस घालवते.

विधवा झालेल्या कैकाडी स्त्रीला स्वत:च्या पोटापाण्याची काळजी करावी लागत नाही. त्याचं कारण तिनं स्वतः नवऱ्याबरोबरच काम केल्यामुळं ती पाट्या-टोपल्या विणण्याच्या व्यवसायात वाकबगार असते. म्हणूनच नवरा मयत झाला तरी ती हतबल होत नाही. तिचे पोटाचे हाल होत नाहीत. गोदाबाईसारखी ती जिद्दीनं उभी राहते. कष्ट करते, अर्धा उरला संसार सावरते.

कैकाडी स्त्री या कोयत्याच्या आधारावर स्वावलंबी जीवन जगू शकते. या स्वतंत्र व्यवसायाची तिला जन्मजात सवय असल्यामुळं, दुसरी एखादी मोलमजुरीची बांधीलकी तिला शक्यतो नकोशी वाटते.

कैकाडी स्त्री ही खरी संसारी असते. आपल्या भटक्या जीवनातही संसार करण्याची तिला हौस असते. ती कोंबड्या पाळते, शेरडं-करडं करते. एखाददुसरी गाय पाळते. या पशुपक्ष्यांचं धन करून संसाराला हातभार लावते.

आज इथं, तर उद्या तिथं ( दुसऱ्या गावी ) अशी या कैकाडी कुटुंबाची अवस्था असते. या भटक्या जीवनामुळं या समाजात शिक्षणाचं प्रमाण कमी आहे. कमी म्हणजे फारच कमी आहे. या समाजात आज काही काही मुलं शिकलेली दिसतात. काहींनी विद्यापीठाच्या डिग्र्या घेतलेल्या आहेत. पण अशी मुलं हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच आहेत.

कैकाडी स्त्रियांत तर शिक्षणाचं प्रमाण फारच कमी आहे. अलीकडे काही मुली मराठी सातवी— एस्. एस्. सी. पर्यंत शिक्षण घेतलेल्या दिसतात. पण ज्यांचे आई वडील कायम नोकऱ्यांत स्थायिक झालेले आहेत अशा पालकांची मुलं-मुली कुठंकुठं शाळेत जातात. पण भटके जीवन जगणाऱ्यांच्या मुला-मुलींत शिक्षणाचा एकदम दुष्काळच आहे.

कैकाडी जमातीत हळूहळू शिक्षणाची ओढ वाढू लागली आहे. पण अजून शिक्षणाचा प्रसार अतिशय लहान प्रमाणात असल्यामुळं जुन्या रीतिरिवाजांवर, सणावारांच्या पद्धतीवर, शिक्षणाचे फारसे क्रांतिकारक परिणाम झालेले नाहीत. कैकाडी जमातीमध्ये बारसं, लग्न, इतर सणवार, मयताचं क्रियाकर्म इत्यादी बाबतीत इतर जमातींसारखेच रीतिरिवाज आहेत भवानीदेवी, खंडोबा, मरीआई ही त्यांची दैवतं आहेत.

लग्नाच्या बाबतीत एक नियम असा आहे, की बहिणीच्या पहिल्या दोन मुलींवर नेहमी पहिला हक्क मामाचा मानला जातो. त्यानं आपल्या मुलांना या मुली करून घ्यायच्या अशी प्रथा आहे. तिसरी मुलगी किंवा त्यानंतरच्या मुलींची सोयरीक मात्र कुठंही होऊ शकते. आजकाल ही प्रथा मागे पडत आहे.

लग्नाच्या संदर्भात साखरपुड्याचं महत्त्व फार आहे. साखरपुड्याला खाऊचा पुडा, खणनारळ हे देणं ऐच्छिक आहे; पण या वेळी मुलीच्या हातात २१ रुपये द्यावेच लागतात. हे २१ रुपये म्हणजे लग्नात मुलाच्या वडिलांनी मुलीच्या वडिलांना द्यावयाच्या २२५ रुपयांची खूणच असते. साखरपुडा झाला आणि त्यावेळी २१ रुपये दिले म्हणजे जणू मणि-मंगळसूत्रच बांधलं गेलं असं मानतात. याउप्पर मुलीकडून लग्न मोडलं तर नवऱ्या मुलाला २२५ रुपयांची नुकसानभरपाई द्यावी लागते.

आजकाल शिक्षणप्रसार होऊ लागला आहे तसा, या जमातीवर थोडाथोडा परिणाम होऊ लागला आहे. जंगलतोड झपाट्यानं झाली आहे, त्यामुळं फोकांचा कच्चा माल भरपूर प्रमाणात मिळत नाही. त्याच्यापाठी फार वणवण करावी लागते. तसंच धान्य साठवणासाठी किंवा अन्य उपयोगासाठी काही आधुनिक सोयी वापरल्या जातात व त्यामुळं पाट्या, दुरड्यांचा खप व मागणी घटली आहे. पुरेशा उत्पन्नाअभावी, हळूहळू कैकाडी अन्य व्यवसायांकडे वळत आहेत.

खेड्यातल्या कैकाडी स्त्रियाही हल्ली राना-मळ्यांत मजुरीनं भांगलण-खुरपण करण्यासाठी जातात. अर्थात अशा मोलमजुरीचं काम केल्याशिवाय त्यांना आता जगणंच अवघड झालं आहे. त्यात फोकांचा माल मिळत नाही. म्हणून ' बांबू 'चं विणकाम करण्याचा धंदा काहीकाही कैकाडी करतात, पण त्यातही त्यांना योग्य ती मजुरी सुटत नाही.

इतर भटक्या जमातींप्रमाणंच कैकाडी समाजही आज शहराच्या औद्योगिक केंद्रांच्या परिसरात येऊ लागला आहे.

—स्त्री : मार्च १९७१

*

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२८७
दा. क्र. २३८८६
निबंध २११७ ३
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

## ८

# रात्री प्रकाश, दिवसा अंधार

रात्री नवाचा टाईम, तमाशा थेटरचा रंगमंच, ट्यूब-लाइटनं रंगमंचावर झगझगाट पसरला होता. मागं रंगीत पडदा सुटला होता. पडद्यावर हुबेहूब दिवाणखाना रंगला होता.

त्यात थेटर फुल्ल झालं होतं. टोपीवाले, शेमलेवाले आणि भांगपट्टीवाले पानपट्ट्या चवळत बसले होते. त्यात मध्येच आंबट वासही येत होता. त्यांचे लाल डोळे रंगमंचाच्या दिशेनं गरगरत होते. तेवढ्यात बाज्याच्या पेटीचे मधुर सूर उठले. थेटरात उधळले. तबल्याचा ठेका उठला. त्याचा आवाज घुमला. उदबत्त्यांचा सुगंध दरवळत होताच. फुलं उधळली गेली. नारळ फुटला.

–आणि पिवळी नागीण बाहेर यावी तशी तबला-पेटीच्या ताल-सुरावर पायांतल्या चाळांचा झंकार करतच मैना रंगमंचावर आली. तबला-पेटीचा ताल आणि पायांतले चाळ यांचा एकच ताल जमला; आणि मैनानं मोठ्या अदबीनं समोरच्या पब्लिकला हसत-मुखानं सलाम केला. तिच्या पाठोपाठच मोरुंगी डुलत याव्या तशा दोन जवान उपवरा साथीला आल्या. त्यांच्याचबरोबर एक वयस्कर बाई पण तोंडावर रंगरंगोटी करून साथीला आली. ती मैनाची आई, ती बाईच्या पेटीजवळ उभी राहिली.

मैना पुणेकर यांची संगीत बारी रंगमंचावर सुरू झाली.

त्यात मैनाच्या जवानीचा भर होता. तिच्या जवानीच्या सौंदर्याचा उन्माद सगळ्या अंगोपांगात उसळत होता. तिचे रंगलेले ओठ उठून दिसत होते. चेहऱ्यावर रंगरंगोटी लावली होती. डोळ्याला काजळाच्या नक्षीदार रेघा मारल्या होत्या. तिच्या काळ्याभोर

लग्नाच्या बाबतीत एक नियम असा आहे, की बहिणीच्या पहिल्या दोन मुलींवर नेहमी पहिला हक्क मामाचा मानला जातो. त्यानं आपल्या मुलांना या मुली करून घ्यायच्या अशी प्रथा आहे. तिसरी मुलगी किंवा त्यानंतरच्या मुलींची सोयरीक मात्र कुठंही होऊ शकते. आजकाल ही प्रथा मागे पडत आहे.

लग्नाच्या संदर्भात साखरपुड्याचं महत्त्व फार आहे. साखरपुड्याला खाऊचा पुडा, खणनारळ हे देणं ऐच्छिक आहे; पण या वेळी मुलीच्या हातात २१ रुपये द्यावेच लागतात. हे २१ रुपये म्हणजे लग्नात मुलाच्या वडिलांनी मुलीच्या वडिलांना द्यावयाच्या २२५ रुपयांची खूणच असते. साखरपुडा झाला आणि त्यावेळी २१ रुपये दिले म्हणजे जणू मणि-मंगळसूत्रच बांधलं गेलं असं मानतात. याउप्पर मुलीकडून लग्न मोडलं तर नवऱ्या मुलाला २२५ रुपयांची नुकसानभरपाई द्यावी लागते.

आजकाल शिक्षणप्रसार होऊ लागला आहे तसा, या जमातीवर थोडाथोडा परिणाम होऊ लागला आहे. जंगलतोड झपाट्यानं झाली आहे, त्यामुळं फोकांचा कच्चा माल भरपूर प्रमाणात मिळत नाही. त्याच्यापाठी फार वणवण करावी लागते. तसंच धान्य साठवणासाठी किंवा अन्य उपयोगासाठी काही आधुनिक सोयी वापरल्या जातात व त्यामुळं पाट्या, दुरड्यांचा खप व मागणी घटली आहे. पुरेशा उत्पन्नाअभावी, हळूहळू कैकाडी अन्य व्यवसायांकडे वळत आहेत.

खेड्यातल्या कैकाडी स्त्रियाही हल्ली राना-मळ्यांत मजुरीनं भांगलण-खुरपण करण्या-साठी जातात. अर्थात अशा मोलमजुरीचं काम केल्याशिवाय त्यांना आता जगणंच अवघड झालं आहे. त्यात फोकांचा माल मिळत नाही. म्हणून ‘ बांबू ’चं विणकाम करण्याचा धंदा काहीकाही कैकाडी करतात, पण त्यातही त्यांना योग्य ती मजुरी सुटत नाही.

इतर भटक्या जमातींप्रमाणेच कैकाडी समाजही आज शहराच्या औद्योगिक केंद्रांच्या परिसरात येऊ लागला आहे.

—स्त्री : मार्च १९७१

*

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८८७
दा. क्र. २३८८९
निबंध २१५
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

## ८

# रात्री प्रकाश, दिवसा अंधार

रात्री नवाचा टाईम, तमाशा थेटरचा रंगमंच, ट्यूब-लाइटनं रंगमंचावर झगझगाट पसरला होता. मागं रंगीत पडदा सुटला होता. पडद्यावर हुबेहूब दिवाणखाना रंगला होता.

त्यात थेटर फुल्ल झालं होतं. टोपीवाले, शेमलेवाले आणि भांगपट्टीवाले पानपट्ट्या चघळत बसले होते. त्यात मध्येच आंबट वासही येत होता. त्यांचे लाल डोळे रंगमंचाच्या दिशेनं गरगरत होते. तेवढ्यात बाज्याच्या पेटीचे मधुर सूर उठले. थेटरात उधळले. तबल्याचा ठेका उठला. त्याचा आवाज घुमला. उदबत्त्यांचा सुगंध दरवळत होताच. फुलं उधळली गेली. नारळ फुटला.

–आणि पिवळी नागीण बाहेर यावी तशी तबला-पेटीच्या ताल-सुरावर पायांतल्या चाळांचा झंकार करतच मैना रंगमंचावर आली. तबला-पेटीचा ताल आणि पायांतले चाळ यांचा एकच ताल जमला; आणि मैनानं मोठ्या अदबीनं समोरच्या पब्लिकला हसत-मुखानं सलाम केला. तिच्या पाठोपाठच मोरुंगी डुलत याव्या तशा दोन जवान उपवरा साथीला आल्या. त्यांच्याचबरोबर एक वयस्कर बाई पण तोंडावर रंगरंगोटी करून साथीला आली. ती मैनाची आई, ती बाईच्या पेटीजवळ उभी राहिली.

मैना पुणेकर यांची संगीत बारी रंगमंचावर सुरू झाली.

त्यात मैनाच्या जवानीचा भर होता. तिच्या जवानीच्या सौंदर्याचा उन्माद सगळ्या अंगोपांगात उसळत होता. तिचे रंगलेले ओठ उठून दिसत होते. चेहऱ्यावर रंगरंगोटी लावली होती. डोळ्याला काजळाच्या नक्षीदार रेघा मारल्या होत्या. तिच्या काळ्याभोर

डोळ्यांना त्या उठून दिसत होत्या. त्यात ती नाकात नीटस होती आणि चेहरा मोहक होता. पानविड्यानं रंगलेल्या तिच्या हसऱ्या मुखातले कुंदकळ्यासारखे दात मोहक दिसत होते.

डोक्यातल्या अंबाड्याला तिनं मोगऱ्याची वेणी लावली होती. तिच्या अंगातली अस्मानी रंगाची जरीची चोळी तिच्या दंडात तटाटली होती. ती नऊवारी नायलॉनचं पिवळं पातळ चापूनचोपून नेसली होती. पदर कंबरेला घट्ट खोवला होता. ते नायलॉन बिजलीच्या प्रकाशात अधिकच झगमगत, चमचमत होतं; आणि तिच्यावर थेटरातल्या पब्लिकच्या नजरा मरत होत्या.

तबला-पेटीचा ताल उठला; आणि मैनानं पदराची फडी करून पडद्यापासून पाठमोरी ती नाचत निघाली. त्यात दोन उपवरांची आजूबाजूनं साथ सुरू झाली आणि त्या सुंदर उपवरा नागिणीगत फडी काढून पाठमोऱ्या डुलत आल्या. त्यांच्या पायांतल्या चाळातले झंकार उठले.

त्यांच्या पाठीची पन्हाळं अन् दंडात रुतलेल्या चोळीवर पब्लिकची नजर खिळली.

सलामी झाली.

आणि लावणीला मैनानं सुरुवात केली—

**' आंबा आला मोहोराला ।**
**ऐन जवानीचा पाड आला ! ! '**

मैनानं या लावणीच्या उसळत्या ठेक्याबरोबर टाळी मारून पाण्यातल्या मासोळीगत उसळी मारली. त्याबरोबर समोरचं पब्लिक खुळावलं, हुरळलं आणि ती माशूक नखरा उडवत आपल्या सुरेल आवाजात गाऊ लागली. आपल्या यौवनाचं प्रदर्शन करू लागली. त्याबरोबर तिची लवचिक कंबर लवलवू लागली. तिची लावणी भलतीच रंगात आली.

नाचता-नाचता तिच्या अंगाचं पाणी-पाणी झालं. स्टेजवरचा सगळा अणुरेणू तिच्या नाचाच्या आवाजाच्या तालात नाचत होता. गात होता. गर्क होता.

मैनाच्या डोळ्यांतील मादक बाण समोरच्या शेमलेवाल्यांना भेदत होते. त्याबरोबर त्यांच्या हातातल्या नोटा 'पुढं' वर नाचू लागल्या.

मध्येच डोईवर पदर घेऊन डोळ्याचा नाजूक नखरा करत, हासऱ्या मुखानं ती नोट पळवत होती. तोवर दुसरी नोट तयार होती. तीरण ती घेऊन पळत होती. मैनाची बोटं त्या माणसाच्या बोटाला स्पर्शत होती. त्याचबरोबर शेमलेवाल्याला, टोपीवाल्याला उकळ्या फुटत होत्या. अंगात मदनाच्या लाह्या उटत होत्या.

मैना आपल्या गोड आवाजात, ठसक्यात लावणी गात होती. नाचत होती. तिच्यापुढं नोटांचे हात उभे होते.

दुसऱ्या दोन जवान उपवरा यांच्या पुढं पण एक एक हातातली नोट नाचत होती. त्यापण लाजत, मुरकत आदा करत. बोटाला बोटांचा स्पर्श होत असताना हिसक्यानं नोट घेत होत्या. हासत-खिदळत पळत होत्या.

साथीला वाज्याच्या पेटीजवळ उभी असलेली मैनाची आई नोटा गोळा करत होती. दहाच्या नोटांची मोड म्हणून एक एक अशा सुट्या नोटापण परत देत होती.

लावणी संपली. एक, दोन, तीन, चार लावण्या संपल्या. मैना व तिच्या साथीच्या पोरींनी स्टेज डोक्यावर घेतलं. टाळ्यांचा कडकडाट झाला.

–आणि पडदा पडला.

दुसऱ्या दिवसाची सकाळ. सूर्य वर आला होता. स्वच्छ ऊन पडलं होतं.

उन्हं निबार झाली होती.

तमाशा-थेटराच्या आतला, रात्रीचा बिजलीचा झगझगाट, चमचमाट संपला होता. पार लयाला गेला होता. आता सूर्याच्या उन्हात–उजेडात तिथलं स्पष्ट, स्वच्छ चित्र दिसत होतं.

–आणि तेच खरं चित्र होतं.

खरं जीवन होतं.

मैना बाहेर पटांगणातील उन्हात उभी होती. बिजलीच्या प्रकाशात-झगझगाटात दिसणारं मैनाचं मेकप केलेलं रूप दिवसा उजेडात दिसत नव्हतं. तिच्या चेहऱ्यावरची रंग-रंगोटी पुसून गेली होती. त्याखाली लपलेला तिचा सावळा रंग आता उठून दिसत होता. ओठाची लाली निघाली होती. केसांतील अंबाड्यात घातलेली वेणी कुठं गळून पडली याचंही तिला भान नव्हतं.

मैनाच्या अंगावर नायलॉनचं नवं पातळ नव्हतं. अंगात जरीची तटाटणारी चोळीपण नव्हती. ती चिटाचिटाचं एक साधं पातळ नेसली होती. ते पातळ पार चुरगळलं होतं. अंगात असाच एक साधा ब्लाऊज होता.

तिचा चेहरा तेजस्वी दिसत नव्हता. तिच्या केसांचा अंबाडा सुटला होता. केस सैलसर पाठीवर पडले होते. तिचं उभार उरोज सैल ढळढळीत दिसत होतं. मैनाच्या डोळ्याला उन्हाचा प्रकाश सहनच होत नव्हता.

मैनाच्या संगीत बारीतली रात्रीची एक मुलगी समोर दिसली. तोंडावरचा मेकप उतरला होता अन् अंगावरचं रात्रीचं नवं पातळ पण उतरलं होतं. तिचा रंग काळा-सावळा होता.

ती भिंतीला पाठ देऊन सावलीत आपल्या मुलाला मांडीवर घेऊन पाजत बसली होती. तिच्या गळ्यात मंगळसूत्र-काळी पोत दिसत होती.

त्यात तिची उमर वीस-बावीस वर्षांची होती. तिचं नाव सुशीला. सुशीला मुलाला पाजत बसली होती. सुशीला मैनापेक्षा लहान होती.

सूर्याच्या प्रकाशात त्यांचं रूप स्पष्ट दिसलं. ट्यूब-लाइटच्या प्रकाशात रंगमंचावर बिजलीगत लवलवत नाचणारी विजेची गती तिच्या अंगात नव्हती. त्यांच्या डोळ्यांत उतरलेला मदनाचा फेस पण पार उतरला होता. डोळ्यांची धारच कमी झाली होती.

तिचं चित्त आपल्या मांडीवरच्या मुलावरच केंद्रित झालं होतं. ती मध्येच आपल्या मुलाचे पटा-पटा मुके घेत होती.

तेवढ्यात वाज्याचा पेटीवाला मास्तर आला. ती त्याच्याजवळ आपलं मूल देत म्हणते —

'याला घ्यावो! मला अंघोळ करायची आहे! पोटापाण्याचं आवरायचं आहे!'

पेटी वाजविणारा मास्तर तिचा नवरा. सुशीलाचं लग्न झालं होतं तरी पण ती संगीत बारीत नाचत होती. नाचणं-गाणं हा तिचा धंदा होता. आपला पोटापाण्याचा संसार चालवयाचा असेल तर तिला संगीत बारीत नाचणं भाग होतं. तिच्या नवऱ्याची तिला तशी संमती होती. तिला बारीत तीन रुपये बिदागी रोज मिळत होती. तिच्या नवऱ्याला पेटी वाजवण्याचे दोन रुपये मिळत होते. त्यात 'दौलतजादा' म्हणून पब्लिककडून मिळालेल्या रकमेतही तिचा वाटा-हिस्सा होता.

## सकाळचं सैपाकपाणी

सुशीला उठली. कोपऱ्यात पडलेल्या आपल्या संसाराकडे गेली. त्या ठिकाणी तिच्या दोन ट्रंका होत्या. त्यात एका ट्रंकेत कपडे होते. दुसरी एक मोकळीच होती. जर का संगीत बारी गावोगाव जत्रा करत फिरतीवर निघाली तर त्या मोकळ्या पेटीत तांब्या, भांडं, तवा-पितळी ठेवण्यासाठी उपयोग होत होता. तिथंच बाजूला जुन्या कपड्यांचे बोजागबाळ पडलं होतं. एक सतरंजी, एक चादर होती. बाजूला बाकळेची घडी घालून ठेवली होती. जवळच कोळशाची पेटती शेगडी उभी होती. बाजूला चार भांडी-कुंडी होती. दोन पितळ्या होत्या. त्यांना कल्हई नव्हती, पण त्या घासून चकचकीत केल्या होत्या. काही तांबे होते. काही पितळी तर एक गिलटाचा पांढरा. तीन-चार भगुली, पांढरी गिलटाची व पितळेचीही.

शेगडीवरील एका लहान भगुल्यात उकळत्या चहाचा वास सुटला होता. दोन कपबशा होत्या. त्यातल्या एका कानतुटक्या कपात थोडसं दूध होतं. सुशीलाच्या संसारातील दारिद्र्य, त्यामधील वस्तूंत दिसत होतं. ती त्याला तोंड देत होती.

मैनाची संगीत बारी नावाजलेली होती.

वयात आलेली, जाणती झालेली मुलगी नाच-गाण्याला सुरुवात करते आणि आपल्या कलेच्या गुणावर संगीत बारीत नाच-गाणं करून आईबापाला पैसे मिळवून देते.

संगीत बारीत नाच-गाणं करणाऱ्या मुलीची चलती वयाच्या पंधरा-सोळा वर्षांपासून ते वयाच्या पंचवीस-तीस वर्षांपर्यंत चालते. तिच्या जवानीचा याच कालात भर असतो. तिच्या जवानीचा काळ हाच खरा तिच्या मिळकतीचा, कमाईचा चढता काळ! याचा काळात तिच्या अंगात नवं रक्त सळसळतं. नवा जोम, उभारी असते. आणि उफाळत्या जवानीच्या जोरावर शौकिनांना, तरुणांना, पैसेवाल्यांना आपल्या नाच-गाण्याच्या कलागुणावर आकर्षित करण्याचा, मोहित करण्याचा खरा काळ असतो.

आपल्या देखण्या सुंदर मुलीनं या जवानीच्या काळात लग्न करू नये असं काही काही संगीतबारीवाल्या आईबापांना वाटत. त्यात काही मुलींनी लग्नाचा आग्रह धरला, तर आईबापांचा नाइलाज होतो. अर्थात आईबापांच्या या धोरणात त्यांच्या पोटापाण्याचा खरा प्रश्न गुंतलेला असतो. मुलीच्या नाच-गाण्याच्या व्यवसायावर ते बसून राहतात.

रात्री थेटरात दौलतजादा करणारा, नोटा सोडणारा, नोटा उधळणारा कुणी शौकीन बहाद्दर दिवसा बायांच्या मुक्कामावर आला तर तो त्याच्या पसंतीच्या सुंदरीबरोबर गोड-गोड बोलतो. तीही त्याला पानपट्टी करून देते. खुषीत येऊन तिला तो एखादी साडी-पातळही घेऊन देतो. अर्थात याला फडाच्या मालकिणीची संमती मिळाली तर ती ते पातळ घेते.

पण ती कधी त्याच्याबरोबर पसार होणार नाही. पळून जाणार नाही. कारण तिच्या गळ्याभोवती, आपल्या आईबापाला, कुटुंबाला सांभाळण्याचे, त्यांचं पालन-पोषण करण्याचे पक्के बंध असतात. त्या बंधांचं तिला कधीच विस्मरण होत नाही.

अशा मुलीला असा प्रश्न टाकला की,

'मुली! तू आता मोठी आहेस; जाणती आहेस. तुला लग्न करावंसं वाटत नाही का?' तर ती चटकन् म्हणते,

'होय! मला लग्न करावसं वाटतं. संसार करावासा वाटतो. पण—'

'मग कशाची अडचण आहे?'

'पण माझे आई-बाप उपाशी मरतील ना! त्यांनी मला जन्म दिला. त्यांना जगवलं पाहिजे!'

'अग पण तू अशीच कुठवर आपली जवानी जाळत बसणार?'

मग ती लागलीच म्हणते,

'माझा भाऊ मोठा होईतो. तो आपली कमाई करेतो मला असंच संगीत बारीत काम करावं लागणार आहे.'

'पण तुला तुझ्या आयुष्याची काहीच चिंता वाटत नाही?'

'आमची ही गरीब परिस्थिती आम्हाला पुढचा विचारच करू देत नाही. त्याला काय करायचं?'

'पण तुमच्या कुटुंबात लोक तरी किती आहेत ?'

'आहेत की, सहा माणसं– लहान-मोठी !'

'तू त्यांना किती पैसे पाठवतेस ?'

'पाठवते की, ५० रुपयांपासून ते ८० रुपयांपर्यंत ! ते माझ्या बारीतल्या कमाईवर अवलंबून असतं. त्यात संगीत बारीबरोबर फिरताना मला माझाच खर्च करावा लागतो. त्यात जेवण-खाण अन् कपडा-लत्ता असतो. हौस-मौजपण असते !'

अशा तरुण उपवर मुली संगीत बारीत एकट्या एकट्याच असतात. काहींची आई बरोबर असते तर काही मुलींचा बाप बरोबर असतो, तर काहींचा भाऊ बरोबर असतो. पण काही मुली एक-एकट्याच बारीत असतात. काहीकाही वेळा दोघी-दोघी सख्ख्या बहिणी एकत्र बारीत असतात.

अशा एकट्याच मुली या फिरत्या संगीत बारीत पाहिल्यावर चटकन त्या मुलीला प्रश्न विचारावासा वाटतो की, 'पण तू अशी संगीत बारीत एकटी राहतेस. तुला हे चांगले सांभाळतात का ?'

'हो ! माझ्याच आईबापांनी मला त्यांच्या ताब्यात दिलंय. त्यांच्या संगीत बारीत मी नाचते, गाते, खेळते. मला ते आईबापाप्रमाणं सांभाळतात. त्यांच्या शब्दाच्या बाहेर मीपण जात नाही. त्यांचा माझ्या हालचालीवर डोळा असतो ! पण कवाकवा धोकापण होण्याची भीती असते. ते सगळं माणसावर अवलंबून असतं !'

'पण तुला उद्या लग्नच करावं वाटलं तर ?'

'मी करीनही ! तो माझ्या खुशीचा सौदा आहे. पण मला माझ्या आईबापाचा विचार करावा लागतो. त्यांची संमती घ्यावी लागते ना ! नाहीतर मला उद्या भावकीत बसू देणार नाहीत.'

तुम्हाला या नाचणाऱ्या संगीत बारीतल्या मुली बोलताना धीट वाटतील. त्या स्पष्ट बोलतात. सरळ बोलतात. तेव्हा तुम्हाला वाटेल, हिचं काहीतरी शिक्षण झालं असेल, पण तिला असा प्रश्न विचारताच चक्क सांगते की, 'माझं शिक्षण झालं नाही. आमचं असं आज या गावी तर उद्या दुसऱ्या गावी ! आमचं असं भटकतं जीवन ! मग आमची शाळा कशी होणार ? कुठं शाळेला जाणार ? मी शिकले नाही पण मला अक्षरओळख आहे. मी थोडं-थोडं वाचते, सही करते !'

खरं तर संगीत बारीतल्या मुला-मुलींना शिक्षणाबद्दल आस्थाच नाही. मुलींना तर शिक्षणाचा गंध नसतो. मुलीच्या बाराव्या वर्षापासूनच तोंडाला रंग-रंगोटी करून एखाद्या जवळच्या संगीत बारीत प्रॅक्टिस-सरावासाठी तिचे आईबाप तिला उभी करतात. अशा वयापासून बारीत उभ्या राहिल्यानंच त्या मुलींची भीड मरते. त्या धीट होतात. त्यांना गाण्यातला ठेका, ताल, राग हळूहळू कळू लागतो. याच वयापासून ती रंगमंचावर येते.

मग तिचे आईबाप तिला पुढं चांगल्या बारीत पाठवतात. ती मुलगी मोठी होते, तशी-तशी त्या बारीतच गावोगाव हिंडते. पावसाळ्यातच बारी बंद असेल तेव्हा ती आपल्या आई-बापाला भेटावयाला काही दिवस जाते.

काही-काही मुली तशाच अविवाहित राहतात. अशा अविवाहित मुलींच्या जीवनात अनेक वाईट, दुःखाचे प्रसंग येतात. त्या वेळी त्यांची अवस्था तुटलेल्या पतंगासारखी गोते खात जाते. या मुली आपल्याच जातीच्या मुलाबरोबर लग्न करतात. नवऱ्याची इच्छा असेल तर संगीत बारीत नाचतात. त्याची इच्छा नसेल तर नाचकाम सोडून देतात व नवऱ्याचा सरळ संसार करतात.

काही-काही संगीत बारीतल्या मुली कायदेशीरपणे लग्न न करताच गळ्यात मंगळसूत्र बांधतात. ते मंगळसूत्र त्यांच्या जीवाभावाच्या यजमानाचं असतं. तो यजमान त्यांना नवऱ्यागत असतो. अर्थात काहीकाही प्रसंगी काहीकाहींच्या बाबतीत यजमानाच्या मनाच्या व धनाच्या अवस्थेवरही अवलंबून असतं, असं दिसतं.

संगीत बारीतल्या काही देखण्या, सुंदर मुली आहेत. त्यातल्या काहीनी सिनेमा-व्यवसायाची वाट धरली आहे. काहींनी आपल्या कोकिळ-कंठी आवाजानं सिनेमात 'प्ले-बॅक' दिला आहे. त्या चांगल्या गाणाऱ्या गानकोकिळा म्हणूनच प्रसिद्ध आहेत. आजही या समाजातल्या अशाच देखण्या, सुंदर आणि गोड गळ्याच्या चांगल्या गाणाऱ्या मुलींना सिनेमा-नाटकात कामं करावीत, आपले कलागुण दाखवावेत, अशी त्यांच्या मनात मोठी आशा-आकांक्षा आहे, पण त्यांना तशी संधीच मिळत नाही. 'जिकडेतिकडे वशिला लागतो' अशी एक या मुलींच्या मनाची मोठी वेदना आहे.

आज ढंगदार नाच-गाण्याचे कलागुण जाणणारा प्रेक्षकच नाही. ढंगदार लावणी, चांगला नाच जाणणारा, या कलेची कदर करणारा प्रेक्षक फार क्वचित आढळतो, असं मत संगीत बारीतल्या पट्टीच्या गाणाऱ्या वयस्कर स्त्रियांनी बोलून दाखवलं आहे.

'पुढं बसलेल्या प्रेक्षकाला फक्त धांगडधिंगा, सिनेमातली उडती गाणी अन् तारुण्याचे अंगविक्षेपच पाहावेसे वाटतात. त्यांना गाण्याचा राग-रंग कळत नाही. नाचातील कलेची त्यांना समजही येत नाही. अशा प्रेक्षकांमुळंच आमच्या नाच-गाण्यातील कलेची आजकाल बरीच हानी होत असून त्याचा दर्जा कमी-कमी होत आहे. याच कारणामुळं संगीत बारीतल्या मुलींना नाच-गाण्याच्या कलेची चांगली वाढ करावी, प्रगती करावी, यासाठी श्रद्धेनं, जिद्दीनं कष्ट करावेत असं काही वाटतच नाही. त्यांना दर्जेदार राग, ताल, आदा, शब्दाची फेक हे लौकर कळतच नाही' असंही मत त्या बाईंनी स्पष्ट बोलून दाखविलं.

तरीही संगीत बारीत आजही पट्टीच्या गाणाऱ्या-नाचणाऱ्या मुली आहेत. या काही मुलींना वाटतं, की आपल्या कला-गुणाच्या जिवावर आपल्या आईबापाला जगवावं, आपण जगावं अशी फक्त जगण्याची दृष्टी आज त्यांच्यापुढं आहे.

अर्थात अशा मुलींच्या जीवनात जेव्हा त्यांच्या जवानीतली उभारी संपते, तारुण्य ओसरतं, त्या वेळी त्यांच्या नाच-गाण्याच्या गुणांनाही ओहोटी लागते. त्या वेळी त्यांच्या जीवनात दुःखाचे, दारिद्र्याचे कठीण प्रसंग येतात. त्याला तोंड देणं फारच अवघड होऊन बसतं.

अशाही परिस्थितीत संगीत बारीतल्या काहीकाही स्त्रियांनी आपल्या नाच-गाण्याच्या व्यवसायावर, आपल्या अंगच्या कलागुणांच्या सामर्थ्यावर नाव कमावलं आणि आर्थिक परिस्थिती सुधारली. त्यातूनच काहींनी तर नवी घरं बांधली, शेती-वाडी केली व त्या आज चांगल्या अवस्थेत आहेत. पण बहुसंख्य नाच-गाणं करणाऱ्या मुली-स्त्रियांच्या आणि त्यांच्या कुटुंबांच्या जीवनात गरिबी, दारिद्य आहे. हे पाहिल्यावर कोणाही जाणकाराच्या मनाला धक्का बसल्याशिवाय राहणार नाही.

या गुणी कलावंतांच्या कलेला आज समाजात खऱ्या अर्थाने किंमत दिली जात नाही. त्यांच्या कलेची कदर केली जात नाही. त्यांच्या कलागुणाला खरं मोल, किंमत, समाजात दिली जात नाही, हीच एक खेदाची गोष्ट आहे. या गोष्टीला आजचा समाज, शासन आणि कला-शौकीन खरा जबाबदार आहे.

या संगीत बारीतील गुणी कलावंतांच्या कलेला आज सरकार, समाज व कला-शौकिनांनी चांगला आश्रय दिला पाहिजे. त्यांच्या कलेचं खरं मोल करून, त्यांना आपल्या दैनंदिन जीवनात सुखासमाधानात सुस्थिर उभं केलं पाहिजे. यासाठी सरकार, समाज व कलाशौकिनांनी आपलं खरंखुरं कर्तव्य बजावलं पाहिजे. तेव्हाच या कलावंत-समाजाला बरे दिवस येतील.

स्त्री : फेब्रुवारी, १९७१

*

१

# फासेपारध्याचं पाल

दुपारच्या टळटळीत उन्हात लहुजा फासेपारधी भगभगीत माळरान तुडवत आपल्या पालावर निघाला होता. तो झपाझपा पावलं टाकत होता. घारीगत त्याची नजर आपल्या पालावर धावत होती. त्याच्या पायाला वेग आला. माळावरची पुढची चढण तो चढत होता. समोरच्या टेकडीच्या मध्यावरच त्याचं एकटं पाल ऊन खात उभं होतं. त्याची नजर पालावरच पक्षागत धावत होती आणि तो रान–खोकडाच्या वेगानंच आपल्या पालावर आला.

दिवस कलला होता; तरी उन्हाचा चटका बसत होता. उन्हाच्या तावात लहुजा पालावर आला; तो घामाघुम झाला होता. पालावर आल्या आल्या त्यानं आपल्या डोक्याचं तांबड्या वाणाचं पागुटं काढलं. ते समोरच्याच बाभळीच्या झाडाच्या फांदीवर टाकलं. उभ्या उभ्या डोक्याचं केस खराखरा खाजवले. खांद्यावरच्या फडक्याच्या घडप्यानं त्यानं कपाळा-वरचा, तोंडावरचा घाम पुसला. त्यानं पुन्हा उभ्याउभ्याच आजूबाजूला नजर टाकत अंगातली मोठी ढगळ पैरण काढली. ती धुळकट पैरण बाभळीच्या फांदीवर टाकली. शेवटी लहुजाने ढिगळ मारलेली, ढिली, खाकी पाटलून काढून फडक्याची लंगोटी घातली आणि तो उघडा बोडका, माळावरचा वारा घेत बाभळीच्या फाटक्या सावलीत थोडा निवांत बसला. बसल्या बसल्या त्यानं आपली नजर खालच्या ओघळीतील झुडपाकडं टाकली. टेकडीच्या वरच्या माथ्याकडं लांब फिरवली. त्याला काय वाटलं कुणास ठावं अन् तो बसल्या जागेवरुन चटकन् उठला, आपल्या पालात शिरला.

लहुजाचं पाल म्हणजे खरं झोपडीगत होतं. ते इतर फासेपारध्यांच्या पालागत पोत्यांच्या पटकरांचं किंवा गोधड्या फाटक्या कपड्याचं नव्हत. तसंच ते दोन- वेळूच्या मेढीवर व आडव्या वाश्यावरही उभं नव्हत. लहुजाचं पाल म्हणजे झोपडीच होती. तीही झोपडी पक्की केली होती. तिला गवतकाड्यानं वरून चांगली शेकारलेली होती. आजू-बाजूनं झाडा-झुडपाच्या काटक्या-कुटक्यांचा झोपडीला चांगला कूड तयार केला होता. त्यावर शेणानं, मातीनं सारवून त्याला भिंतीगत खंबीर केलं होतं. या झोपडीचा आकार लहानच होता. झोपडी लांबीला दहा फूट, रुंदीला सहा फूट होती. त्या झोपडीत लहुजा पारध्याचं कुटुंब गेलं दीड-दोन वर्ष या दगड-टोळ्याच्या झाडोरा-झडपाच्या टेकडीच्या कुशीत निवांतपणे राहात होतं. एकदम माणसांच्या वाऱ्यापासून दूर. रानच्या पशु-पक्ष्यांच्या सहवासात लहुजा, त्याची बायको, चार मुलं राहात होती. त्यातच त्याच्या वाढत्या प्रपंच्यात एक तांबूस रंगाची आणि वाळक्या अंगाची गाय आणि सफेद बागाची कालवड होती. दोन-तीन शेरडं-करडं होती. याशिवाय कोंबड्या-पिल्लं असे दहा-बारा पक्षीही होते. असा प्रपंच करून लहुजा राहात होता. त्यात या टेकडीच्या कुशीत एकट्या लहुजाची झोपडी होती. बाकी त्याच्या भाऊबंदांची पालं त्याच्या झोपडीजवळ नव्हती. ती अशीच पोटा-पाण्याच्या मागं. आज इथं तर उद्या तिथं. अशी रान-पालरागत भटकत होती. पण लहुजा दोन वर्षं झाली, एका जागी स्थिर झाला होता.

लहुजानं आपल्या झोपडीचं दार उघडलं, पण आतही कुणीच नव्हतं. त्यात दारात आजूबाजूला मुलंही नव्हती. दारातली त्याची दोन कुत्रीही जवळ नव्हती. गुरं-शेरडंही जवळपास हिंडताना, चरताना दिसत नव्हती, फक्त त्याची कोंबडी झोपडीच्या पुढच्या झुडपात किडामुंगी टिरताना दिसत होती.

दारात कुत्री नाहीत, मुलंही नाहीत, म्हणून लहुजा काहीसा कावराबावरा झाला. तो झटकन् आपल्या झोपडीत शिरला. त्याने आपली देवदारी-लाकडी पेटी उघडली. त्याचा हात अधिकच थरारला. लगोलग त्यानं पेटीतली जुनी-पानी कापडं बाहेर फेकली. त्याची नजर अधिकच बावरी झाली. मग त्यानं चिंध्या-चांध्याचं गाठोडं सोडलं, त्यातल्या चिंध्या इकडं-तिकडं तशाच टाकल्या. मग तो झटकन् उठला. जस्ताच्या भगुल्यात, टोपल्यात नजर टाकली. झोपडीत सगळ्या बाजूनं पुनःपुन्हा त्यानं नजर टाकली आणि त्याचा चेहरा घामानं डबडबला. तो एकदम चिंतातुर झाला त्याला काहीच सुचेना. तो वेगात आपल्या झोपडीच्या गुहेतून बाहेर पडला. दारात येऊन त्यानं बाजूला इकडं तिकडं टेकडीवर वर-खाली नजर टाकली आणि त्यानं मोठमोठ्यांदा आपल्या मुलांच्या नावानं हाका मारल्या. त्या टेकडीच्या कुशीत त्याच्या हाकेचा आवाज पुन्हा घुमला. लहुजानं पुनःपुन्हा मोठ्यांदा हाका मारल्या, त्याचा आवाज चोहोकडं वातावरणात घुमला, पसरला. त्याचा आवाज हेरून टेकडीच्या वरच्या माथ्यावरून दोन कुत्री जोरात धावत आली. त्यांना पाहून लहुजानं पुनःपुन्हा आवाज दिला. कुत्र्यांचा वेग वाढला. ती झेपावत, भलत्याच वेगात धापा टाकत आली.

लहुजानं त्यांच्या पाठीवरून हात फिरवला. कुत्री त्याच्या अंगावर उड्या मारू लागली. त्यांची नजर वर टेकडीच्या माथ्यावर होती. तेवढ्यात त्याला त्याची चार मुलं दिसली. उघडी-बोडकी माळरानातलं खडक टोळं दिसावी तशी. त्यांना पाहताच लहुजानं मोठ-मोठ्यांदा हाका मारल्या. त्याबरोबर आपल्या बापाला पाहताच ती पोरं टेकडीवरून सरासर उड्या मारतच खाली जोरात पळत सुटली. त्यांना पाहून कुत्रीही त्यांच्याकडं धावत निघाली. त्या मुलांच्या पाठोपाठ गाई-कालवडं व शेरडंही खाली झोपडीकडं आली.

लहुजाचा चेहरा काळजीनं एकदम काळवंडला होता. त्याला काहीच सुचेना. तो झोपडीच्या दारात थांबून आत बारीक नजर टाकीत होता. पुन्हा समोरच्या बाभळीच्या झाडावरही पाहात होता. तो मध्येच हातानं कपाळावरचा घाम पुसत होता.

लहुजाची पोरं उड्या मारतच झोपडीवर आली आणि कोंबडीच्या पिलागत त्याच्या-भोवती उभी राहिली. तोच लहुजानं मोठ्या कळत्या मुलाला प्रश्न केला, 'आरं आपला पेटीतला वाजवायाचा रिडीवो कुठाय ?'

तोच ते पोर 'हाय की पेटीत !' म्हणून झोपडीत गेला आणि पेटी खोलली. त्याला आत काहीच दिसेना. मग त्याचाही चेहरा गोंधळला. त्यानं झोपडीत इकडं तिकडं नजर टाकली. पुन्हा पेटीत खालीवर पाहिलं अन् ते पोर बाहेर येऊन आपल्या बापाला म्हणाले 'आम्ही गुरं-शेरडं चारायला बाहेर नेली तवा आतच पेटीत हुता !'

'हो ! पण आता नाय !'

'मग कुणी न्यावा ?'

त्यावर लहुजानं पोरांना शिव्या हासडल्या. थोरल्या पोराच्या पाठीत कणाकण धपाटे मारले. ते पोर एवढा मार खाऊन गप्प बसलं.

तोवर खालून लहुजाची बायको नेटानं पाऊल टाकतच वर आली. आपला नवरा मुलांना का मारतोय् म्हणून ती पळतच झोपडीवर आली व आल्या आल्या लांबून आपल्या नवऱ्याला आवाज दिला,

'तू पोरांना का म्हण मारतोस ?'

'मारू नाय तर काय बोंबलू ?'

'आरं पण तुला बोंबलाय् का झालं ?'

'अग आपला वाजवायचा रेडिवो नाय ना !'

'कुठं गेला ?'

'झोपडीत नाय ! पेटीत नाय !'

'खरं म्हंतो ?'

'होय ! कुठंच नाय !'

आपला वाजवायचा रेडिओ एकाएकी कुठं गेला ? हे ऐकून तिला धक्काच बसला. ती झटक्यानं झोपडीत शिरली. झोपडीत सगळा पसारा अस्ताव्यस्त पडला होता. तो सगळा प्रकार पाहून तिच्या काळजात धडधड् झालं. तिनं मांजराच्या नजरेनं सगळी झोपडी, पेटी, सांदी, वळचगी धुंडाळल्या, पण तिला काहीच दिसेना. ती घाबऱ्या घाबऱ्या चिंतागती चेहऱ्यानं बाहेर आली आणि आपल्या मुलांना प्रश्न करीतच त्यांच्या उघड्या पाठीवर हाताचे रट्टे सणासण हाणू लागली. त्यामुळे ती पोरं किंचाळत रानोमाळ पळू लागली. 'आपल्या पेटीतला वाजवायचा रिडिओ कुठं गेला ?' हाच प्रश्न त्या दोघा नवरा-बायकोच्या चेहऱ्यांवर उठला होता. आता काय करावं ? कुठं जावं ? कुठं पाहावं ? असं त्यांना झालं.

त्यातच लहुजानं अपल्या रडत उभ्या राहिलेल्या मुलाला अनेक प्रश्न टाकले, 'आपल्याकडं कोण आलं होतं का ? तुम्ही कुगाला पाहिलं का ? कोग चोर आला हुता का ?' असंच काय काय प्रश्न मुलांना विचारलं. पण त्या मुलांनी उत्तर दिलं,

'आमी गाय-शेळ्या वर हिंडवत होतू ! आमाला काय ठाव नाय !'

मग लहुजा आणि त्याच्या बायकोची बात-चीत झाली. विचार झाला आणि आपल्या झोपडीत चोरी झाली अशी पोलिस गेटात वर्दी द्यायची ठरले. मग त्यांनी गुरं-शेरडं झाडाखाली बांधली, लहुजानं अंगात कपडे घातले. पेटीतल्या पटक्यातली एक चिठ्ठी बरोबर घेतली. मोठ्या मुलाला जनावराजवळ राखणीला ठेवलं आणि लहुजा अन् त्याची बायको बाकी तीन मुलं घेऊन पोलीस गेटाकडे निघाले. निघता निघता लहुजाच्या बायकोनं भाकरी-तुकडा एका फडक्यात बांधून बरोबर घेतला.

सूर्य लांब खाली गेला होता. झाडाच्या सावल्या खाली लांबल्या होत्या पारध्याचं कुटुंब पोलीस गेटाजवळ आलं. लहुजा आणि त्याची बायको पोलीस गेटच्या तोंडाशी उभी राहिली. पोलिसांना पाहून त्यांची मुलं उंदरागत बावरली होती. ती लांबच झाडाखाली उभी राहिली होती. ती लुकलुकत्या घाबरलेल्या डोळ्यानं आतल्या पोलिसाकडे पाहात होती पुन्हा आपल्या आई-बापाकडं पाहात होती. पोलिसाने लहुजाकडं चमत्कारिकपणे पाहून आवाज चढवून त्याला विचारलं, 'काय रे, तू कोग ?'

'मी फासेपारधी' लहुजाचं उत्तर.

'तुला काय पाहिजे ?' पोलिसाचा प्रश्न.

'मला तुमच्याकडं फिर्याद दियाची आहे !'

'कसली फिर्याद ?'

'चोरीची फिर्याद !' असं लहुजा बोलताच पोलीस त्याच्याकडे पाहून कुत्सितपणे हसले. मग एका पोलिसानं आवाज चढवून विचारले,

'काय रे साल्या! तू फासेपारधी अन् तूच चोरीची फिर्याद दियाला आलास?'

'हो माझी चोरी झाली हवालदार!' हात जोडून लहुजा पोलिसाला सांगतो. ते ऐकून पोलीस आपापसात खदाखदा हसले. त्यातल्या दुसऱ्या पोलिसानं त्याच्यावर आवाज चढविला,

'काय रे, चोर तो चोर अन् वर शिरजोर!'

या बोलण्याचा लहुजाला नीट बोध झाला नाही, म्हणून त्यानं पोलिसाला उलट विचारलं,

'तू काय बोलतो?'

तोच पोलीस त्याला म्हणतो, 'अरं चोरच्च उलटी कशी फिर्याद देतो?' पोलिसाच्या बोलण्याचा अर्थ ध्यानात येताच लहुजा पोलिसावर गुरगुरला.

'तू काय मला चोर म्हणतोस?'

'तर मग काय म्हणू?'

असं पोलिस म्हणताच लहुजा त्याला समज देतो. 'अरे तू सरकारी नोकर! तसा मी पण सरकारी नोकर! तू कुणाला चोर म्हणतोस?'

असं पोलिसाला तडकावून लहुजा लागलीच त्याला साखळीत अडकवलेला सरकारी नोकरीचा बिल्ला त्यास दावतो व त्याला म्हणतो, 'पाहिलास हा सरकारी बिल्ला? मी चोर नाय! तुजागत सरकारी माणूस हाय!'

लहुजाचं कडक बोलणं ऐकून पोलिसांचे चेहरे थोडेसे गंभीर झाले. तरीपण त्यातल्या एकानं कुत्सितपणे विचारलं, 'काय रे! कसली तुझी धनदौलत चोरीस गेली?'

तोच लहुजा म्हणाला, 'आमचा वाजवायचा रिडिवो!'

'रेडिओ?' पोलीस आश्चर्याने विचारतात. त्याला लहुजा ठासून सांगतो,

'हो! हो! रिडिओ!'

'तुझा का चोरीचा?' पोलिसांचा खवचट प्रश्न!

'माझा! खुद्द माझा!'

असं लहुजा म्हणताच त्याच्या बायकोनं त्याला साथ दिली.

'हो! आमी इकत घेतला हुता!'

त्यावर पोलिसच आपापसात काय तरी बडबडले. त्याचा अर्थ लहुजाला कळला नाही. त्याच्या बायकोला मात्र त्यांच्या बोलण्याचा संशय आला. तोच पोलीस लहुजाला म्हणाला, 'तू गेटाच्या बाहेर थांब! आता हवालदार येतील!'

त्यावर लहुजा व त्याची बायको बाहेर आले. गेटाच्या समोरच झाडाखाली थांबले. त्यात सावलीला बसल्या बसल्या फडक्यात बांधून आणलेली भाकरी तिथंच सोडली. त्यावर

भुकेल्या लहुजा व त्याच्या बायको-मुलांनी ताव मारला. ते ओले-वाळले तुकडे तसेच गोड करून खाल्ले. भुकेल्या पोटी ते सगळे फस्त झाले. कुठून लांबून लहुजाच्या बायकोनं जवळच्या डब्यात पाणी आणले. पोटभर पाणी पिऊन ते तसेच झाडाखाली थांबले.

सायंकाळ सहाची वेळ झाली.

हवालदार सायकलवरून गेटात आले. ते आल्या आल्या त्यांच्या कामाला लागले. झाडाखाली समोर बसलेल्या पारध्यावर गेटातून हवालदारानं दृष्टी फिरवली. पारध्याला गेटात बोलवण्याचा त्यानं हुकूम केला. पोलिसानं पारध्याला गेटात बोलावलं. लहुजा त्याच्यापुढं उभा राहिला. तोच हवालदारानं त्यावर मोठे डोळे करून प्रश्न केला.

'काय रे तूच पारधी ?'

'होय हवालदार !'

'काय तुझं म्हणणं ?'

'माझ्या रिडिवोची चोरी झाली. ती फिर्याद दियाला आलोय !'

'तुझ्या रिडिओची ?'

'हो माझ्या रिडिओची !'

तोच हवालदार त्याच्यावर कडाडला, 'भडव्या, तुझ्या बापानं कधी रेडिओ पाहिला का ?'

तोच लहुजानं फाडकन् उत्तर दिलं,

'हवालदार ! माझ्या बापानं बघितला नसला पण म्या विकत घेतला ना ?'

मग हवालदार खुर्चीतून उठला. टेबलावरचा दंडुका हातात घेऊन फिरवत त्याला विचारतो,

'काय रे खरं सांग ! रेडिओ तू विकत घेतलास का भानगडीचा आहे ?'

'भानगडीचा नाय ! मी खुद्द इकत घेतलाय !'

तोच हवालदार पुन्हा त्याच्यावर कडकला, 'खरं सांग ! रेडिओ घेण्याची तुझी ऐपत आहे का ?'

'हो ! हाय !'

'साल्यांनो, भीक मागून जगता अन् वर ही मिजास !'

तोच लहुजा ताडकन् बोलला,

'मी भीक मागत नाय !'

'मग काय करतोस ?'

'मी नोकरी करतो !'

'नोकरी ?'

'हो ! हो ! नोकरी करतो !'

'कुठं ?'

'सरकारी डेपूत. देहूरोडला !'

'हे लब्राड बोलतोस !'

'हा नाय ! हा ब्रच नोकरीचा सरकारी बिल्ला !'

असं बोलून लहुजानं आपल्या कमरेला साखळीत पक्का बांधलेला बिल्ला हवालदाराला दाखवला. तो पितळेचा नंबर असलेला बिल्ला पाहून हवालदार हातातला दंडुका टेबलावर ठेवीत विचारतो–

'काय रे, तुला पगार किती मिळतो ?'

'दोनशे रुपयांच्या पुढं !'

लहुजाचं हे उत्तर ऐकताच बाकी पोलिसांचे डोळे खालीवर झाले. त्याच्याकडं टकाटक पाहू लागले. त्याच्या बायकोकडंही पाहू लागले.

त्यानंतर लहुजाच म्हणतो,

'हवाल्दार, माझी फिर्याद घ्या !'

मग हवाल्दारानं मुद्याचा प्रश्न काढला, 'काय रे, रेडिओ विकत घेतला होता म्हणतोस मग तुझ्याजवळ पावती आहे का ?'

पावतीचं नाव काढताच लहुजानं आपल्या पाटलूनीच्या खिशातून कागदाचं एक पाकीट काढलं. त्यातून एक चिठ्ठी काढून हवालदाराच्या पुढं ठेवली. ती त्यांनी काळजीपूर्वक वाचली. दुसऱ्या पोलिसांनीही पाहिली आणि ती पावती पाहून ते सगळेच लहुजाकडे आश्चर्याने पाहू लागले.

तोच ती पावती पाहून हवालदार म्हणतो,

'अरे हा रेडिओ नाही ! ट्रँझिस्टर आहे !'

'त्याला आमी रिडिवोच बोलतो...ते पण रिडिवोसारखं बोलतं, गाणं गातं...'

तोच मागे उभा राहिलेला एक पोलिस खवचटपणे कसा म्हणतो,

'काय रे आता तुम्ही सिनेमाची गाणी ऐकायला लागला ?'

'मग काय झालं ! आमी काय माणसं नाय ?' लहुजाच्या या उत्तरानं पोलिस गप्प झाले.

त्यानंतर हवालदारानं त्याला प्रश्न केला. 'काय रे, तू कुठं राहतो ?'

'त्या डोंगराच्या कडेला !'

'किती दिवस राहतो ?'

‘ दोन वर्षं. ’

लहुजा दोन वर्षं म्हणताच हवालदारानं त्याला मार्मिक प्रश्न केला.

‘ काय रे ! या भागात वंगले लाइनीत चोऱ्यांची बोंब झालीय ! ’

त्यावर लहुजा म्हणाला,

‘ आमाला काय ठाव ? ’

‘ मग दुसरं कोण चोऱ्या करतं ? ’

‘ चोऱ्या करणाऱ्याला इचार ! मला काय इचारतोस ! ’

लहुजाच्या या उलट उत्तरानं हवालदार चिडला.

‘ असं काय ! दावतो आता या दंडुक्यानं कोण चोऱ्या करतो ते ! ’

असं बडबडून हवालदारानं एकट्या लहुजाला गेटाच्या बाहेर बसायचा हुकूम केला. त्याच्या बायका पोरांना तेथून हाकलून दिलं.

सूर्य बुडाला.

रात्र झाली. तरी लहुजा तिथंच बसून होता. आजूबाजूला अंधार दाटला होता.

रात्रीचे बारा वाजले.

त्या दाट अंधारात लहुजाला बाजूला नेऊन पोलीस बंगले लायनीतील चोरीची त्याच्याकडं जारीने चौकशी करत होते.

पण लहुजा आपल्या कानावर हात ठेवत होता.

‘ मी बालबच्चेवाला, नोकरीवाला, मला चोरीचं काहीच ठाव नाही ’ असं पुन्हा पुन्हा पोलिसांना सांगत होता.

पण त्याच्या भोवती गर्द अंधार दाटला.

लहुजा झोपडीच्या समोर आला व हातपाय मोडल्यागत मटकन बसला. तोच त्याच्या बायकोनं विचारलं,

‘ काय झालं आपल्या चोरीचं ? ’

तोच लहुजा पडलेल्या आवाजात म्हणतो,

‘ आपली चोरी बोंबलली...पण दुसऱ्याच चोरीचा आपल्यावर आळ आलाय. ’

‘ कुणाच्या चोरीचा ? ’

‘ बंगले लायनीतल्या चोरीचा ! ’

‘ पण मी नोकरीवाला हाय म्हणून बोलला नाय का ? ’

‘ हो ! बोललो पण नोकरीवाला काय चोरी करत नाय का ? असा त्यांनी सवाल केला ! ’

‘ मग पुढं ? ’

‘ आता पुढं काय ? पोलीस सकाळीच आपल्या झोपडीवर झडतीला इयाचं हायेत.

‘ असं म्हणता ! ’

‘ होय ! मी काय लबाड सांगतोय ? ’

‘ मग आता कसं करायचं ? ’ असं बायकोनं विचारताच लहुजा तिला म्हणतो,

‘ आताच्या आता आपलं पाल बिऱ्हाड हितनं हालवायचं ! ’

‘ पण त्यांच्या बापाचं हितं काय ? ’

त्यावर लहुजा सावजागत सावध होऊन काळजीच्या स्वरात तिला बोलतो,

‘ ते खरं ! पण त्या लांडग्याचा माझ्या नोकरीवर डोळा हाय. उद्या मला फुकाफुकी अटक झाली, तर माझी नोकरी गेलीच की मग मागं तसं पुढं दिवस येणार ! ’

‘ आता कुठं पाल हलवायचं ? ’

‘ लांब ! लांब, या पोलिसगेटाच्या हद्दीबाहेर ! ’

लहुजाच्या या बोलानं त्याची बायको घाबरली. तिनं पटापट आपली पोरं उठवली. सगळ्या बिऱ्हाडाची आवरा-आवर करू लागली. तोवर तांबडं फुटलं.

लहुजानं आपला प्रपंच आपल्या गाई-कालवडीच्या पाठीवर लादला. एका पोऱ्याला त्यानं खांद्यावर घेतलं. त्याच्या बायकोनं लहान मूल पाठीशी लुगड्याच्या घडप्यात बांधलं आणि तेथून लहुजा फासेपारध्याचं पाल दिसेल त्या वाटेनं निघालं.

लांब खाली वाटेला लागल्यावर लहुजा पुनः पुन्हा आपल्या झोपडीकडे पाहात होता आणि जड झालेली पावलं तशीच पुढं ओढत होता.

बरंच अंतर चालल्यावर सूर्य उगवला होता.

त्यानं उगवत्या सूर्याचं दर्शन घेतलं. तो त्या सूर्यप्रकाशात वाटचाल करू लागला.

सूर्याला हात जोडले व तो संतप्त आवाजात म्हणाला, ‘ माझ्या मुलाबाळांची वस्ती उठवली काय ? मी पण पारधी आहे. याचा मी पण सूड घेइन ! ’

※

## १०

# आता पुढं कुठं.... ?

याला दोन वर्षे झाली...

गावच्या उगवतीला खालच्या माळावर नंदिवाल्यांनी आपल्या झोपड्या पक्क्या बांधल्या. पोत्या-पटकरांची, वाकळागोधड्यांची त्यांची राहाण्याची जुनी पालं गेली. थंडी-वाऱ्यात, ऊनपावसात, वादळ-वावटळात आपला जीव मुठीत धरून उघड्या पालात राहाण्याचे त्यांचे दिवस संपले होते. त्यांची मुलं-लेकरं आता खंबीर झोपड्यांच्या निवाऱ्याला राहात होती.

नंदिवाल्यांचं भटकतं जुनं पाल गेलं. आता त्यांनी नवी पक्की झोपडी उभी केली. आज इथं तर उद्या तिथं हे त्यांचं जिणं संपुष्टात आलं. आता ते एकाच ठिकाणी आपल्या झोपडीत स्थिर झाले. त्यांना झोपडीचा निवारा मिळाला. त्यांच्या झोपडीला भूमीचा आधार घावला. त्यांना आपलं म्हणून सांगायला गाव झालं. जगण्यासाठी चालणारी गावोगावची त्यांची भटकंती संपुष्टात आली.

नंदिवाल्यांच्या झोपड्या मोकळ्या माळरानात उभ्या होत्या. नितळ ऊन्ह, मोकळी हवा, गार वारा, सगळंच मोकळं मोकळं. माळरानात जागा मोकळीच. भरपूर. प्रत्येक नंदिवाल्याच्या झोपडीपुढं मोठच्या मोठं पटांगण. त्यांची लहान लहान उघडी-नागडी पोरं खुशाल रानपाखरागत त्या पटांगणात खेळत होती; पळत होती. झोपडीच्या मागंपुढं, सावलीच्या आडोशाला त्यांची राखणदार वेरकी कुत्री बसलेली होती. त्यांचे गारेच्या गोट्यागत दिसणारे हेरके डोळे आजूबाजूला नजर टाकत होते.

झोपड्यापुढच्या बोरी, बाभळी, तरवड अशा झुडपांना त्यानी आपली जनावरं गाई, बैल, शेळ्या बांधलेल्या होत्या. खाली बसलेले खुजे बैल रवंथ करत होते. शेपटीनं अंगावरच्या माशा उडवत होते. तरणी पाठरं, बकऱ्या बाभळीच्या झुडपावर पाल्यापाय बाला मारत होती. बारीक कोकरं आपल्या आईच्या कासेला दुधापाय ढुशा मारत होती. दुधानं पोट भरल्यावर टणा टणा उड्या मारत खेळत होती. त्यांच्यामागं लहान पोरं अन् कुत्री पळत होती.

नंदीवाल्यांनी झोपड्या तर बंदोबस्तात बांधल्या होत्या.

मागंपुढं मोठ्या मेढी, डांब मुरमाच्या जमिनीत पक्के उभे केले होते. त्या मेढी डांबावर आढ्याचं लाकूड टाकलं होतं. त्यावर वासेबांदऱ्या आळपून घट्ट केल्या होत्या आणि त्यावर नदीतल्या पान-कणसी गवताने झोपड्या चांगल्या शेकारल्या होत्या. झोपडीच्या आजूबाजूनं झाडा झुडपाच्या-निरगुडी टणटणीच्या फोकाच्या बांदाऱ्यानं भक्कम कूड तयार केला होता. तो कूड शाडूच्या मातीनं एकन्देर लिंपलेला होता. त्यावर पुन्हा सफेत मातीनं सारवून चांगला पोतारा मारला होता. त्यामुळं झोपडीचा खालचा कूड भिंतीगत दिसत होता. झोपडीला पुढं दार केलं होतं. ते पण बुटकंच. झोपडीत आत-बाहेर करताना वाकूनच जावं-यावं लागत होतं.

झोपडीच्या आतली जमीन चांगलीच घट्ट सपई केलेली होती. ती मुरमाची जमीन दगड मोंगळीनं दणून नीट केली होती. ती हिरव्यागार शेणानं सारवल्यानं डोळ्यात भरत होती. तसंच पुढचं अंगण व्यवस्थित होतं. ते पण शेणानं सारवलं होतं.

आत झोपडीतला नंदीवाल्याचा संसार मात्र मोडका-तोडका. त्याच्या आत पडलेल्या भांड्याकुंड्यात, झोपडीत पडलेल्या जुन्या-पान्या कपड्यात त्याचं रूप उठून दिसत होतं. त्या दारिद्र्यातली नंदीवाल्याची काळीसावळी गडी-बायामाणसं वाढ न झालेल्या बाभळीच्या खुरट्या-खुज्या झुडपागत दिसत होती.

—पण ते आपापल्या झोपडीपुढं सायंकाळी निवांत बसलेले असायचे.

नंदीवाल्यांच्या झोपड्या खालच्या माळरानावर उभ्या राहिल्या आणि त्या भगभगीत वैराग माळरानाला जिवंतपणा आला. त्या ओसाड-बोडक्या रानात रात्री दिवा दिसू लागला. माणसांच्या, गुरा-ढोरांच्या वाऱ्यात ते माळरान सजीव झालं.

त्या झोपड्यांपासून खाली लवणात गावच्या नंदीचं पात्र वाहात होतं.

नदीच्या पात्राची पाणस्थळाची जागा पाहूनच नंदीवाल्यांनी आपली कायमची वस्ती त्या माळावर उभी केली होती. त्यांची गुरं-शेळ्या खुशाल नदीच्या काठा-काठानं झाडा-झुडपात चरत, हिंडत असत. झोपड्यापासून एका मोठ्या हाकेच्या अंतरावर ते पाणस्थळ होते.

दोन वर्षं झाली. नंदीवाले त्या माळावर कायम राहात होते.

—त्यात गेल्या सालचे सुगीचे दिवस. सुगी सराई जोरात चालू होती. गावची माणसं आपापल्या रानामळ्यात खपत होती. राबत होती.

नंदीवाल्यांचे तरणे गडी-बायाही या चालू सुगीत कामाला जात होती. दिवसभर रानात गावच्या शिवारात मिळेल त्या कामावर राबत होते. कष्ट करत होते. श्रम करून घाम गाळीत होते आणि आपल्या रोजंदारीत धान्य, पीक आणून आपल्या झोपडीपुढं टाकत होते. सकाळ-संध्याकाळ झोपडीत त्यांची चूल पेटत होती. दोन वेळेला मिळेल तसा भाकरी-टुकडा ते खात होते.

त्यात नंदीवाल्यांना गेल्या सालची सुगी चांगलीच झाली होती. त्यांनी सुगीत भरपूर कष्ट करून आपापल्या झोपडीत चार-सहा महिने पुरेल एवढं धान्य जमा केलं होतं. लहान-मोठ्या जनावरांना वैरण-काडीही मिळवून ठेवली होती.

गेल्या वर्षाचा हा अनुभव जमेस धरून नंदीवाले गडी, बाया, पोरं यंदाची सुगी करायची म्हणून आपल्या कंबरा कसून तयार होते. त्यातच यंदाचा पाऊस वेळेवर झाला होता. रानात शिवारात जोरदार पीकं उभं राहिलं होतं. गावचा, आजूबाजूच्या गावांचाही सगळा शिवार पिकानं भरलेला होता.

यंदाची सुगी जोरात होणार !

हीच गावोगाव बोलवा होती. त्यात नंदीवालेही यंदाच्या सुगीवर आपला डोळा ठेवून होते. त्यात आपल्या चार-सहा महिन्याचं पोटपाणी कसंही मिळवता येईल हीच आशा त्यांच्या मनात घर करून बसली होती.

त्यानच सुगी जोरात चालू होती.

नंदीवाले गडी-बाया येरवाळीच आपला भाकरी-टुकडा आटपून, दिवसानं तोंड दावताच आपल्या झोपडीबाहेर पडत होते. आपापल्या कामाच्या वाटेनं राना-शिवारात पळत होते.

त्यातच नंदीवाल्यांच्या वस्तीवर गावचा कोतवाल येऊन ठेपला होता. वस्तीवरच्या नंदीवाल्यांना गावात ग्रामपंचायतीच्या सरपंचानं बोलाविल्याची वर्दी देऊन गेला होता.

रात्री आठची वेळ. काळोखी रात्र. चारी दिशांनी काळोख भरला होता. कर्ते नंदीवाले चार गडी, दोन कळत्या बाया, आपल्या वस्तीवरून गावात निघाले–अंधारातून वाट तुडवत निघाले.

ग्रामपंचायतीची जुनी इमारत. मोडकळीस आलेली. बाजूची भिंत निसटलेली. आत पंच–सरपंच बसले होते. त्यांच्यापुढं काचेला काजळी लागलेला कंदील अंधुक उजेड टाकत होता. कोतवाल बाजूला बसला होता.

नंदीवाल्यातल्या कर्त्या भोजाबानं पंचांना रामराम घातला. त्याच्या पाठोपाठ बाकीच्या नंदीवाल्यांनीही. मग नंदीवाले आरोपीगत बाहेरच बाजूला बसले.

अंधारात तोंडाला तोंड दिसत नव्हतं. सगळेच गप्प. मध्येच कंदिलाच्या पिवळ्या वातीचा भडका निघायचा.

अंधाराला शब्द फुटावा तसा मध्येच अंधारातून भुजा नंदीवाल्याने बोल केला–

'काय सरपंच, काय आयपांढरीचा बोल हाय ?'

तोच सरपंच आपल्या मिशांवरून बोटं फिरवत विचारतो–

'नंदीवाल्यांनो, तुमच्यावर आळ हाय !'

'कसला वो आळ ?'

'तो काय तोंडानं सांगायला पाहिजे व्हय ?'

सरपंचाचा चढलेला आवाज हेरून भुजा पटकन म्हणतो,

'भीक मागायचं सोडून आता तुमच्या ढोळ्याम्होरंच आम्ही तुमच्या शेता-मळ्यातच रोज काम करतो की वो !'

'आरं, त्यात नावालाच फक्त कष्ट करता !'

'मग काय म्हणता, आम्ही भीक मागतो ?'

'आरं भुजा, तुमी भीक मागत हता ते बरं हुतं !'

'मग आमी हातानं कष्ट करून पोट भरतो, हे तुमाला बरं दिसत नाय म्हणा की !'

'आरं तुमी हातानं कष्ट कुठं करताय ?'

'तर आम्ही काय करतोयत्रं सरपंच ?' एका नंदीवाल्यानं अंधारातून शब्द केला.

'आता ते का तोंडानं उघड बोलायला पाहिजे व्हय रं ?'

'बोला की, काय साफ बोला. जेला कर नाय तेला डर कशाची !'

असं भुजा नंदीवाला बोलताच एक पंच म्हणतो, 'आरं, आम्ही बोलायच्या अगोदर तुमीच आपला गुन्हा कबूल करा.'

'कशाचा वो गुन्हा ?' असा दुसरा एक सवाल अंधारातूनच नंदीवाल्यानं केला. तोच सरपंच फाडकन बोलला,

'आरं चोरीचा गुन्हा रे !'

चोरीच्या गुन्ह्याचा आळ अंगावर आल्या आल्या भुजा नंदीवाला बोलला,

'आवो, आम्ही आता नंदीबैलाला घेऊन दारोदार, घरोघर भीक मागायचं सोडलं. आता तोच आमचा नंदी-देव ओझी वहाणारा बैल झालाय. तो पण आमच्याबरोबरच कष्ट करतो. अशा कष्ट करून पोट भरणाऱ्याला तुमी चोर म्हणता ? दुनियेचा हा उलटा न्याय झाला, सरपंच.'

'जीभ लांब करून बोलू नको, तुम्ही चोऱ्या करतात, पिकं खुडून नेता.'

असं एक गावकरी म्हणताच त्याला दुसऱ्यानं साथ दिली.

'अशी आता गावोगाव बोंब उठलीय' तोच भुजा नंदीवाला म्हणाला,

'मालक, तो निव्वळ आळ हाय. आमची जात कुणाच्या पडल्या जिनसाला हात लावायची न्हाय. मग चोरीचा मुद्दा सोडाच.'

तोच दुसरा नंदीवाला म्हणतो....

'सरपंच, आमी उभी हयात हा उभा भाग पोटापाय भटकलो, हिंडलो; पण आमच्यावर काय कुणी हा आळ घेतला नाय बघा.'

'आरं तुमी गावामागं गाव बोंबलत हिंडणार! मग तुमच्या नादाला कोण लागतोय?'

'असं काय बोलू नका सरपंच, गावोगावच्या पाटलांचं तुम्ही दाखलं काढा, मग आमच्या जातीचा इमानीपणा तुम्हाला कळंल.'

तेवढ्यात एका पंचानं पुढचा बोल केला–

'का रं नंदीवाल्यांनो, गावोगावं भटकणारी तुमची जात, मग आमच्याच गावच्या बोकांडी का म्हणून वस्ती करून राहिलीय?'

'माणसागत माणसात राहण्यासाठी.'

असं भुजाबानं बोल करताच दुसरा एक पंच कसा म्हणतो,

'लेकांनो, माणसात राहण्यासाठी, का माणसात चोऱ्या करण्यासाठी?'

त्यावर भुजा हात जोडून समजुतीनं गावकऱ्यांना बोलला,

'मालक, तुमाला गाव हाय, पण आमाला न्हाय. तुमाला घरदार हाय, पण आमाला न्हाय. तुमाला जमीन हाय, पण आमाला न्हाय. असं आम्हाला गाव न्हाय, घर न्हाय, जमीन न्हाय. आमचं जिगं वाऱ्यावरचं. रानच्या पक्ष्याला घरटं आहे, गाव आहे, कुत्र्या मांजरालाही गाव आहे, पण आम्हाला काहीच नाही.'

असं सांगून भुजा नंदीवाला पुढं म्हणाला, 'आयपांढरीचे मायबाप, मग आता बोला, बोला, आम्हाला पण आता आपलं घर पाईजे, आम्हाला पण आता आमचं गाव पाइजे. आम्हाला पण आमची भूमी पाइजे. म्हनूनशान आम्ही पालं सोडून, पक्की झोपडी-घरं उभी केली. आम्हाला आता कायमचं गाव झालं. फॉरेस्ट जमीन देण्यापाय सरकारला एक अर्ज दिलाय. ती पडीक सरकारी जमीन-पण आज-उद्या आम्हाला मिळंल. आता आम्ही हातानं कष्ट करतो; पोट भरतो. या सगळ्या गोष्टीनं आम्ही आता माणसात आलो. असं खरं असताना तुम्ही निष्कारण आमच्यावर कशाला आळ आणताय?'

भुजानं एवढं समजावून सांगितलं. नंदीवाल्याच्या गडी-बायांनी माना डोलावल्या. त्यात एकजण बोलला, 'भुजा, तुजा बोल पक्का खरा.'

एवढ्यात एक गावकरी पिसाळल्यागत बोलला,

'लेकांनो, चोर ते चोर अन् वर शिरजोर! कशाचं तुमी कष्ट करता! चोऱ्या करायला नव्हं का!' आता पुन्हा त्या गावकऱ्यानं आपला पाणउतारा केला. म्हणून सगळे नंदीवाले गडीबाया पटापटा अंधारातून उठले आणि जोत्याजवळ कंदिलाच्या उजेडापुढे येऊन आपल्या हाताचे पंजे पुरावा म्हणून उजेडात दाखवत बडबडतात, ओरडतात, 'हे बघा,

आमच्या हाताला पडलेलं, कष्टाचं घट्टं तरी बघा, आणि मग आमच्यावर आळ आणा. माणूस म्हणून माणसांत राह्यला आलो असताना तुम्ही आमाला माणसांतून काढताय!'

तेवढ्यात एक पंच गावकरी म्हणतो, 'छपन्न गावाचं पाणी पेल्याली तुमची अवलाद आम्हाला बोलायला ऐकणार थोडीच! लेकांनो, तुमची वस्ती आली गावाच्याजवळ आणि चोऱ्यांची बोंब उठलीय.'

आता गावकऱ्यांच्यापुढं काय बोलावं? त्यांना कसं समजावून सांगावं? याच विचारात नंदीवाले गप्प झाले. काही बोलले नाहीत.

ग्रामपंचायतीच्या जोत्यावरचा कंदील जळत होता. कंदीलाच्या काचेवर अधिकच काजळी चढत होती. प्रकाश अधिक अधिक मंद–अंधुक होत चालला होता–

–मध्येच सरपंचानं मान वर केली व भुजाकडे तोंड करून इशारा देत तो म्हणाला, 'ये नंदीवाल्यांनो, उद्याच्या उद्या तुमची वस्ती उठवा, नाय तर आमाला दुसरा इलाज करावा लागेल.'

'मालक, आमाला या आयपांढरीतून उठवू नका.' असं भुजा नंदीवाला म्हणताच सरपंच म्हणतो,

'लेकानो, मग काय आम्ही गावातून काळं तोंड करून जावं काय?'

'आम्ही कवा असं म्हंतोय?'

'लेकांनो, तुमचा आता धंदाच तसा चालू झालाय.' असं बोलून सरपंचानं पुन्हा नंदीवाल्यांना ताकीद दिली, 'हे बघा, तुमची वस्ती उद्या तिथं दिसता कामा नये, नायत आमच्याशी गाठ हाय बघा.'

असा इशारा देऊन सरपंच बैठकीतून उठले. सगळं गाव उठलं. जोत्यावरचा कंदील हातात घेऊन कोतवाल सरपंचाच्या पुढं निघाला. पटांगणात सगळा अंधार भरला.

त्या अंधारात नंदीवाले गडप झाले होते. एक एक जण काही न बोलता आपल्या वस्तीकडे वाट काढत अंधारातून निघाले.

गावाखालच्या अंधारातून त्या अंधारात कुत्र्यांचा कालवा उठला होता.

ती अंधारी रात्र सरली. दुसरा दिवस उजाडला.

सगळे नंदीवाले आपल्या वस्तीत गोळामेळ्याने एकत्रित बसले. गावकऱ्यांच्या रात्रीच्या निर्वाणीच्या बोलण्याचा त्यांनी विचार केला. त्यावर सगळ्यांनी उलटसुलट चर्चा केली आणि एक विचार पक्का केला. तालुक्याला जाऊन कचेरीत अधिकाऱ्याकडं अर्ज देण्याचा बेत पक्का झाला.

दुसऱ्या दिवशीच नंदिवाल्यांची सगळी गडी-बाया-पोरं तालुक्याला गेली....

दिवस मावळायला चालला होता.

प्रत्येक जीव आपल्या विसाव्याला चालला होता.

नंदीवाल्यांच्या गडी-बाया-मुलांचा घोळका बोल-बोलण्यांचा कलकलाट करीतच गाडी-वाट सोडून पाऊलवाटेनं आपल्या वस्तीकडं माळरानाच्या बाजूला निघाली. पाऊलवाट मागं टाकून वस्तीजवळ येताच आपल्या उद्ध्वस्त झोपडीकडं पाहून एका बाईनं ठोऽऽ ठोऽऽ बोंब मारली! ती धावतच आपल्या झोपडीकडं गेली. झोपडीतला सगळा संसार उधळलेला पाहून ती धायधाय रडू लागली.

सगळेच नंदीवाले गडी-बाया आपापल्या झोपड्याकडं पळाले. सगळ्यांचाच झोपड्या उद्ध्वस्त केलेल्या होत्या. झोपडीत मांडलेला संसार उधळला होता. बायांचा रडण्याचा कालवा उठला होता. गड्यांच्या बोलण्याचा कलकलाट चालला होता.

तरणी पोरं आपल्या झोपड्यांची अवस्था पाहून संतप्त झाली होती. त्यांच्या उरात राग पेटलेला होता. त्या त्वेषाच्या, संतापाच्या भरातच त्यांनी आपल्या उद्ध्वस्त केलेल्या झोपड्यांचे वासे, काठ्या तशाच हातात घेतल्या, शर्टाच्या बाह्या मागं सारल्या, ते बेभान होऊन गावच्या दिशेनं धावतच सुटले, त्यांना म्हाताऱ्या गडी-बायांनी आडवे होऊन आवरण्याचा प्रयत्न केला, पण तो निष्फळ झाला. ते तरणेबांड गडी आपल्या हातातल्या काठ्या उंचावत गर्जतच गावच्या दिशेनं वेगात गेले....

दुसऱ्या दिवशी गावात बोंबाबोंब झाली...

अंधाऱ्या रात्रीच नंदीवाले आपापली बिऱ्हाडं उचलून पसार झाले.

तालुक्याच्या पोलिसांची धावपळ सुरू झाली.

नंदीवाल्यांना वाटचालीत रात्रीचा दिवस उगवत होता... उजडत होता आणि त्यांना दिवसा रात्र होती.

आता पुढचा मुक्काम कुठं...? असा त्यांच्यापुढं प्रश्न होता....

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९८८
ना. क्र. २-३-७७
जिल्हा २११८३
संद. शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0023899